भवरखेड येथे पामोलीन तेलापासून दूध तयार करणाऱ्यावर एफडीएची कारवाई
वाचा पान ८ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, शुक्रवार, २९ मे २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३३ । अंक : २९० । मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

### विचारपुष्प



संघ ज्या वेळेला सेवेचा विचार करतो त्या वेळी विनामूल्य, विना मोबदला आणि मोबदला असलाच तर तो in coins नाही तर in kind म्हणजे केवळ समाधान हाच त्याचा मोबदला असतो.

**- स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

### महत्त्वाचे

**सीयूईटी-यूजीचे सुधारित वेळापत्रक जारी**

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या संयुक्त विद्यापीठ प्रवेश परीक्षा-२०२६ च्या (सीयूईटी) सुधारित परीक्षा तारखा आणि प्रवेशपत्रे जाहीर केली आहेत. ईद-उल-अझहामुळे या परीक्षांचे वेळापत्रक २८ मे पासून पुढे ढकलण्यात आले होते. आता या परीक्षा ३१ मे, ६ आणि ७ जून रोजी होणार आहे, अशी माहिती एनटीएने दिली. ३१ मे रोजी परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची प्रवेशपत्रे जारी करण्यात आली असून, ती अधिकृत संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. प्रवेशपत्रे लवकरच जारी केली जातील, असे एजन्सीने सांगितले.

# सिद्धरामय्या यांचा राजीनामा

- शुद्ध अंतःकरणाने पद सोडल्याचा दावा
- राज्यसभेची उमेदवारी नाकारली

**बंगळुरू, २८ मे**

कर्नाटकातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते सिद्धरामय्या यांनी गुरुवारी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यासह या पदासाठी उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासोबत सुरू असलेला तीव्र स्वरूपाचा राजकीय संघर्ष संपुष्टात आला. ते राजीनामा देतील असा अंदाज मागील काही महिन्यांपासून वर्तविला जात होता.

काँग्रेस नेतृत्वाने राज्यसभेच्या उमेदवारीचा प्रस्ताव दिला होता. मात्र, कर्नाटकातील राजकारणात सक्रिय राहण्यासाठी तसेच शेवटच्या श्वासापर्यंत जातीय शक्तींसोबत लढण्यासाठी त्यास नकार दिला, असे सिद्धरामय्या यांनी सांगितले. मी शुद्ध अंतःकरणाने पद सोडत आहे. दोन वेळा लोकांची सेवा करण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी पक्षश्रेष्ठींचे आभार मानतो, असे सिद्धरामय्या यांनी येथे झालेल्या पत्रपरिषदेत राजीनाम्याची घोषणा करताना सांगितले. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत शहरात नसल्याने त्यांचे विशेष सचिव प्रभू शंकर यांच्याकडे राजीनामा सोपवला, असे ते म्हणाले. मुख्यमंत्रिपदाचा मी राजीनामा दिला आहे. घटनात्मक तरतुदींनुसार राज्यपाल तो स्वीकारतील, असा मला विश्वास आहे. मला दोन वेळा संधी मिळाली. त्यासाठी मी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खडगे यांचे आभार मानतो, असे ते म्हणाले. राजीनाम्यासाठी तुमच्यावर पक्षश्रेष्ठींचा दबाव होता का, या प्रश्नाला उत्तर देताना सिद्धरामय्या म्हणाले, कोणता दबाव? मला विचारल्यानंतर मी स्वेच्छेने लगेच राजीनामा दिला. मी शुद्ध अंतःकरणाने पद सोडत आहे, असे ते म्हणाले. मी मूल्यांशी आणि विचारसरणीसोबत कधीच तडजोड केलेली नाही किंवा सत्ता किंवा पैशाच्या पाठीमागे पळत सुटलो नाही. माझी ५० वर्षांची राजकीय कारकीर्द एका खुल्या पुस्तकाप्रमाणे आहे, असे सिद्धरामय्या यांनी ठामपणे सांगितले.



पत्रकार परिषदेत सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांनी हातात हात घेऊन काँग्रेसमध्ये आलबेल असल्याचे संकेत दिले

#### राष्ट्रीय राजकारणात जाण्यास इच्छुक नाही

**राज्यसभेत जाण्याबाबत पक्षश्रेष्ठिंनी मला विचारलो पण, राष्ट्रीय राजकारणात जाण्याची माझी इच्छा नाही. मी राज्यातील राजकारणातच राहील. लोकांनी मला पाच वर्षांसाठी निवडून दिले होते आणि अद्याप दोन वर्षे शिल्लक आहेत. मी कर्नाटक आणि माझ्या मतदारसंघातील लोकांसाठी काम करीत राहील, असे सिद्धरामय्या यांनी सांगितले.**

# पश्चिम आशियात पुन्हा भडकले युद्ध

## इराण-अमेरिकेचे परस्परावर हल्ले

- शांतता करारात विघ्न
- होर्मुझ जलमार्गात अडथळा कायम

**दुबई, २८ मे**

अमेरिकेच्या वायुदलाने होर्मुझ किनाऱ्याजवळील इराणच्या अब्बास बंदरालगतच्या लष्करी तळांवर आणि नौकांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कार्प्सने गुरुवारी होर्मुझजवळील अमेरिकेचे वायू तळ आणि कुवेतमधील लष्करी तळावर क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला. त्यानंतर अमेरिकेच्या सैन्यानेही इराणी लष्कराच्या तळावर हल्ले चढविल्याने मध्यपूर्वेत पुन्हा युद्धाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

अमेरिका-इराणमध्ये शांतता करारासाठी वाटाघाटी सुरू असताना दोन्ही देशांनी परस्परावर हल्ले सुरू केल्याने होर्मुझ जलमार्गातील वाहतूक पूर्वपदावर येण्याची आशा मावळली आहे. आयआरजीसीने निवेदनात म्हटले की, अमेरिकेने संघर्षविरामाचे उल्लंघन केल्याने गुरुवारी त्यांच्या लष्करी आणि वायू तळाला लक्ष्य करून क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा करण्यात आला. अब्बास बंदराजवळ झालेल्या अमेरिकेच्या हल्ल्याचा सूड घेण्यात आला. यापुढे हल्ला झाल्यास इराणकडून यापेक्षाही भीषण आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल. गंभीर परिणामांची जबाबदारी अमेरिकेची असेल. दुसरीकडे अमेरिकेच्या संरक्षण मंत्रालयाने सैन्याच्या सुरक्षेसाठी इराणचे लष्करी तळ आणि नौकांवर हल्ला केल्याचे सांगितले. दोन्ही बाजूने नुकसानीची माहिती देण्यात आली नाही. कुवेतच्या संरक्षणमंत्र्यांनी इराणचे ड्रोन, क्षेपणास्त्र थोपवण्यात यश आल्याचे सांगितले.



#### कराराची घाई नाही



**राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प माध्यमांशी बोलताना म्हणाले, शांतता करारासाठी सुरू असलेल्या वाटाघाटीतून अजून काहीही निष्पन्न झालेले नाही. आम्हाला कराराची कोणतीही घाई नाही. इराणचा समृद्ध युरेनियम साठा रशिया किंवा चीनला देणे मान्य नाही. ओमानला इशारा देताना ते म्हणाले, होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्याच्या प्रक्रियेत त्यांनी हस्तक्षेप करू नये.**

#### शत्रूचे सैनिक जिवंत जाणार नाहीत



**इराणी नागरिकांनी शरणागती पत्करावी अशी अमेरिकेची इच्छा आहे. युद्धाच्या मैदानात पराभव झाल्यानंतर देशात अराजकता पसरविण्याचा कट रचला जात आहे. लष्करी प्रतिष्ठाणांवर हल्ले केल्यास शत्रूचे सैनिक जिवंत परत जाणार नाही असा इशारा, इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांनी दूरचित्रवाणीवरून प्रसारित लेखी संदेशातून दिला.**

# महसूल आणि पोलीस प्रशासनाची वॉश आऊट मोहिम

## अवैध वाळू साठयात १ कोटी ६० लाख तर दिड लाखांचा डिझेल साठा जप्ती

**जळगाव** : जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूकीसंदर्भात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार सावखेडा येथे तापी नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन प्रकरणी महसूल आणि पोलीस प्रशासनाने धडक कारवाई केली. यात अवैध वाळू उत्खननांतर्गत डंपर, पोकलँड, यांत्रीक बोटीं वाळू साठा तर जप्त करीत वाळू वाहतूकदारांना १ कोटी ६० लाख रूपयांची दंडात्मक कारवाई केली. शिवाय शेतकऱ्यांना खरीप हंगामांतर्गत डिझेल टंचाई सामना करावा लागत असताना अमळनेर येथे दिड लाख रूपये किमतीचा तब्बल १४०० लिटर डिझेल साठा देखील जप्त करीत वॉश आऊट मोहिम राबविली. तर दुसरीकडे जळगाव शहर परिसरानजीक बांभोरी पुलाजवळ गिरणा नदीपात्रात देखील १४ ट्रॅक्टर अवैध वाळू उपसा करत असतानाचे दिसून आले आहे.

जिल्ह्यात केवळ सात वाळू गटांचा लिलाव झाला आहे. तसेच मे महिन्यात अन्य वाळू गटांसाठी मुदतवाढ देण्यात आलेल्या वाळू लिलाव प्रस्तावीत आहे. असे असले तरी अनेक वाळू गटांमधून अवैध वाळू उत्खनन मोठया प्रमाणात होत आहे. या संदर्भात तापी नदीपात्रात सावखेडा येथे गुरूवार २८ रोजी प्रशासनाकडे आलेल्या तक्रारीनुसार ६ डंपर, १० पोकलँड आणि १२ यांत्रिक बोटी असे साहित्य जप्त करण्यात आले. तसेच याच ठिकाणी २०० लिटरच्या ड्रममध्ये अवैध डिझेल साठा केला असल्याचे दिसून आल्याने दिड लाख रूपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई अमळनेर तसेच चोपडा उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने केली.




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | Flipkart | amazon.in

*नियम आणि अटी लागू. ऑफर 31 मे 2026 पर्यंत वैध आहे. पल्सर N160 USD सिंगल सीट व्हेरिएंटवर ई-कॉम ऑफर, संबंधित ई-कॉम भागीदाराच्या अटींवर अवलंबून. ई-कॉम ऑफर भागीदारांनुसार बदलू शकतात. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Jalgaon** PAGARIYA BAJAJ 9545221777, 9049240099• **Bhusawal** PAGARIYA BAJAJ 02582-223205 , 9960548889 • **Chalisgaon HERAMMBA BAJAJ 9423774978 ; 7588477033• Dhule** ROYAL BAJAJ 9552537990 • **Deopur** ROYAL BAJAJ 9552547990 • **Nandurbar** RUSHI BAJAJ 9420322905 • **Shahada** RUSHI BAJAJ 9420171621 • **Satana** Siddhi Bajaj 9823220028.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**जळगाव :** राष्ट्रभक्त,स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त स्वातंत्र चौक येथील त्यांच्या पुतळ्या जवळील प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कंजरभाट समाज युवा फाउंडेशन तर्फे जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश बागडे, मुख्य सल्लागार मोहन गारुंगे, कार्याध्यक्ष शशिकांत बागडे, सचिव राहुल नेतलेकर, संदीप गारुंगे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.यावेळी मुख्य सल्लागार मोहन गारुंगे यांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, समाजकार्य व स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.



### अष्टांग योगतर्फे गुणवंतांचा सत्कार

**जळगाव :** अष्टांग योग बहुउद्देशीय संस्थेतर्फे शहरातील खोटे नगरातील जयहिंद कॉलनीतील दहावी व बारावीत अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प, पुस्तक व पेन देऊन सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थिनींमध्ये योगिनी विनोद महाजन हिने दहावीत ९२.२० टक्के, तर प्रतीक्षा अशोक पाटील हिने ७८ टक्के गुण प्राप्त केले आहे. श्रेयस विशाल चिंचोले याने ८९.४०, प्रणव रितेशबोरणारे ८२.२०, मयूर विजय पाटील याने ८० टक्के गुण मिळवले आहे. पराग शशिकांत पवार याने बारावीत अधिक गुण मिळवून यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार श्री अष्टांग योग बहुउद्देशीय संस्थेतर्फे करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा. अविनाश कुमावत, हिरालाल महाजन, अर्जुन कुमावत, राजेंद्र पटवारी, अरुण पाटील, पुना गगणे, विनोद शिंदे, प्रभाकर कुमावत संजय निकम, शैलेश वाघ यांनीही गुणवंतांचा सत्कार केला.

### तरुणीचा विनयभंग

**जळगाव :** मावशीच्या मदतीला जात असताना संशयिताने जबरदस्तीने तरुणीला दुचाकीवर बसवून पीडितेचे फोटो काढले. त्यानंतर पीडितेच्या घरात शिरुन लग्न करण्याचा आग्रह केला. तसेच फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.बुधवारी (२७ मे) सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास ही घटना पीडितेच्या घरात घडली. तक्रारीनुसार याप्रकरणी सागर महाले (वय २८, रा.सकरनगर, धुळे हमु नाशिक) याच्या विराधोत शनिपेठ पोलीस ठाण्यात बुधवारी विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.महिला पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातिर तपास करीत आहेत.

## निधन वार्ता



### शिवदास गुजर; आज अंत्ययात्रा

**शेंदुर्णी ता.जामनेर :** येथील प्रगतिशील शेतकरी शिवदास सखाराम गुजर (वय ८५) यांचे गुरुवार २८ मे रोजी संध्याकाळच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. यांची अंत्ययात्रा शुक्रवार रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे राहते घर गुरु गणपती नगर खंडेराव मंदिराच्या समोर येथून निघेल. ते लोटन (भैय्या) गुजर यांचे वडील होत.



### खतीब तडवी

**यावल :** येथील एसटी आगारातील बस चालक तथातालुक्यातील चुंचाळे, येथील रहिवासी खतीब बशीर तडवी (वय ४६) हल्ली मुक्काम गवळीवाडा, मामाजी टॉकीज, भुसावळ यांचं प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.



### दमोताबाई आमले

**पाचोरा :** येथील रहिवासी दमोताबाई जगन्नाथ आमले (वय-७८) यांचे नुकतेच निधन झाले, त्या सेवानिवृत्त शिक्षक जे .डी पाटील यांच्या पत्नी तर जगदीश पाटील व जवखेडा सिम ग्रामपंचायत सरपंच दिनेश आमले यांच्या मातोश्री होत.



### कैलास भोगे

**फैजपूर :** न्हावी दरवाजा भागातील रहिवासी कैलास उखर्डू भोगे (तेली) यांचे बुधवारी (२७ मे) निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, बहीण, पत्नी, मुलगा, मुलगी, पुतणे, पुतणी असा परिवार आहे.



### प्रदीप अरविंद भट

**अमळनेर :** येथील पिंपळे रोड परिसरातील शंकरनगर भागातील रहिवासी ॲड. प्रदीप अरविंद भट (वय ५७) यांचे बँगलोर येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, सुन, मुलगी, असा परिवार आहे.



### शकुंतला बाविस्कर

**अमळनेर :** शिरुड ता. अमळनेर येथील रहिवासी शकुंतला रंगराव बाविस्कर (वय ८२) यांचे सोमवारी (२५ मे) वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अरविंद बाविस्कर, प्रविण बाविस्कर यांच्या त्या आई होत.



### डिंगबर चौधरी

**.फैजपूर :** येथील आसाराम नगर मधील सेवानिवृत्त शिक्षक डिगंबर पुना चौधरी (वय ७५) यांचे दिनांक २६ मे मंगळवार रोजी सकाळी ६.२२ वा. निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी ,मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### भागवत झांबरे

**फैजपूर :** येथील गजानन वाडीतील रहिवासी शेतकरी भागवत दोधु झांबरे (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने २८ मे गुरुवारी सकाळी निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते जितेंद्र झांबरे व ललित झांबरे यांचे वडील होत.



### कुसुम मोरे

**जळगाव :** शास्त्री नगर,जळगाव येथील रहिवासी कुसुम भगवान मोरे, (वय ७८) याचे मंगळवार, २६ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पती, मुले, मुलगी व नातवंडे असा परीवार आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एक जूनपासून ‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू ‘ मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**धुळे दि २८ मे**

जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी ५ जूनला साजरा करण्यात येतो. यावर्षी जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागामार्फत ‘‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू‘‘ मोहिम १ ते ५ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्याचा समारोप जागतिक पर्यावरण दिनी करण्यात येईल. मोहिमेत सर्व ग्रामपंचायतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिन २०२६ ची संकल्पना ‘हवामान कृती‘ अशी असून मिशन बाबत जनजागृतीसाठी पूर्वतयारी मोहिम राबविण्यात येत आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागातर्फे, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांच्या सहकार्याने ग्रामीण भागात लोकसहभाग व जनभागीदारीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याच्या सुचना आहेत. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) २.० अंतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनात,, ग्रे-वॉटर व्यवस्थापन, परिपत्र अर्थव्यवस्था व ‘‘कचऱ्यापासून संपत्ती‘‘ या संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच गावे हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करण्याच्या उद्दिष्टाद्वारे मिशनच्या दृष्टीकोनाला बळकटी देण्यात येत आहे.

एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचऱ्याच्या प्रभावी व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे. या अनुषंगाने ‘‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू‘‘ मोहिमेत ग्रामीण भागातील संबंधित घटकांना घनकचरा व्यवस्थापन संवेदनशील करणे, कचऱ्याचे स्रोत स्तरावर वर्गीकरण, जुन्या कचऱ्याचे व्यवस्थापन यांचा समावेश आहे.

ग्रामपंचायतीमार्फत सामुदायिक घनकचरा व्यवस्थापन साधन सुविधाचे स्वयंमूल्यांकन व प्रमाणिकरण सुलभ करणे. मिशन विषयांवर जनजागृती निर्माण करून शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणे, स्वच्छता, साधनसुविधांची योग्य कार्यवाही व देखभाल सुनिश्चित करण्यासाठी सम ुदायाना सक्रिय करणे तसेच ‘‘संपूर्ण स्वच्छता‘‘ व गावाबाबत बांधिलकी पुनर्स्थापित करणे. या मोहिमेत विविध उपक्रमांचा समावेश आहे. ५ जूनला ग्रामसभा घेऊन मोहिमेचा समारोप होईल.

या ग्रामसभेत मोहिमेतील उपलब्धी, घनकचरा अधिनियम २०२६ बाबत जनजागृतीवर चर्चा करण्यात यावी. मोहिमे दरम्यान ग्राम पंचायतींमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची नोंद अद्ययावत माहिती वरील निर्धारित मोहिम म ॉड्यूलमध्ये करावयाची आहे. तसेच ग्रामसभेची माहिती पंचायत राज मंत्रालयाच्या निर्धारित अहवाल प्रणाली, मोबाईल ॲप्लिकेशन म्हणजे पंचायत निर्णय पोर्टल तसेच वरील मोहिम मॉड्यूलमध्ये अपलोड करावयाची आहे. जागतिक पर्यावरण दिन २०२६ अंतर्गत हवाम ान कृतीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी लोकसहभाग व सर्व संबंधित घटकांचा सहभाग निश्चित करण्यासाठी प्रत्येक ग्राम पंचायतमध्ये ही मोहीम राबविण्यात यावी, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निशा जाधव यांनी केले.

# शहादा तालुक्यात फेस येथील महानुभाव पंथीय आश्रमात घरफोडी

## ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास!

**शहादा :** तालुक्यातील फेस गावातील महानुभाव पंथाच्या आचार्य श्री. धर्मराज आश्रम मठात अज्ञात चोरांनी गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश करत सुमारे ८ लाख ६ हजार ५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सारंगखेडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ मे च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी मठाच्या मुख्य गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. मठातील महिलांच्या खोल्यांमध्ये ठेवलेले सोन्या-चांदीन्यांसह रोख ३,४८,०००/- रुपये (यात ५०० रुपयांच्या ६१२ नोटा आणि १०० रुपयांच्या ४२० नोटांचा समावेश आहे.). गुरुमाई कुसुमबाई बीडकर यांचे ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ४ अंगठ्या व दोन लाखांची सोन्याची चैन, नेजसदादा यांचे ११ ग्रॅम वजनाचे ५५ हजार रूपये किमतीचे ११ सोन्याचे टिळे, छायाबाई यांची २५ रूपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, निनलबाई यांची १७,५०० रूपयांची ३.५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी. १ किलो वजनाचा चांदीचा समई दिवा (७०,०००/- रु.), १ किलो वजनाचे चांदीचे पूजेचे ताट (७०,०००/- रु.) आणि ३०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने (कमरपट्टा, साखळी, माळ, वाटी, मासोळी इत्यादी - २१,०००/- रु.असे चांदीच्या वस्तू व दागिने आहेत. याप्रकरणी आश्रम व्यवस्थापनाचे काम पाहणारे अनिल गुरुदत्तदादा महानुभाव (वय २७, रा. फेस, ता. शहादा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सारंगखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सारंगखेडा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो. नि. रवींद्र बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण बाऱ्हे करत आहेत.

# पैश्यांचा वादातून मजूरावर बिलाडी शिवारात गोळीबार

**नंदुरबार :** शहरालगत असलेल्या बिलाडी शिवारात उधारीचे पैसे परत दिले नाहीत, तसेच शेतातील मजुरीचे काम सोडल्याच्या कारणावरुन एकाने मजुरावर बंदुकीने गोळी मारुन जखमी केल्याची घटना बिलाडी शिवारात घडली. यागोळीबार प्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी म जुरावर नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असून अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक अश्विनी सानप यांनी केले आहे.

नंदुरबार शिवारालगत बिलाडी शिवारात पप्पु उर्फ संजय आनंदा वाघ (माळी) रा. माळीवाडा नंदुरबार यांचे शेत आहे. या शेतात संजय मंन्साराम ठाकरे रा. एकतानगर नंदुरबार हा मजुरीचे काम करतो. दुपारच्या सुमारास बिलाडी शिवारातील शेतात संजय ठाकरे याने संजय माळी यांच्याकडून घेतलेले उधारीचे पैसे परत दिले नाहीत. तसेच शेतातील मजुरीचे काम सोडले या कारणावरुन वाद केला. वादातून संजय आनंदा वाघ याने हातातील बंदुकीने संजय ठाकरे याच्या कानाजवळ बंदुकीची गोळी मारली. यात संजय ठाकरे जखमी झाला. त्यानंतर त्याला खाली पाडून त्याच्यावर बंदुक रोखत तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. जखमी झालेल्या संजय ठाकरे याला तात्काळ उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गोळीबारात मजूर जखमी झाल्याच्या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिक्षक अश्विनी सानप, अप्पर पोलिस अधिक्षक अशित कांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक हेमंत पाटील, उपनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदिप पाटील, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक निलेश देसले, तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक दिनेश भदाणे, पोलिस उपनिरिक्षक सुनिल भामरे यांनी भेट दिली. घटनास्थळावरुन गोळीचे कवर मिळून आले आहे. संजय मंन्साराम ठाकरे यांच्या फिर्यादीवरुन संशयीत आरोपी पप्पु उर्फ संजय आनंदा वाघ (माळी) रा. माळीवाडा नंदुरबार याच्याविरुध्द तालुका पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम तसेच अन्य नियमांप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार करीत आहेत.

# दोन दुचाकी लंपास करीत चोरट्यांची धूम यावल येथील घटनेने वाहनधारक भयभीत

**जळगाव,२८ मे :** परिसरातून दोन दुचाकी लंपास करुन चोरटे पसार झाले. बुधवारी (२७ मे) सकाळी सात वाजेच्या सुमारास ही घटना यावल येथे हरीओम नगर तसेच तडवी कॉलनीत घडल्या. या प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सागर सुरेश मोरे ( वय २५,रा. हरीओमनगर) यांच्या मालकीची सुमारे ३२ हजार रुपये किमतीची पल्सर (एमएच १९ ईएफ ८६३१) ही घरासमोर लावली होती. चोरट्यांनी हेन्डल लॉक तोडुन ती लंपास केली. त्यानंतर चोरट्यांनी मोर्चा तडवी कॉलनीत वळविला. ईकबाल मैताब तडवी यांच्या मालकीची होंडा शाईन सुमारे २५ हजार रुपये किमतीची ( एमएच १९ सीजी ७६४९) राहत्या घरासमोर लावली होती. चोरट्यांनी या दुचाकीला लक्ष्य करत लांबविली.

चोरीच्या या दोन्ही घटना बुधवारी सकाळी सात वाजता उघडकीस आली. य ा प्रकरणी सागर मोरे यांच्या तक्रारीनुसार ५७ हजार रुपये किमतीच्या दुचाकी चोरी प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांनी घटनास्थळी जावुन माहिती घेतली.पोलीस नाईक वसीम तडवी तपास करीत आहेत.

**ट्रॅक्टर- ट्रॉली नेली चोरुन**

जळगाव : घरासमोर लावलेले फॉर्मटॅक ट्रॅक्टर तसेच ट्रॉली चोरट्याने चोरुन नेले. ही घटना जामनेरपुरा येथे बुधवारी (२७ मे) उघडकीस आली. जामनेर पुरा येथे जितेश राजपुत यांच्या घरासमोरुन सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचे हे ट्रॅक्टर ट्रॉली चोरट्यांनी चोरुन नेले. याप्रकरणी सुरेश शिवराज चव्हाण (वय ४५,रा. आनंदनगर,जामनेर, मुळ रा. घानेगाव तांडा, ता.सोयगाव) यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी जामनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक ईमान सैय्यद तपास करीत आहेत.

# १७०० ब्रास अवैध वाळुचा साठा पोलिसांच्या हाती

## निमगव्हाण येथील कारवाईने वाळू माफियांमध्ये खळबळ

**तभा वृत्तसेवा**

जळगाव,२८ मे : अवैध वाळु उपसा आणि साठेबाजी विरोधात जळगाव पोलिसांनी मोठी ॲक्शन घेत कारवाई केली. तब्बल १७०० ब्रास वाळुचा अवैध साठा पोलिसांनी जप्त केला. निमगव्हाण (ता.चोपडा) येथील कारवाईने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

मौजे निमगव्हाण येथील तापी नदीच्या काठावर दादाजी धुनीवाले देवस्थान आहे. या परिसरात वाळुचा नदी पात्रातून उपसा करुन साठा केला असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

अधिक भावाने वाळुची विक्री करण्यासाठी हा वाळुचा साठा करण्यात आला होता,असा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात चौकशीचे तपासचक्र फिरविल्यानंतर या वाळुच्या साठ्याकडे पोलिसांनी कारवाईला स्वरुप दिले.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या प्रकरणाची गंभीर आणि तत्परतेने दखल घेतली. त्यानुसार पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले. चोपडा उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यासह पोलिसांची मोठी फौज येथे रवाना झाली. महसुल आणि पोलीस प्रशासन यांनी ही कारवाई संयुक्तपणे केली.





घटनास्थळी वाळुचा साठा पाहिल्यानंतर पथकातील अधिकारी थक्क झाले. घटनास्थळावर पंचनामा करुन वाळुचा साठा जप्त केला.

जप्त केलेला हा वाळुचा साठा लाखो रुपयांचा असुन या साठ्यामागे नेमके कोण? या तपासाला गती देण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासुन अवैध वाळुचे उत्खनन आणि चोरटी वाहतूकविषयी तक्रारी करण्यात आल्या होत्या.

**पुढे काय?**

नेहमी अवैध वाळु वाहतूकीसाठी वारंवार चर्चेत येणारे स्पॉट यापुढे पोलीस कारवाईच्या रडारवर येण्याचे संकेत मिळाले आहेत. जळगाव शहराजवळ गिरणानदीपात्रातूनही मोठ्या प्रमाणात वाळुचा उपसा केला जातो. हे परिसर अभ्यासुन कृतीची जोड दिली जाईल,असा सुचक इशारा सुत्रांकडून देण्यात आला आहे.

# मालमत्ता करात १० टक्के सूट

**जळगाव :** जळगाव महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन व निर्धारण विभाग प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ यांचेमार्फत सन २०२६ २७ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टीचा संपूर्ण वर्षाचा कराचा भरणा ३१ मे पर्यंत करणाऱ्या मिळकत धारकांना शासनाचे कर वगळून देय रकमेवर १० टक्के सूट देण्यात आली आहे. ३० व ३१ मे रोजी शासकीय सुटी असली तरी या सवलतीचा लाभ घेण्यासाठी मिळकतधारकांना प्रभाग समिती कार्यालयात कराचा भरणा करता येणार आहे. तरी जळगावशहरातील जास्तीत जास्त मालमत्ता मिळकतधारांनी या संधीचा लाभ घेऊन कराचा भरणा करून जळगाव महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

# धुळ्यात मुख्य बस स्थानकावरून शिक्षिकेचे दोन लाखांचे दागिने चोरी

**धुळे:** शहरातील मुख्य बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत शिक्षिकेच्या पर्समधील दोन लाखांचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. नाशिकला जाण्यासाठी बुधवारी दुपारी अडीचच्या सुमारास बसस्थानकात आल्या. त्यावेळी दागिने चोरी झाले. येथील देवपूर परिसरातील शिक्षिका वंदना हिराजी सावंत (वय ५६, शिवराय नगर, वाडीभोकर रोड देवपूर) बुधवारी (ता.२७) दुपारी अडीचच्या सुमारास धुळे बसस्थानकात आल्या. नाशिकला जाण्यासाठी त्या चोपडा-नाशिक बसमध्ये चढत होत्या. चोरट्यांनी त्यांच्या पर्समधून सोन्याची पोत, सोन्याचे पेंडल, सोन्याचा हार, सोन्याच्या ४ बांगड्या असा दोन लाख ३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. काही वेळातच दागिने चोरी झाल्याचे वंदना सावंत यांच्या लक्षात आले. त्यांनी आरडाओरड केली, कोणीही सापडू शकले नाही, चोरटे पसार झालेले होते. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक एस. पी. साळुंखे तपास करीत आहेत.

# रॅली टाळून इंधन बचतीचा संदेश देत स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

## वीर सावरकर रिक्षा चालक युनियनचापंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

इंधन बचतीसाठी रॅली न काढता वीर सावरकर रिक्षा युनियनतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या उपक्रमाने रिक्षा चालक युनियने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद दिला.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती श्री दिलीप सपकाळे , संस्थापक व जिल्हा अध्यक्ष, वीर सावरकर रिक्षा युनियन यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यासाठी विर सावरकर रिक्षा युनियनच्या ऑफीसपासून सर्व रिक्षा चालक मालक व शहरातील नागरिक युनियन संपर्क कार्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आला. इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर रॅली मार्गक्रम करण्यात आला नाही. तसेच युनियनचे संस्थापक अध्यक्ष दिलीप सपकाळे यांच्या आवाहनाला दाद देऊन जळगांव जिल्ह्यातील सर्व रिक्षा स्टॉप चालक मालक बहुसंख्येने उपस्थित राहिले. सावरकर जयंतीनिमित्त माजी महापौर सीमा भोळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले वाहतूक शाखेचे पोनि संजय गायकवाड व गोसेवाव्रती ॲड. विजय काबरा यांनी मार्गदर्शन केले. विजय वाणी, बापू पाटील, रमेश पैलानी यांची प्रमुख उपस्थिती होती. आभार विनोद सपकाळे यांनी मानले. यावेळी कैलास विसपुते, शशिकांत जाधव, मुकेश चौधरी, पोपट ढोबळे, एकनाथ बारी, सुभाष महाजन, दीपक जोशी, हर्षल कोळंबे, विनोद कोळी, जितू कोळी, सुभाष चव्हाण, लाजी पवार, शंकर ठाकूर, संजय पाटील, रमेश विसपुते, नितेश पाटील, विजय आंबिटकर, कैलास पाटील, विकास पाटील, दीपक धनगर,योगेश धनगर,भूषण जाधव, सोमनाथ पाटील, सुभाष सौचे, गोपाल आहीरे, विवेकानंद बागुल, संजय ठाकूर, गणेश ठाकूर, भास्कर ठाकूर, भुषण भोई, सौरभ नाटुंगे, किरण मराठे, विशाल सोनवणे, संदीप सोनार, किशोर मोरे, संभाजी पाटील, रमेश सोनार, विक्रम पवार, दिपक जोशी, गणेश राऊत, गणेश गुजर यांच्यासह रिक्षाचालक उपस्थित होते.

# अचानक आगीत ठिबक नळ्यासह साहित्य खाक

**जळगाव,२८ मे :** अचानक आग लागुन ठिबकच्या जमा केलेल्या नळ्या,पाईप,ठिबक साहित्य जळुन खाक झाले.ही घटना २४ एप्रिल दुपारी नागदुली (ता.एरंडोल) शेतशिवारात शेत गट नं.५१५ येथे घडली. याप्रकरणी बुधवारी (२७ मे) एरंडोल पोलीस ठाण्यात अकस्मात आगीची नोंद करण्यात आली. प्रदीप संतोष पाटील (वय २९,रा. नागदुली) यांचे नागदुली शिवारात शेत आहे. त्यांनी ठिबकच्या नळ्या, पाईप एका ठिकाणी गोळा करुन ठेवले होते. अचानक येथे आग लाल्याने कृषी साहित्य, ठिबक जळुन खाक झाले. पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड यांनी शेतशिवारात जावुन प्रकार जाणुन घेतला. हवालदार महेंद्रसिंग पाटील हे तपास करीत आहेत.

# अपघातात पाच जण जखमी

**जळगाव :** रस्ता अपघाताच्या वेगवेगळ्या घटनेत गुरुवारी पाच जण जखमी झाले. जखमींना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. अक्षय मानसिंग खैरनार (वय २७,रा.रामानंदनगर) गोल्डी कावना (वय १४,रा.सिंधी कॉलनी), रुपेश गोपीचंद चव्हाण (वय १९,रा.सांगवीतांडा), संदीप मगन नैके (वय २८,रा.भडगाव) तसेच शांताराम राजाराम भालेराव (वय ६०) यांचा जखमींमध्ये समावेश आहे.

**CHANGE IN NAME**

I **SK RAEES SK HANIF**
R/o Nehte
Tal Raver Dist Jalgaon.
Declair By This
Adv.My Old
Name Was
**SHAIKH RAIS**
**SHAIKH HANIF**
Now My New Name Is
**SK RAEES SK HANIF**

**CHANGE IN NAME**

I Lokesh Vasudeo
Mawale Declaer My Old
Name Is
**Lokesh Vasudeo**
**Mawale**
Have Permanentaly
Change Lokesh Vasudeo
Mawale Please Note It
**Lokesh Vadudeo**
**Mawale**
At Post Jalgaon ,
Dist And Tal. Jalgaon

**खरेदीखताचा दस्त हरविल्याबाबतची तमाम जाहिर नोटीस**

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना व को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना **श्री. संजय गोविंदा चौधरी,** रा.संभाजी नगर, रावेर, ता. रावेर, जि. जळगांव यांच्यावतीने या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णनः-** तु.जि. जळगांव, पो.तु.ता.रावेर पैकी **मौजे रावेर** शिवारातील शेत गट नं.११४१/१/१/सी/११४१/१/१/डी, मधील प्लॉट नं.३ यांसी क्षेत्र १५४.०० चौ.मी., **यापैकी पुर्वेकडील प्लॉट क्षेत्र ७७.०० चौ.मी. यांसी चतुःसिमाः- पुर्वेस-** प्लॉट नं.४, **पश्चिमेस-** सदर प्लॉट मधील उर्वरीत जागा व पुढे प्लॉट नं. २, **दक्षिणेस-** ९ मीटर रोड, **उत्तरेस-** गट नं.११४१/१/१.

२) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत गेंदालाल रामलाल पवार यांनी रविंद्र भागवत जावळे यांचे जनरल मुखत्यार प्रकाश राजाराम चौधरी यांचेकडुन दि.१३/९/२००७ रोजी दस्त क्र.१४८१/२००७ अन्वये खरेदी केली.

३) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत शेख फारुख शेख बाबु, शेख अकाराम शेख अहमद खाटीक यांनी गेंदेलाल रामलाल पवार यांचेकडुन खरेदीखताने दि.२०/७/२०१२ रोजी दस्त नं. १८९३/२०१२ अन्वये विकत घेतलेली आहे.

४) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत गोपाल रघुनाथ पाटील यांनी शेख फारुख शेख बाबु, शेख अकराम शेख अहमद खाटीक यांचेकडुन दि. २७/८/२०१२ रोजी दस्त नं. २१२७/२०१२ अन्वये खरेदी केलेली आहे.

**दि.१३/९/२००७ रोजी दस्त क्र.१४८१/२००७, दि.२०/७/२०१२ रोजी दस्त नं.१८९३/२०१२, दि. २७/८/२०१२ रोजी दस्त नं. २१२७/२०१२ चे खरेदीखतांचे मुळ दस्त, मुळ एस.आर.आर. पावती व मुळ इंडेक्स-२ चे उतारे गहाळ झालेले आहे.**

आमचे अशिलांना वर नमुद दस्तांची आवश्यकता आहे. तरी उपरोक्त दस्त कोणासही आढळल्यास नोटीस देणार यांचेकडे किंवा त्यांच्या वकीलांकडुन ७ (सात) दिवसात आणून देण्याचे करावे, काही व्यवहार असल्यास तसे हरकतीद्वारे कळवावे. याउपर सदरचा दस्त न आढळल्यास आमचे अशिल पुढील बँकेसह संपूर्ण व्यवहार करण्यास मोकळे राहतील. सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकारांनी सांगितलेवरुन व माहिती दिलेवरुन आज रोजी प्रसिध्दीस दिली असे.

**सही/-**
**ॲड. शैलेश रविकांत नागला**
**ऑफिसः-** फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

**जळगांव**
**दिनांकः-**
**२८/०५/२०२६**

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग,** डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४–२०२६.
■ फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# अब्राहम कराराला पाठिंबा भोवणार

## दहशतवाद्यांची शाहबाज, मुनीरला धमकी ● पाकिस्तान सरकारविरुद्ध गृहयुद्धाचा इशारा





**इस्लामाबाद, २८ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानसह अनेक मुस्लिम देशांना इस्रायलला मान्यता देणाऱ्या अब्राहम करारावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव वाढवला आहे. तुर्तास पाकिस्तानने करारावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला असला तरी, अमेरिकेच्या दबावामुळे त्यांना कराराला पाठिंबा द्यावा लागू शकतो. अशातच पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांच्या प्रमुखांनी या कराराला विरोध करत लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना खुली धमकी दिली.

पाकिस्तान सरकारने अब्राहन कराराला पाठिंबा दिल्यास देशात गृहयुद्ध भडकवण्याची धमकी लश्कर-ए-तोएबाचा उपप्रमुख सैफुल्ला कसुरी याने जाहीर भाषणातून दिली आहे. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून या कराराला पाठिंबा देण्याची किंमत सत्ताधारी आणि लष्कर प्रमुखाला चुकवावी लागेल असेही त्याने म्हटले आहे. पाकिस्तानी सरकारने इस्रायलला मान्यता दिल्यास देशातील वातावरण बिघडू शकते. इस्रायलशी संबंध प्रस्थापित करणाऱ्या कोणत्याही शासकाला संपवले जाईल. अब्राहम करार स्वीकारणे देशद्रोही कृती असून, जो कोणी हे करेल, मग तो शासक असो, राजा असो किंवा कोणीही असो, त्याला ठार मारले जाईल, नष्ट केले जाईल आणि उद्ध्वस्त केले जाईल अशी जाहीर धमकी शाहबाज आणि मुनीर यांना कसुरीने दिली आहे.

### इस्रायलला मान्यता देणाऱ्यांचा मृत्यू अटळ

मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने, सौदी अरेबिया, पाकिस्तान, कतार, तुर्की, इजिप्त आणि जॉर्डन यांसारख्या प्रमुख मुस्लिम देशांनी अब्राहम करारात सामील होऊन इस्रायलला अधिकृतपणे मान्यता द्यावी, असा प्रस्ताव ट्रम्प यांनी अलीकडेच मांडला आहे. करार स्वीकारण्यासाठी पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांची कोंडी झाली असून, दहशतवादी संघटनांनी देशातील सरकारला उघड धमकी देणे सुरू केले आहे. इस्रायलला मान्यता देणाऱ्यांचा मृत्यू अटळ असल्याचा इशारा लष्करच्या नेत्याने दिला. ■

### कोणतीही महाशक्ती टिकाव धरणार नाही

सैफुल्ला कसुरीने पुढे म्हटले की, कोणत्याही आंतरराष्ट्रीय महाशक्तीमध्ये इस्लामिक देशांना इस्रायलला एक राष्ट्र म्हणून मान्यता देण्यास भाग पाडण्याची ताकद नाही. पाकिस्तान आणि सौदी अरब यांच्यातील मजबूत होत असलेल्या संरक्षण कराराचा हवाला देत, त्याने दावा केला की पाकिस्तानच्या लष्करी क्षमतांची सामरिक पोहोच आता इतकी वाढली आहे की ती इस्रायलच्या प्रभावाचा सामना करू शकते. ■

# कुंपणासाठी १४२ एकर जमीन बीएसएफला सोपविली

### शुभेन्दू अधिकारी यांची माहिती



**कोलकाता, २८ मे**

भारत-बांगलादेश सीमेवर काटेरी कुंपण आणि सीमा चौक्या उभारण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने १४२.७९ एकर जमीन बीएसएफला सोपविली, अशी माहिती मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी दिली.

सीमेवर कुंपण उभारण्यासाठी तसेच पायाभूत प्रकल्पांसाठी ६०० एकर जमीन बीएसएफला देण्याबाबत पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा हा एक भाग आहे. बंगाल सरकारने बीएसएफच्या चौक्या आणि काटेरी कुंपणाचे बांधकाम सुलभ करून सीमा सुरक्षा बळकट करण्यासाठी तीव्र उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यामुळे सीमावर्ती भागांमधील सुरक्षा आणखी वाढली आहे. आणखी काही जमीन आता बीएसएफकडे सोपवण्यात आली असून, यामुळे एकूण क्षेत्र १४२.७९ एकरांवर पोहोचले आहे, असे शुभेन्दू अधिकारी यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले.

नऊ जिल्ह्यांमध्ये बीएसएफकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या जमिनीचा तपशील दर्शवणारा जिल्हावार तक्ताही त्यांनी सामायिक केला.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून, पाच जिल्ह्यांमध्ये संपादित केलेली ४३ एकर जमीन आणि ३१.एकर निहित जमिनीचे मंजुरी आदेश २० मे रोजी बीएसएफकडे सुपूर्द करण्यात आली. गेल्या आठवड्यात अधिकाऱ्यांनी केलेल्या एका मोठ्या धोरणात्मक घोषणेनंतर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यात कुंपण घालण्याच्या कामाला गती देणे आणि अवैध स्थलांतराविरुद्ध कठोर प्रशासकीय उपाययोजना करणे या दुहेरी रणनीतीची रूपरेषा मांडण्यात आली आहे.

### बांगलादेशसोबत २,२१७ किमीची सीमा

पश्चिम बंगालची बांगलादेशाशी २,२१७ किमी लांबीची सीमा जोडलेली आहे. भारतीय राज्यांमध्ये ही सर्वांत लांब सीमा आहे. राज्यातील या सीमेपैकी १,६०० किमी भागावर यापूर्वीच कुंपण उभारण्यात आले आहे, तर जवळपास ६०० किमी भागावर कोणतेही कुंपण नाही.

| स्थान | जमीन (एकरमध्ये) |
|---|---|
| कूचबिहार | २२.९२ |
| जलपाईगुडी | ३५.१६ |
| दार्जिलिंग | ८.८१ |
| उत्तर दिनाजपूर | २.८४ |
| दक्षिण दिनाजपूर | २०.१७ |
| मालदा | १०.९ |
| मुर्शिदाबाद | ३८.८ |
| नाडिया | ०.५५ |
| उत्तर २४ परगणा | २.६ |

# ‘एलएसी’वर रचनात्मक चर्चा

### संबंध सामान्य करण्यासाठी सीमेवरील शांतता गरजेची

**नवी दिल्ली, २८ मे**

भारत आणि चीनने पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीबाबत रचनात्मक चर्चा केली. सीमेवर शांतता व सुव्यवस्था राखल्यामुळेच एकूण संबंध पूर्ववत करण्याच्या प्रक्रियेत प्रगती साधणे शक्य झाल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. बीजिंगमध्ये बुधवारी झालेल्या सल्लामसलत आणि समन्वयासाठीच्या कार्यपद्धतीच्या बैठकीदरम्यान, दोन्ही बाजूंनी सीमा परिस्थितीच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या चर्चा विधायक आणि भविष्यवेधी होत्या, असे परराष्ट्र मंत्रालयाने चर्चेनंतर सांगितले.

२०२० मधील गलवान खोऱ्यातील प्राणघातक संघर्ष आणि त्यानंतर चार वर्षांपेक्षा अधिक काळ चाललेल्या लष्करी संघर्षानंतर जो तीव्र ताण निर्माण झाला होता, तो भरून काढण्यासाठी भारत आणि चीनने मागील वर्षभरात अनेक उपाययोजना केल्या आहेत. दोन्ही बाजूंनी भारत-चीन सीमावर्ती भागांमधील परिस्थितीचा आढावा घेतला.

सीमावर्ती भागांमध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दिशेने झालेल्या प्रगतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यामुळे द्विपक्षीय संबंध हळुहळू पूर्ववत करण्याच्या दिशेने वाटचाल करणे शक्य झाले आहे, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे.

### भारत-चीनदरम्यान विविध मुद्यांवरही चर्चा

दोन्ही बाजूंनी सीमांकन, सीमा व्यवस्थापन, यंत्रणा उभारणी आणि सीमापार सहकार्याशी संबंधित मुद्यांवर चर्चा केली, असे परराष्ट्र मंत्रालयाने डब्ल्यूएमसीसी बैठकीबाबत सांगितले. भारतीय बाजूने सीमापार नद्यांबाबत पुढील तज्ज्ञ-स्तरीय यंत्रणेची बैठक लवकरात लवकर घेण्यावर भर दिला. ■



## ‘केसीपी’च्या कमांडरला दिल्लीत अटक

**नवी दिल्ली, २८ मे**

मणिपुरातील प्रतिबंधित बंडखोर संघटना कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीचा (केसीपी) महत्त्वपूर्ण कमांडर हाओबिजम दिलीप सिंह याला सुरक्षा दलाने संयुक्त कारवाई करीत राजधानी दिल्लीत अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. ही कारवाई दिल्ली पोलिसांची विशेष शाखा, मणिपूर पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांनी केली. त्याच्या चौकशीच्या आधारे सुरक्षा दलांनी मणिपूरच्या काकचिंग जिल्ह्यात एक शोधमोहीम राबवली. यात मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारुगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बंदी घातलेल्या संघटनेचा प्रमुख सदस्य मानला जाणारा हाओबिजाम हा, बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत दाखल असलेल्या १२ पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये फरार होता, असे त्यांनी सांगितले.

# ईडी पथकावर हल्ला करणारे आठ अटकेत

### विजयन् यांच्या घरावरील कारवाईला केला होता विरोध

**तिरुवनंतपुरम, २८ मे**

केरळमध्ये अंमलबारी संचालनालयाच्या (ईडी) अधिकाऱ्यांवरील हल्लाप्रकरणी पोलिसांनी गुरुवारी आठ जणांना अटक केली. माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानावरील छाप्यानंतर झालेल्या हिंसाचारात ही कारवाई करण्यात आली.

विजयन यांच्या निवासस्थानावर ईडीच्या पथकाने छापा टाकला असता कार्यकर्त्यांनी विरोध करत ईडी पथकाच्या ताफ्यावर हल्ला केला. यात वाहनांची तोडफोड करण्यात आली. राज्याचे पोलिस महासंचालक रावडा ए. चंद्रशेखर यांनी गुरुवारी सांगितले की, आतापर्यंत याप्रकरणी आठ आरोपींना अटक केली असून, इतरांची ओळख पटवणे सुरू आहे. ईडीच्या कारवाईबद्दल पोलिसांना कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. छापा सुरू झाल्यानंतर आणि ईडी पथकावर हल्ला झाल्यावर पोलिसांना माहिती मिळाली, त्यानंतर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली.

**३०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

या प्रकरणात ३०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, ज्यात बेकायदेशीर जमाव, दंगल, सार्वजनिक कार्यक्रमात अडथळा, हल्ला आणि हत्येचा प्रयत्न यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याशी संबंधित गुन्हे दाखल केले. जमावाने ईडी अधिकाऱ्यांच्या पथकावर काठ्या आणि दगडांनी हल्ला केला.

## चित्रपट वार्ता

### ‘राजा शिवाजी’ चित्रपटाची विक्रमी कमाई

**मुंबई :** रितेश देशमुख अभिनीत आणि दिग्दर्शित ‘राजा शिवाजी’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी करत आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे रितेश देशमुख व्यतिरिक्त या चित्रटात इतर बॉलिवूड कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. यामुळेही हा चित्रपट प्रेक्षकांनी पाहिला. चित्रपटाने २७ व्या दिवशी ४० लाख रुपयांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. या चित्रपटाने विदेशात ४.२२ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. माहितीनुसार, जागतिक स्तरावर या चित्रपटाने आतापर्यंत ११४.४९ कोटींचे विक्रमी कलेक्शन केले. ■



### सलमानच्या चित्रपटाचे गाणे प्रदर्शित

**मुंबई :** सलमान खानच्या ‘मातृभूमी’ या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली. मात्र ‘मातृभूमी’ या चित्रपटातील ‘मैं हूं हे’ गाणे प्रदर्शित झाले. सलमानने समाज माध्यमावर या गाण्याचा व्हिडीओ शेअर केला. या गाण्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या व्हिडीओमध्ये सलमान खानसोबत चित्रांगदा सिंह दिसते आहे. हे गाणे अत्यंत दु:खद आणि भावनिक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या गाण्यात काही बदल केले जात आहेत. सलमान खानने या चित्रपटातील गाण्याचा टीझर प्रदर्शित केला आहे. हे गाणे श्रेया घोषाल आणि अयानलाल यांनी गायले आहे. हे गाणे शूर सैनिकांनी केलेल्या त्यागाचे चित्रण करते. ■



### कबीर खान करणार काश्मिरात चित्रीकरण



**मुंबई :** अभिनेता कबीर खान कौटुंबिक भावना आणि मुलांशी संबंधित चित्रपट घेऊन येत आहे. चित्रपटात कार्तिक आर्यन मुख्य भूमिकेत आहे आणि कथा एका मुलाच्या आणि एका प्रौढ पात्राच्या नात्याभोवती फिरते. चित्रपटाचे पहिले मोठे शेड्यूल मुंबईतील मड आयलंड येथे पूर्ण झाले. तिथे सुमारे १५ दिवस काश्मीरसारखा सेट तयार करण्यात आला होता. मुंबई शेड्यूल पूर्ण झाल्यानंतर आता चित्रपटाची युनिट काश्मीरमध्ये चित्रीकरण करत आहे. यात चित्रपटाचे भावनिक प्रसंग आणि स्थानिक ठिकाणांवरील दृश्ये चित्रित करण्यात आले. कथेत काश्मीरचा बॅकड्रॉप खूप महत्त्वाची भूमिका बजावतो, त्यामुळे निर्मात्यांनी वास्तविक लोकेशन्सवरही चित्रीकरणाला प्राधान्य दिले आहे. ■

# मोदींचे यजमानपद भूषवणे हा सन्मान : अँथनी अल्बानीज

### द्विपक्षीय संबंध बळकट करण्याला प्राधान्य

**मेलबर्न, २८ मे**

पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्याची घोषणा केली. भारत-ऑस्ट्रेलिया संबंध, व्यापार, संरक्षण आणि इंडो-पॅसिफिक सहकार्य मजबूत करण्यावर भर असल्याचा तसेच, मोदींचे यजमानपद भूषवणे ही सन्मानाची बाब असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



कॅनबेरा येथील संसदेला संबोधित करताना अल्बानीज म्हणाले, भारत दशकातील तिसरी सर्वात मोठी जागतिक आर्थिक शक्ती बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारत ऑस्ट्रेलियासाठी अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. भारताची आर्थिक वाढ ही केवळ एका देशाची उपलब्धी नसून, संपूर्ण इंडो-पॅसिफिक क्षेत्रासाठी एक मोठी संधी आहे. ऑस्ट्रेलिया केवळ एक पॅसिफिक राष्ट्र नसून हिंद महासागर क्षेत्राचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होत आहेत. २०२२ मध्ये स्वाक्षरी झालेल्या आर्थिक सहकार्य आणि व्यापार कराराचा संदर्भ देत ते म्हणाले की, या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध अधिक मजबूत झाले आहेत. ऑस्ट्रेलियातील भारतीय उच्चायुक्त फिलिप ग्रीन यांनी एक्सवरील पोस्टमधून अल्बानीज यांच्या भाषणाची चित्रफीत प्रसारित केली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान भारताबद्दल इतक्या ताकदीने आणि उत्साहाने बोलतात, तेव्हा भारताचे उच्चायुक्त म्हणून काम करणे हा मोठा सन्मान असल्याचे त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले.

### भारत भेटीचा सांगितला अनुभव

भारतातील भेटीचा अनुभव सांगताना अल्बानीज म्हणाले, भारताला खऱ्या अर्थाने समजून घेण्यासाठी बस किंवा ट्रेनने प्रवास करणे हा सर्वोत्तम अनुभव आहे, कारण त्यामुळे देशाची विविधता आणि आपुलकी जवळून अनुभवता येते. मला लवकरच पंतप्रधान मोदींचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळेल आणि हा माझ्यासाठी मोठा सन्मान असेल. दहा लाख भारतीय वंशाचे लोक केवळ देशाची अर्थव्यवस्थाच मजबूत करत नाहीत, तर लहान व्यवसाय आणि समाजातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. ■



उन्हाळी सुट्ट्या आणि ईदच्या सणामुळे रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. प्रवाशी जास्त आणि रेल्वे गाड्या कमी, अशी स्थिती असल्याने प्रवासासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पाटणा रेल्वे स्थानकावर झालेली गर्दी

## निवासी शाळेला आग; १७ विद्यार्थिनी ठार

**नैरोबी, २८ मे**

केनियातील गिलगिल येथील निवासी मुलींची शाळा उटुमिषी गर्ल्स स्कूलला बुधवारी रात्री भीषण आग लागली. यात १७ विद्यार्थिनींचा होरपळून मृत्यू झाला, तर ७९ जखमी आहेत. सरकारने घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

शिक्षण मंत्री ज्युलियस ओंगामा यांनी सांगितले की, गिलगिल येथील उटुमिषी गर्ल्स स्कूलच्या वसतिगृहात अचानक आग लागली. घटनेच्यावेळी बहुतांश विद्यार्थिनी त्यांच्या खोल्यांमध्ये झोपलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना वेळेवर बाहेर पडता आले नाही. बचाव आणि मदत पथके तत्काळ घटनास्थळी दाखल झाली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. वसतिगृहात अडकलेल्या विद्यार्थिनींना बाहेर काढून रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी १७ विद्यार्थिनींना मृत घोषित केले, तर ७९ मुलींवर उपचार सुरू आहे. बचाव पथकाने ६५० पेक्षा अधिक मुलींना सुरक्षित बाहेर काढले. आग कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे.

ही घटना शॉर्ट सर्किटमुळे घडली की इतर कोणत्या कारणामुळे, हे निश्चित करण्यासाठी चौकशीचे आदेश दिले आहेत.

# भारतीयांच्या दैनंदिन आहारात गडबड

### करतात गरजेपेक्षा जास्त पोळी आणि भाताचे सेवन ● भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या सूचना जारी

**नवी दिल्ली, २८ मे**

भारतीय स्वयंपाकघरात पोळी, भात आणि पराठे हे केवळ अन्न नसून ते आपल्या परंपरेचा आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. पोळी, भात आणि पराठ्याशिवाय भारतीय थाळी अपूर्ण मानली जाते आणि लहानपणापासूनच आपल्याला शिकवले जाते की पोटभर जेवण हेच उत्तम जेवण असते.

सकाळच्या नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत बहुतेक घरांतील ताटांमध्ये हेच असते. पण आता एका नवीन सरकारी अभ्यासामुळे आपण खरोखरच संतुलित आहार घेत आहोत का, असा प्रश्न पडला आहे. आजही भारतातील बहुतेक लोक गरजेपेक्षा जास्त धान्य खात आहेत तर प्रथिने, कडधान्ये, हिरव्या भाज्या, फळे आणि दूध यांसारखी आवश्यक पोषक तत्त्वे अत्यंत कमी प्रमाणात घेत असल्याचे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित या अभ्यासात दिसून आले आहे. हा अभ्यास २०२२-२३ च्या घरगुती उपभोग सर्वेक्षणातील माहितीवर आधारित आहे.



अहवालानुसार, देशभरातील अनेक राज्यांमध्ये लोक निर्धारित मासिक मर्यादेपेक्षा खूप जास्त धान्य खात आहेत. विशेषतः ग्रामीण भागात तांदूळ आणि गव्हाचा वापर जास्त होता. दुसरीकडे भाजीपाला आणि कडधान्यांचा वापर अत्यंत कमी होता. एका व्यक्तीला दरमहा अंदाजे ७.५ किलो धान्याची गरज असते, परंतु अनेक राज्यांमध्ये हा आकडा १० ते ११ किलोपर्यंत पोहोचला. पश्चिम बंगाल, ओडिशा, बिहार आणि त्रिपुरा यांसारख्या राज्यांमध्ये ग्रामीण भागात सर्वाधिक धान्य वापराची नोंद झाली. आजच्या धावपळीच्या जीवनात, लोक अधिकाधिक झटपट आणि पोटभर जेवणाला पसंती देत आहेत. ऑफिसला जाण्याची घाई असो किंवा मुलांना शाळेत सोडायचे असो, पोळी आणि भात हा सर्वात सोपा पर्याय झाला आहे.

याचबरोबर प्रक्रिया केलेले अन्न, फास्ट फूड आणि रेस्टॉरंटमधील जेवण खाण्याचा ट्रेंडही झपाट्याने वाढत आहे. यामुळे शरीराला आवश्यक पोषक तत्त्वांची कमतरता भासते आणि लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या गंभीर आजारांचा धोका हळूहळू सर्व वयोगटातील लोकांवर परिणाम करीत आहे. अलिकडच्या वर्षांत आजारांमध्ये झालेल्या वाढीचे हे देखील एक कारण मानले जाते.

### ताटातून होताहेत प्रथिने नाहीशी

आश्चर्यकारक बाब म्हणजे, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये भाज्यांचा वापर अत्यंत कमी आहे. आयसीएमआर दरमहा प्रति व्यक्ती १२ किलो भाज्या खाण्याची शिफारस करत असताना, सर्वाधिक भाज्यांचा वापर करणाऱ्या छत्तीसगड राज्यातही ग्रामीण भागात हे प्रमाण केवळ ६.७ किलो आणि शहरी भागात ८.३ किलो इतकेच नोंदविले गेले. ■

### दरमहा केवळ एक किलो डाळीचे सेवन

आयसीएमआरनुसार, शाकाहारींनी दरमहा अंदाजे २.६ किलो डाळींचे सेवन करावे आणि मांसाहारींनी १.७ किलो डाळींचे सेवन करावे. तथापि, देशभरातील २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील आकडेवारीवरून लोक दरमहा एक किलोपेक्षा कमी डाळींचे सेवन करत असल्याचे दिसून आले. ■

### कॅनडात भारतीय विद्यार्थिनीची हत्या

**ओटावा, २८ मे**

कॅनडामध्ये एका भारतीय विद्यार्थिनीची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. विधी कल्पेशभाई मेघानी, असे हत्या झालेल्या मुलीचे नाव आहे. ती मूळची गुजरातच्या आणंद जिल्ह्यातील बोरसद येथील रहिवासी आहे.

विधी कॅनडातील नियाग्रा भागात राहत होती आणि तिथे शिक्षण आणि नोकरी करीत होती. विधी नियाग्रातल्या तिच्या घरातून बाहेर पडली. त्यावेळी तिच्यावर अज्ञात व्यक्तीने चाकू हल्ला केला. ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तिला रुग्णालयात पोहोचविले. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या प्रकरणी कॅनडा पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. हत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान कॅनडामध्ये भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर हल्ले आणि त्यांची हत्या होणे हे प्रकार नित्याचे झाले आहे.

## अग्रलेख...

# शुद्ध, पवित्र आणि पारदर्शक!

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव म्हणून ज्याचे वर्णन केले जाते, त्या निवडणुकांची पालखी मतदारयाद्यांच्या खांद्यावरून पुढे जात असते. गेल्या काही वर्षांत देशात विरोधकांकडून मतदारयाद्यांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचे अनेक प्रयत्न झालेत. मतदारयादी, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यांच्या तांत्रिक विश्वासार्हतेवर जाहीरपणे आक्षेप घेतले गेले आणि हे वाद थेट न्यायालयांपर्यंत पोहोचले. निवडणुकांचा उत्सव ज्यांच्या अधिकाधिक सहभागातून साजरा करावयाचा असतो, त्या मतदारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्हे उमटविली जात असल्याचा आक्षेपही घेतला गेला. निवडणूक आयोगास सरकारच्या ताटाखालचे मांजर ठरवून मतदारांमध्ये आयोगाच्या स्वायत्ततेबाबत संभ्रम पसरविण्याचाही प्रयत्न झाला. या गदारोळाला आता पूर्णविराम मिळेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. निवडणूक आयोगाने बिहार आणि अन्य राज्यांत पार पाडलेली मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी मोहीम ही नि:संदिग्धपणे शुद्ध कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ती रद्द केली जाऊ शकत नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने, या प्रक्रियेच्या विरोधात सातत्याने गरळ ओकून लोकशाहीचा उत्सव निर्भेळपणे साजरा करण्याच्या सद्‌हेतूवर शंका उमटविण्याचे प्रयत्न आता थंडावतील.

गेल्या वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही मुद्रित माध्यमांत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीविषयी संशय व चिंता व्यक्त करणारे लेख प्रसिद्ध केले होते. त्याआधी फेब्रुवारी महिन्यात लोकसभेतही त्यांनी हाच सूर आळवला होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये बनावट नावे घुसविल्याचा आक्षेप घेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध जोरदार मोहीम उघडली होती. निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या आरोपांतील प्रत्येक मुद्दा सप्रमाण खोडून काढत त्याचे शब्दशः खंडन केल्यानंतरही हा वाद चिघळत ठेवण्याची मोहीम विरोधकांनी सुरू केली होती. राहुल गांधींच्या अशाच आक्षेपाच्या सुरात सूर मिसळणारी एक याचिका त्या दरम्यान सुनावणीसाठी उच्च न्यायालयासमोर होती आणि प्रकाश आंबेडकर यांनी हा सूर हिरिरीने न्यायालयातही आळविला होता. पण न्यायालयानेही हे सारे आक्षेप फेटाळून तर लावलेच, पण अशी याचिका केवळ संभ्रम पसरविण्याच्या व न्यायालयाचा वेळ वाया घालविण्याच्या उद्देशाने केली गेल्याचा ठपका ठेवत याचिकाकर्त्याचे कानही उपटले होते. खरे म्हणजे, निवडणुका, मतदारयाद्यांची स्पष्टता व निवडणूक आयोगाची भूमिका याबाबत चालविल्या गेलेल्या मोहिमेतून पसरणाऱ्या संभ्रमांचे पितळ तेव्हाच उघडे पडले होते. वस्तुतः, बिहारमधील विधानसभेच्या निवडणुकीआधी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेमुळे विरोधकांत अस्वस्थता माजण्याचे काहीएक कारण नव्हते. सुमारे चार दशकांत मतदारयादीमध्ये नोंदविल्या गेलेल्या मतदारांच्या नावांची काटेकोर छाननी सुरू झाल्यानंतर या याद्यांमध्ये नेपाळी, बांगलादेशी, म्यानमारच्या रोहिंग्यांची मतदार म्हणून घुसखोरी झाल्याचेही स्पष्ट झाले आणि निवडणुका जिंकण्याच्या नीतीचे किती अध:पतन झाले याची चुणूकही दिसू लागली. अशी छाननी वेळीच झाली नसती, तर बिहारच्या निवडणुकीत विजयी होऊन लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात दाखल झालेले नेते नक्की कोणाचे प्रतिनिधित्व करतात, याची उत्तरेही कधीच मिळाली नसती. त्यामुळे छाननी प्रक्रियेचे स्वागत होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र आयोगाच्या या मोहिमेवरच आक्षेप घेण्यामागची धास्ती नेमकी कशापायी याचे उत्तर लपून राहिले नव्हते.

अशी पडताळणी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार अबाधित असल्याचा निर्वाळा देऊन सर्वोच्च न्यायालयाने आता या प्रक्रियेवरील सर्व आक्षेपांमधील हवा काढून घेतल्याने दोन बाबी स्पष्ट झाल्या आहेत. पहिली म्हणजे, निवडणूक आयोगाच्या अधिकारावर उमटविली गेलेली प्रश्नचिन्हे, सातत्याने घेतले जाणारे आक्षेप आता पुसले जाणार असून, या देशातील लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार केवळ या देशातील पात्र मतदार असलेल्या नागरिकांनाच असल्याने, बेकायदा घुसखोरांचे या अधिकारांवरील अतिक्रमण हटणार आहे. अशा घुसखोरीमुळे आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये किती गढूळपणा मिसळला असेल, याचा अंदाज करणे काहीसे अवघड आहे, पण सर्वोच्च न्यायालयाने निःसंदिग्ध निर्वाळा देऊन या प्रक्रियेस वैधता बहाल केल्यामुळे आता शुद्धीकरणाची ही प्रक्रिया भारताच्या लोकशाहीस सुदृढ करण्यास साह्यभूत ठरेल यात शंका नाही. मतदारयाद्यांची सखोल पडताळणी ही कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ही प्रक्रिया हाती घेण्याचा निवडणूक आयोगास घटनात्मक अधिकारदेखील आहे असे स्पष्ट करून न्यायालयाने या प्रक्रियेची वैधता पूर्णपणे ग्राह्य धरली आहेच, शिवाय मुक्त, निष्पक्ष आणि न्याय्य निवडणुकांना चालना देण्यासाठी ही प्रक्रिया अनिवार्य असल्याने रद्द केली जाऊ शकत नाही, असेही स्पष्ट केले आहे. मतदारयादीत नाव नसलेली व्यक्ती नागरिक नाही असे नव्हे, पण मतदारयादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक आहे किंवा नाही याची प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार मात्र निवडणूक आयोगास असल्याने, मतदान करण्याचा अधिकार हा अमूल्य असला तरी तो अनिर्बंध नाही, याची जाणीवदेखील या निकालाने करून दिली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांच्यावर प्रश्नचिन्हे लादण्याच्या राजकारणास आता लगाम बसायला हवा. कारण या निकालातूनच विरोधकांचे आक्षेप फेटाळले गेले असून आयोगास आणि केंद्र सरकारला फार मोठा कायदेशीर विजय मिळवून दिला आहे. देशातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल तपासणी मोहिमेचा तिसरा टप्पा सुरू करण्याच्या गेल्या १४ तारखेस आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्रातील सुमारे नऊ कोटी ८६ लाख ६४ हजार मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या एसआयआर मोहिमेची वाटचाल अत्यंत संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. मतदारांची प्रारूप यादी ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, तेव्हा आपल्या नावातील बदल, दुरुस्ती किंवा नवीन नाव नोंदणीचे दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे आयोगाने त्या निर्देशात स्पष्ट केले आहे. त्यामुळे, मतदारयाद्या अंतिम स्वरूपात सिद्ध होतील तेव्हा त्या परिपूर्ण आणि निर्दोष राहतील याची काळजी घेण्याची जबाबदारी केवळ आयोगावरच नव्हे, तर राजकीय पक्ष आणि मतदारांवरही असणार आहे. म्हणजे, कायदेशीर लढाईत न्यायालयाने मतदारयाद्यांच्या तपासणी मोहिमेवरील विरोधकांचे आक्षेप दूर केले असल्याने आता विरोधकांना प्रत्यक्ष मैदानात उतरावे लागेल. मतदारयादीतून आपल्या मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळली जाणार नाहीत, याची काळजी घेण्यासाठी राजकीय पक्षांना आपापले बुथ लेव्हल एजंट्स सक्रिय करावे लागतील. वगळण्यात आलेल्या मतदारांची यादी राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्याचे आणि छाननीसाठी मुदत देण्याचे सुरक्षा कवच जाहीर करून निवडणूक आयोगाने राजकीय वाद टाळण्याचा पारदर्शक प्रयत्न केला आहे. त्याचा काटेकोर वापर करत या शुद्धीकरण मोहिमेस हातभार लावून कालपरवापर्यंत सुरू ठेवलेल्या संभ्रम पसरविण्याच्या मोहिमांना विरोधकांनी पूर्णविराम दिला, तर विश्वासार्हता जपण्यासाठी ते महत्त्वाचे ठरेल. कारण ही मोहीम म्हणजे केवळ कागदोपत्री दुरुस्तीचाच उपक्रम नाही, तर लोकशाहीच्या शुद्धीकरणाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्वाळ्याने या मोहिमेला कायदेशीर पावित्र्य दिले आहे. एकही वैध मतदार मतदानापासून वंचित राहू नये आणि एकही अवैध मतदार यादीत असू नये, या दोन्ही तत्त्वांचा समतोल राखून हे पावित्र्य जपण्याची जबाबदारी आता सर्वांचीच राहणार आहे.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# आय. टी. आर. भरताना ही चूक करू नका!

**मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदल आणि योग्य आय. टी. आर. निवडीचे महत्त्व**

आयकर रिटर्न भरण्याचा हंगाम सुरू झाला की बहुतांश करदात्यांसमोर एकच प्रश्न उभा राहतो- ''मला कोणता आय. टी. आर. भरायचा?'' अनेक वेळा लोक इंटरनेटवरील माहिती, मित्रांचा सल्ला किंवा मागील वर्षाचा अनुभव वापरून रिटर्न भरतात. काही वेळा 'सोपे आहे' म्हणून आय. टी. आर. -१ निवडला जातो, तर काही जण फक्त फॉर्म १६ पाहून रिटर्न फाईल करतात. मात्र, योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ एक औपचारिकता नसून संपूर्ण कर अनुपालन प्रक्रियेतील सर्वांत महत्त्वाची पायरी आहे. चुकीचा आय. टी. आर. निवडल्यास भविष्यात नोटीस, परतावा मिळण्यास विलंब, अतिरिक्त कर, दंड आणि काही प्रकरणांमध्ये संपूर्ण रिटर्न अवैध ठरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रिटर्न भरण्यापूर्वी ''कोणता आय. टी. आर. माझ्यासाठी योग्य आहे?'' हा प्रश्न विचारणे अत्यंत आवश्यक झाले आहे. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विभागाने आय. टी. आर. -१ मध्ये काही महत्त्वाचे बदल केले आहेत. या बदलांमुळे अनेक करदात्यांना दिलासा मिळणार असला तरी योग्य आय. टी. आर. निवडण्याची जबाबदारी अधिक वाढली आहे. पूर्वी

आय. टी. आर. -१ हा फॉर्म मुख्यतः पगारदार व्यक्ती, पेन्शनधारक आणि मर्यादित उत्पन्न असलेल्या करदात्यांसाठी वापरला जात असे. मात्र आता दोन घराची मालमत्तापर्यंतची माहिती आय. टी. आर. -१ मध्ये देता येणार आहे. त्यामुळे स्वतःचे एक घर आणि दुसरे भाड्याने दिलेले घर असलेल्या व्यक्तींना किंवा दोन निवासी मालमत्ता असलेल्या कुटुंबांना याचा फायदा होणार आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि गृहकर्जाच्या उपलब्धतेमुळे अनेक कुटुंबांकडे दोन मालमत्ता असतात. त्यामुळे हा बदल मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गीय करदात्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

याचबरोबर, शेअर मार्केट आणि म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणाऱ्या करदात्यांसाठीही एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. पूर्वी लहान प्रमाणात दीर्घकालीन भांडवली नफा असतानाही अनेक करदात्यांना आय. टी. आर. -२ भरावा लागत होता. आता कलम ११२अ अंतर्गत १.२५ लाखांपर्यंत दीर्घकालीन भांडवली नफा असल्यास आणि काही अटी पूर्ण होत असल्यास आय. टी. आर. -१ वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. एसआयपी, इक्विटी म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील गुंतवणूक वाढत असताना हा बदल मोठ्या प्रमाणात पगारदार गुंतवणूकदारांसाठी




दिलासादायक ठरू शकतो. मात्र, यामध्ये भांडवली तोटा पुढे नेणे नसणे आणि इतर प्रकारचे भांडवली नफा नसणे यासारख्या अटी लक्षात घेणे आवश्यक आहे.

मात्र, आय. टी. आर. -१ मध्ये सवलती वाढल्या म्हणजे प्रत्येकासाठी आय. टी. आर. -१ योग्य ठरेल असे नाही. अनेक वेळा करदाते फक्त सोयीसाठी किंवा कमी माहितीमुळे चुकीचा फॉर्म निवडतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे भांडवली नफा, परकीय मालमत्ता, कंपनी संचालक पद, असूचीबद्ध शेअर्स किंवा व्यावसायिक उत्पन्न असेल आणि तरीही त्यांनी आय. टी. आर. -१ भरला, तर पुढे गंभीर अडचणी निर्माण होऊ शकतात. आज आयकर विभाग एआयएस, फॉर्म २६एएस, टीडीएस डेटा, म्युच्युअल फंड व्यवहार, मालमत्ता नोंदणी, व्याज उत्पन्न आणि इतर अनेक माहिती स्रोत एकत्र करून परत सत्यापित करा करतो. त्यामुळे चुकीची माहिती किंवा चुकीचा फॉर्म वापरणे सहज लक्षात येते.

चुकीचा आय. टी. आर. भरल्यास सर्वांत प्रथम सदोष परतावा सूचना येण्याची शक्यता असते. कलम १३९(९) अंतर्गत विभाग सदोष परतावा घोषित करू शकतो आणि ठरावीक कालावधीत दुरुस्ती करण्यास सांगू शकतो. वेळेत सुधारणा केली नाही तर अवैध परत करा होण्याचा धोका निर्माण होतो. याचा अर्थ असा की जणू परतावे भरलाच गेला नाही. त्यानंतर विलंब शुल्क, व्याज आणि नॉन-फाइलिंगचे परिणाम लागू होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये परतावा प्रक्रिया देखील थांबू शकते. अनेक करदाते परतावा का अडकला हे शोधत असतात, परंतु त्यामागे चुकीचा

आय. टी. आर. किंवा माहितीतील जुळत नाही हे कारण असते.

आज ए. आय. एस आणि फॉर्म २६एएस चे महत्त्व प्रचंड वाढले आहे. अजूनही अनेक करदाते फक्त फॉर्म १६ वर आधारित परतावे भरतात, परंतु ही सवय धोकादायक ठरू शकते. बँकेवरील व्याज, म्युच्युअल फंड रिडम्प्शन, लाभांश उत्पन्न, मालमत्ता व्यवहार किंवा इतर व्यवहार ए. आय. एस.मध्ये दिसत असतात. त्यामुळे परतावे भरण्यापूर्वी ए. आय. एस., टी. आय. एस. फॉर्म २६एएस, बँक स्टेटमेंट आणि भांडवली नफा विवरण तपासणे अत्यंत आवश्यक आहे.

योग्य आय. टी. आर. निवडण्यासाठी एक साधा नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे- ''उत्पन्नाचा स्रोत आय. टी. आर. ठरवतो, सोय नाही.'' फक्त पगार, व्याज उत्पन्न आणि मर्यादित घराच्या मालमत्तेचे उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -१ योग्य ठरू शकतो. भांडवली नफा, एकाधिक मालमत्ता किंवा परकीय उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -२ लागू होऊ शकतो. व्यवसाय किंवा व्यवसाय असल्यास

आय. टी. आर. -३ किंवा अनुमानित योजना असल्यास आय. टी. आर. -४ लागू होऊ शकतो. चुकीचा

आय. टी. आर. भरून नंतर सुधारित परतावा करण्यापेक्षा सुरुवातीपासून योग्य परतावे भरणे अधिक सुरक्षित असते. आज आय. टी. आर. हा केवळ कर अनुपालन दस्तावेज राहिलेला नाही. गृह कर्ज, व्यवसाय निधी, व्हिसा प्रक्रिया, सरकारी निविदा, मालमत्ता व्यवहार आणि बँकिंग उद्देश साठी आय. टी. आर. महत्त्वाचा दस्तऐवज बनला आहे. त्यामुळे चुकीचा आय. टी. आर. भविष्यात आर्थिक विश्वासार्हतेवरही परिणाम करू शकतो. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदलांमुळे काही करदात्यांसाठी प्रक्रिया अधिक सुलभ झाली असली तरी एक गोष्ट स्पष्ट आहे- योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ तांत्रिक बाब नाही, तर आर्थिक सुरक्षिततेची गरज आहे. रिटर्न भरण्यापूर्वी सर्व उत्पन्न स्रोत तपासा, योग्य माहिती पडताळा आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या. कारण एक चुकीचा आय. टी. आर. हा केवळ एक फॉर्म नसून भविष्यातील अनेक अडचणींची सुरुवात ठरू शकतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# साराजेवो सफारी

आपण भारतीय (अपवाद वगळता) नीतिमूल्ये मानणारे, देवाधर्माचे करणारे थोडक्यात पापभिरू असतो. सुखाच्या आणि आनंदाच्या आपल्या कल्पना खूप काही जगावेगळ्या नसतात. कुटुंबासोबत फिरायला जायचा विचार आला की, पहिला विचार असतो सफारीचा! सफारी म्हणताच डोळ्यांपुढे येते ती गर्द वनराई, रुबाबदार पण हिंस्त्र श्वापदांची डौलदार चाल, एखादा नवा पदार्थ, मोकळी हवा, भरपूर फोटोज आणि क्षणभर विश्रांती! पण, जगात सर्वत्र असे नाही. ज्या युरोपला शिस्त, स्वच्छता आणि आधुनिकतेसाठी आदर्श मानले जाते तिथे 'साराजेवो सफारी' हा बीभत्स प्रकार अस्तित्वात आला.

गेल्याच आठवड्यात बोस्निया युद्धातील गुन्ह्यांची सुनावणी नव्याने सुरू झाली आणि साराजेवो सफारी पुन्हा चर्चेत आली. साराजेवो हे युरोपातील एक सुंदर शहर! पहिल्या महायुद्धाची ठिणगी जिथे पडली ते साराजेवो! बोस्निया आणि हर्जगाव्हिना या दोन देशांची सामायिक राजधानी असलेल्या साराजेवोला १९९२ ते १९९५ दरम्यानच्या घटनाक्रमाने वॉर टुरिझमचे केंद्र म्हणून ओळख मिळाली. या काळात साराजेवोत मृत्यूने थैमान घातले. एकीकडे भीषण युद्धाला तोंड फुटले असताना, साराजेवोमध्ये मात्र महिला आणि लहान मुलांच्या हत्यांना ऊत आला होता. शहराच्या बाहेर असलेल्या डोंगरांवर बसून, स्नायपर दुर्बिणीने रस्त्यावर दिसलेल्या माणसांना टिपून त्यांची 'शिकार' करायची, असा हा श्रीमंती शौक! या खुल्या हत्यांसाठी हजारो डॉलर्स मोजले जात होते. स्नायपर सफारी सुरू असताना, घराबाहेर निघणे एवढाच त्या बिचाऱ्यांचा गुन्हा होता. सुरुवातीला कोण, कुठून आणि कशाला गोळ्या घालतंय? याचा काही अंदाजच येत नव्हता. विदेशातून आलेले गर्भश्रीमंत पण अमानुष लोक गंमत म्हणून या लोकांना मारत होते. भारतात राजेरजवाडे शिकारीला जात, तसे हे माणसांची शिकार करत होते. पैसे देऊन, स्नायपरने निशाणा लावायचा. शिकार मिळाली



तर छानच पण, नाही मिळाली तर आणखी पैसे देऊन खेळ सुरू ठेवायचा. बोस्नियाच्या सैन्याने ४ वर्षे साराजेवोला घेराव घातला होता आणि याच काळात साराजेवो सफारी सुरू झाली आणि फोफावली. त्यावेळी, युगास्लोव्हाकीयापासून वेगळे होऊन स्वतंत्र राष्ट्र बनण्यासाठी बोस्नियाचे लोक प्रयत्नशील होते. पण, बोस्नियाई सर्ब सैन्य मात्र याविरोधात होते. नागरिकांवर सूड उगविण्याची ही अमानुष पद्धत सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी अमलात आणली. घराबाहेर निघणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण! शाळा-ऑफिसेस तर कधीच बंद पडलीत. दैनंदिन वस्तूंचा तुटवडा झाला. वेळेवर औषधं न मिळाल्यानेही मृत्यू झाले. शहरातील 'स्नायपर ऐली' नावाच्या रस्त्यावर सर्वाधिक मृतदेह सापडल्याची नोंद झाली.

या नृशंस हत्याकांडावर खरी चर्चा सुरू झाली ती २०२२ मध्ये आलेल्या 'साराजेवो सफारी' या माहितीपटानंतर! स्लोव्हेनियाच्या मिरान झुपनिक याने प्रत्यक्षदर्शींचे अनुभव, मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबीयांच्या मुलाखती, शहरातील इमारतींमध्ये रुतलेल्या गोळ्या असे सगळे जगासमोर आणले आणि या घटना खोट्या असल्याचे दावे फोल ठरले. पत्रकार दोमगाज मार्गेटीक यांच्या 'पे ॲण्ड शूट' या पुस्तकाने ऑस्ट्रियामध्ये ही चर्चा आणि खुल्या तपासाला सुरुवात झाली. गेल्या वर्षी इटलीच्या मिलानमध्ये या संदर्भातील गुन्हे नोंदविण्यात आले. चार वर्षे चाललेल्या शहराच्या घेरावात ११ हजारांवर लोक मारले गेले. यात वृद्ध, महिला आणि मुलांची संख्या लक्षणीय होती. गंमत म्हणून माणसाची शिकार करणाऱ्यांमध्ये अमेरिकन, ऑस्ट्रियन आणि इटलीची बडी धेंडं हौशीने सहभागी झालीत. शहराची घेराबंदी आणि शहराबाहेरच्या डोंगरांवर बसलेले हौशी शिकारी अशा दुहेरी कात्रीत निष्पाप नागरिक फसले होते. या सफारीच्या माध्यमातून सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी जबर कमाई केली. एका स्नायपर टुरिस्टकडून महिला-मुलांची शिकार करण्यासाठी ९० हजार डॉलर्स घेतले जात होते. हे 'शिकारी' आज ८०-९० वर्षांचे आहेत आणि त्यांची चौकशी सुरू आहे, यापेक्षा दुर्दैव आणखी काय असेल? दरम्यान, यापैकी एकही घटना कोणत्याही न्यायालयात सिद्ध होऊ शकलेली नाही. पण, लोकांचे अनुभव माणुसकीला काळिमा फासणारे आहेत. आपल्या मुंबईत ६० च्या दशकात रामण राघव या देशातील पहिल्या सीरियल किलरने दहशत निर्माण केली होती. थंड डोक्याने ४१ हत्या करणारा राघव मानसिक रुग्ण होता. तो एक होता पण, साराजेवोमध्ये येऊन माणसांना टिपणारे त्याच्यासारखे कित्येक इतिहासाच्या उदरात गडप झाले. सध्याचे फ्री फायर आणि पब जीसारखे खेळ 'क्रेझीनेस'च्या नावाखाली मनोरुग्णांची पिढी घडवत आहेत का?

९८५०३३९२४०

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# शहरातील 'सर्क्युलर इकॉनॉमी'

आधुनिक महानगरांचे स्वरूप एका विलक्षण विरोधाभासाचे प्रतीक बनले आहे. ही शहरे स्वतःचा विस्तार करताना एकाच वेळी स्वतःची उभारणी आणि स्वतःचे विघटनही करत असतात. एका बाजूला नवीन इमारती, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग, महामार्ग आणि व्यावसायिक संकुले उभी राहत असतात, तर दुसऱ्या बाजूला जुनी बांधकामे जमीनदोस्त केली जात असतात. या अखंड चक्रातून निर्माण होणारा बांधकाम आणि पाडकाम कचरा म्हणजेच 'कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमॉलिशन वेस्ट' (सी ॲण्ड डी वेस्ट) हा आजच्या शहरीकरणाचा सर्वांत मोठा; पण सर्वांत कमी गांभीर्याने घेतला गेलेला प्रश्न ठरत आहे. भारतात दरवर्षी निर्माण होणाऱ्या या कचऱ्याचे प्रमाण १५० दशलक्ष टनांपासून ५०० दशलक्ष टनांपर्यंत असल्याचे विविध अंदाज सांगतात. या आकडेवारीतील प्रचंड तफावतच एक गंभीर समस्या अधोरेखित करते, ती म्हणजे आपण शहरांचा विकास मोजतो आहोत; पण त्या विकासातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे अचूक व्यवस्थापन अजूनही आपल्या हाताबाहेर आहे. वेगाने होणारे नागरीकरण आणि सातत्याने सुरू असलेली बांधकामे यामुळे दिल्ली दररोज सुमारे बारा हजार पाचशे टन घनकचरा निर्माण करते. यातील जवळपास पन्नास टक्के हिस्सा 'सी ॲण्ड डी' कचऱ्याचा असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे या कचऱ्यामध्ये पुनर्वापराची मोठी क्षमता आहे. दिल्ली महानगरपालिका या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी बक्करवाला, बुराडी, शास्त्री पार्क आणि राणीखेडा येथे चार पुनर्प्रक्रिया प्रकल्प चालवते. त्यांची एकत्रित क्षमता पाच हजार टन प्रतिदिन इतकी आहे. याशिवाय ओखला येथील टेकखंड परिसरात आणखी एक हजार टन क्षमतेचा प्रकल्प उभारला जात आहे.

ही केवळ कचरा प्रक्रिया केंद्रे नाहीत, तर शहरी व्यवस्थापनाच्या नव्या विचारसरणीची प्रतीके आहेत. याउलट, नवी दिल्ली महानगरपालिका अधिक विकेंद्रित पद्धतीने हा प्रश्न हाताळत आहे. येथे दररोज निर्माण होणारा ३५ ते ४० टन 'सी ॲण्ड डी' कचरा स्वतंत्र यंत्रणेद्वारे गोळा करून शास्त्री पार्क पुनर्प्रक्रिया प्रकल्पात वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया केला जातो. या दोन वेगवेगळ्या मॉडेल्समधून एक महत्त्वाचा संदेश मिळतो, तो म्हणजे 'सी ॲण्ड डी' कचरा व्यवस्थापनासाठी एकच सार्वत्रिक उपाय असू शकत नाही. प्रत्येक शहराच्या लोकसंख्येची घनता, प्रशासनाची क्षमता आणि उपलब्ध संसाधने यानुसार वेगवेगळ्या पद्धती विकसित कराव्या लागतील. गुरुग्राम आणि फरिदाबाद यासारख्या शहरांमध्येही या दिशेने प्रयत्न सुरू आहेत; पण त्यांची प्रगती वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. गुरुग्राममध्ये दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे दीड हजार टन 'सी ॲण्ड डी' कचऱ्यापैकी ८० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते, तर उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत. दुसरीकडे, फरिदाबादमध्ये जमीननिश्चिती आणि नियोजन पूर्ण झाले असले, तरी प्रत्यक्ष प्रक्रिया केंद्र अद्याप कार्यान्वित झालेले नाही. यावरून स्पष्ट होते की धोरणात्मक इच्छाशक्ती असली तरी पायाभूत क्षमता उभारणे ही वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.

भारत सरकारने २०२५ मध्ये जाहीर केलेले 'सी ॲण्ड डी वेस्ट मॅनेजमेंट रुल्स' या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. या नियमांमध्ये प्रथमच 'एक्सटेंड प्रोड्युसर रिस्पॉन्सिबिलिटी' (ईपीआर) म्हणजेच बांधकाम करणाऱ्यांवरच कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. २०२५-२६ मध्ये २५ टक्के पुनर्वापराचे उद्दिष्ट ठेवून २०२८-२९ पर्यंत ते शंभर टक्क्यांपर्यंत नेण्याचा निर्धार करण्यात आला आहे. एक एप्रिलपासून हे नियम लागू झाले आहेत. या धोरणात्मक बदलामागील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कचरा निर्माण करणारा आणि त्याच्या पुनर्वापराची जबाबदारी स्वीकारणारा यांच्यातील तुटलेला संबंध पुन्हा जोडण्याचा प्रयत्न; मात्र केवळ नियम बनवून प्रश्न सुटत नाहीत. अनेकदा प्रशासनाची भूमिका 'कचरा हटवा' म्हणण्याइतपतच मर्यादित राहते. पंतप्रधान कार्यालय आणि गृहनिर्माण तसेच शहरी व्यवहार मंत्रालयाने मार्च २०२६ मध्ये दिल्लीतील एक लाख मेट्रिक टन 'सी ॲण्ड डी' कचरा हटवण्याचे अभियान राबवले; परंतु प्रक्रिया आणि पुनर्वापर यंत्रणा सक्षम नसेल, तर हा कचरा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवण्यापलीकडे फारसा फरक पडत नाही. म्हणूनच स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर अधिक कठोर आणि परिणामकारक धोरणांची आवश्यकता आहे. दिल्ली महानगरपालिकेने नोव्हेंबर २०२५ मध्ये स्वतःच्या बांधकाम आणि देखभाल प्रकल्पांमध्ये पुनर्प्रक्रिया साहित्याचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, कारण पुनर्प्रक्रिया उद्योगाला सर्वांत मोठी गरज असते, ती स्थिर बाजारपेठेची.

सरकारी प्रकल्पांनीच पुनर्प्रक्रिया साहित्य स्वीकारल्यास खाजगी गुंतवणूक आणि प्रक्रिया पायाभूत सुविधा वेगाने विकसित होऊ शकतात. याचबरोबर कठोर अंमलबजावणीही आवश्यक आहे. गुरुग्राम महानगरपालिकेने २४ तास देखरेख, दंडात्मक कारवाई आणि निश्चित संकलन केंद्रांची व्यवस्था करून अनधिकृत डम्पिंगवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला आहे. चेन्नईमध्ये तर २०२६ पासून नियम मोडणाऱ्यांवर प्रति टन पाच हजार रुपयांपर्यंत दंड, वाहन जप्ती आणि 'रिअल-टाईम मॉनिटरिंग' यासारखी कठोर पावले उचलण्यात आली आहेत. हे बदल सूचित करतात, की भारतातील शहरी प्रशासन आता केवळ स्वच्छतेच्या पलीकडे जाऊन संसाधन व्यवस्थापनाच्या व्यापक चौकटीत विचार करू लागले आहे. तथापि, सर्वांत मोठे आव्हान मानसिकतेचे आहे. अनेकांना पुनर्प्रक्रिया साहित्य म्हणजे कमी दर्जाचे साहित्य अशीच धारणा आहे. त्यामुळे त्याचा वापर प्रामुख्याने भराव, लॅण्डफिल किंवा कमी मूल्याच्या कामांपुरताच मर्यादित राहतो. भारतामध्ये विकासाची व्याख्या दीर्घकाळ नव्या इमारती, रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांपुरती मर्यादित राहिली; परंतु आता विकासाच्या या पारंपरिक संकल्पनेत मोठा बदल घडताना दिसत आहे. 'सर्क्युलर इकॉनॉमी' किंवा पुनर्वापराधारित अर्थव्यवस्था ही संकल्पना वेगाने केंद्रस्थानी येत आहे. विशेषतः बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणारा कचरा म्हणजेच 'सी ॲण्ड डी वेस्ट' हा केवळ टाकाऊ अवशेष नसून भविष्यातील पायाभूत विकासासाठी एक महत्त्वाचा संसाधनसाठा ठरू शकतो, ही जाणीव आता धोरणकर्त्यांना आणि उद्योगक्षेत्रालाही होऊ लागली आहे. भारतासारख्या झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या देशात ही जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत शहरांमधील बांधकाम कचरा प्रशासनासाठी डोकेदुखी मानली जात होती. रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या भूखंडांवर, नाल्यांमध्ये किंवा शहरांच्या बाहेरील भागांमध्ये हा कचरा अनियंत्रितपणे टाकला जात असे. त्यामुळे प्रदूषण, धूळ, वाहतूक अडथळे आणि पर्यावरणीय हानी वाढत होती; परंतु आता या कचऱ्याकडे 'वेस्ट' म्हणून नव्हे, तर 'रिसोर्स' म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित होत आहे. यामागे केवळ पर्यावरणीय कारणे नाहीत, तर आर्थिक आणि पायाभूत गरजाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. नैसर्गिक खनिज संसाधने मर्यादित आहेत, बांधकाम साहित्याच्या किमती वाढत आहेत आणि शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत आहे. अशा वेळी पुनर्प्रक्रिया केलेल्या बांधकाम कचऱ्याचा वापर हा शाश्वत पर्याय ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### लग्नाची समस्या विक्राळ रूप धरतेय

सध्या लग्नसराई सरत आली असली तरी गुडघ्याला बाशिंग बांधून असणाऱ्या कित्येक तरुण मुलांचे लग्न जुळत नसल्याने कुटुंबापुढे एक नवा पेच उभा राहिल्यासारखा झाला आहे. त्या तुलनेने कमी असलेल्या मुलींच्या कुटुंबीयांच्या अपेक्षा वाढल्याने कित्येक सुशिक्षित तरुणांनी लग्नाच्या प्रतीक्षेत पस्तीशी ओलांडल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र, ही समस्या इतकी विक्राळ रूप धारण करेल की कुणी मुलगा आपल्या आईला जिवंत जाळेल असे वाटले नव्हते. धुळे येथे प्रदीप पाटील नावाच्या ४५ वर्षीय व्यक्तीने लग्न होत नसल्याच्या रागातून स्वतःच्या ६५ वर्षीय आईलाच कारणीभूत ठरवून तिला थीनर टाकून पेटवून दिल्याची घटना नुकतीच घडली. जन्मदात्या आईसाठी ज्या डोळ्यांतून सुखाचे थेंब गळायला हवे होते, त्या डोळ्यांत अशी खुनशी आग पाहून येणारा काळ किती भयंकर असेल, याची चाहूल या निमित्ताने लागलेली आहे.

**लीलाधर दवंडे**

### मराठी भाषेबाबत उदासीनता नको

मराठीचा अभिमान हवा. कारण आपण महाराष्ट्रात राहतो. आपली मातृभाषा आहे तिच्यावर आपले प्रेम असावे. पण चित्र अगदी उलट आहे. व्यवहार करताना उदा. भाजीवाला, रिक्षावाला आधी हिंदीत बोलतात. मग आपण त्यांच्याशी मराठीत बोललो तर ते मराठीत बोलतात. बोर्डाच्या निकालात मराठीत नापास होणारे जास्त आहेत. याची कारणे खूप आहेत. महत्त्वाचे कारण आहे भाषेविषयीचे अज्ञान.

शाळेत लक्ष दिले जात नाही. सर्व स्तरांतून विद्यार्थी येतात. प्रत्येक कुटुंबात वेगळी बोलीभाषा बोलली जाते. शुद्ध भाषा शिकायचा प्रयत्नच केला जात नाही. मित्रांमध्ये मराठी सोडून इतर भाषांमध्यं बोलले जाते. संवाद नाही. शब्दसामर्थ्य नाही. बरेच शब्द माहिती नाही. आणखी एक म्हणजे कुटुंबात आपापसात बोलणे कमी झाले आहे. शेवटचे म्हणजे इंग्रजी माध्यम शाळा. पालक इंग्रजी माध्यम शाळाच निवडतात. मग मराठी दुय्यम होते. मराठीच्या तासिकांकडे लक्षच दिले जात नाही. परीक्षेच्या वेळी कशीतरी तयारी केली जाते. मग गुण कसे मिळणार? मराठी भाषेकडे लक्ष दिले पाहिजे. फक्त मराठी भाषादिनी खूप चर्चा करायची आणि नंतर विसरून जायचे. त्यामुळे मराठीविषयी उदासीनता दिसून येते. मराठी टिकवा, त्याचा अभिमान बाळगा.

**अंजली पळणीटकर**

●● ●●

### अपघातग्रस्त कुटुंबांना आधार देणे शासनाचे कर्तव्य

जनगणनासारख्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या कामासाठी उन्हाच्या तीव्रतेत काम करताना राज्यात एका शिक्षिकेसह इतर चार शिक्षकांच्या विविध कारणांनी मृत्यूच्या घटना या बातम्या जीवाला चटका लावून गेल्या. राष्ट्रउभारणी हातभार, भावी पिढीच्या भविष्यातील तरतुदी अशा अनेक राष्ट्र विकास धोरणांच्या अंमलबजावणीसाठी जनगणना मोहीम देशपातळीवर राबवली जात आहे. अनेक शिक्षक, सरकारी कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे, जबाबदारीने आपले कर्तव्य सध्या बजावीत आहेत. मानसिक, शारीरिक ताण सहन करीत पुरुष आणि महिला कर्मचारी दिवसभर जनगणना कामासाठी आपल्या कुटुंबापासून दूर अंतरावर प्रवास करीत असताना उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे, हृदयविकाराच्या झटक्यामुळे तसेच वाहनांच्या अपघातामुळे या चार शिक्षकांचा जीव जाणे म्हणजे त्या कुटुंबासाठी दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखेच आहे. असह्य मानसिक, भावनिक धक्का, आर्थिक विवंचना, अस्थिरता, सामाजिक, कौटुंबिक संघर्ष, पुढे मदतीसाठी शासकीय, प्रशासकीय दिरंगाईचा त्रास, अशा अनेक कठीण परिस्थितीचा सामना या कुटुंबाला करावा लागतो. जनगणना या राष्ट्रीय कर्तव्यावर असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, वाहतूक सुरक्षा पाळावी. शासनाने सुद्धा दुर्दैवी घटना घडलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी खऱ्या अर्थाने सामाजिक आणि नैतिक कर्तव्य पार पाडावे जेणेकरून ते कुटुंब आर्थिक आणि सामाजिक पातळीवर स्थिरावू शकेल.

**नितीन कुंभार**

●● ●●

### चायनिज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच

भारतीयांना चिनी गोष्टींचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गाडीवरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असतो. त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. हॉटेल आणि रेस्टॉरंट्च्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट भाज्या आणि तेल वापरले जाते. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे.

**श्याम ठाणेदार**





## महत्त्वाचे

### विनेशच्या निवड चाचणीबाबतच्या हायकोर्टाच्या आदेशाला आव्हान



**नवी दिल्ली :** भारतीय कुस्ती महासंघाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून, कुस्तीपटू विनेश फोगटला २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी महासंघाच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे. फोगटच्या सहभागाला परवानगी देण्यामागील उच्च न्यायालयाचा युक्तिवाद २२ मे रोजी, उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या आगामी निवड चाचण्यांमध्ये फोगटच्या सहभागाला मंजुरी दिली होती. यावेळी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, डब्ल्यूएफआयचे निवड धोरण वंचित करणारे आहे; कारण मातृत्व रजेवरून परतणाऱ्या फोगटसारख्या एका दिग्गज खेळाडूचा विचार करण्यासाठी या धोरणात कोणत्याही प्रकारच्या विवेकाधिकाराची तरतूद नाही.

### ऑस्ट्रेलियावर वर्चस्व गाजवण्यास भारतीय महिला हॉकी संघ उत्सुक

**पर्थ :** सातत्याने प्रगती करत असलेला भारतीय महिला हॉकी संघ येथे सुरू असलेल्या चार सामन्यांच्या हॉकी मालिकेत शुक्रवारी येथे ऑस्ट्रेलियाचा सामना करताना आपली स्थिती अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल. भारतीय महिलांनी या दौऱ्याची सुरुवात सकारात्मक पद्धतीने केली होती; मालिकेतील पहिल्याच सामन्यात नवनीत कौरने भारताला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली होती, मात्र त्यानंतर ॲबी विल्सनने केलेल्या दोन गोलमुळे ऑस्ट्रेलियाचा २-१ असा विजय निश्चित झाला. परंतु, बुधवारी सामन्याच्या निर्धारित वेळेअखेर दोन्ही संघ १-१ अशा बरोबरीत असताना, भारतीय संघाने जोरदार पुनरागमन करत दुसरा सामना शूटआउटमध्ये ४-२ ने जिंकला. सजोर्ड मारिन यांच्या मार्गदर्शनाखालील या संघाने जबरदस्त लढाऊ वृत्तीचे प्रदर्शन केले. या दौऱ्यात आतापर्यंत भारतीय संघाने खेळाच्या बहुतेक सर्वच पैलूंमध्ये विशेषतः बचावफळी आणि मध्यफळीमध्ये आपली छाप पाडली आहे. भारतीय संघ आपली कर्णधार सलीमा टेट हिच्याकडून प्रेरणेची अपेक्षा करेल. हा दौरा भारतासाठी एक महत्त्वाची सराव मालिका म्हणून काम करेल; या दौऱ्यानंतर १५ ते २१ जून दरम्यान ऑकलंड येथे हॉकी महिला नेशन्स कपचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या एफआयएच विश्वचषकाच्या दृष्टीनेही हा सध्याचा दौरा भारतासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या दौऱ्यातील अंतिम सामना शनिवारी खेळवला जाणार आहे.

### महिला विश्वचषकासाठी सामना अधिकाऱ्यांच्या पॅनेलमध्ये चार भारतीय

**दुबई :** आगामी १२ जूनपासून इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरू होणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषकाचे संचालन करणाऱ्या आयसीसीच्या १८ सदस्यीय केवळ महिलांचा समावेश असलेल्या सामना अधिकाऱ्यांच्या यादीत सामना पंच जी.एस. लक्ष्मी यांच्यासह चार भारतीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रतिष्ठि स्पर्धेची ही सलग तिसरी आवृत्ती असेल, यात केवळ महिलांचा समावेश असलेले पॅनेल कार्यरत असेल; यामध्ये कॅन्डिस ला बोर्डे, गायत्री वेणुगोपालन, केरिन क्लास्टे आणि शथिरा जाकिर जेसी या अधिकाऱ्यांचा या स्पर्धेत पदार्पण होणार आहे. पंच म्हणून काम करणाऱ्यांच्या यादीत वृंदा राठी आणि जननी एन या इतर दोन भारतीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महिला टी-२० विश्वचषक २०२६ साठीचे सामना अधिकाऱ्यांचे हे पॅनेल क्रिकेटच्या सर्व पैलूंमध्ये प्रतिनिधित्वाची व्याप्ती वाढवण्यास कटिबद्ध आहे.

# अंतिम फेरीसाठी गुजरात, राजस्थानमध्ये चुरस



शुभमन गिल



रियान पराग

**मुल्लानपूर, २८ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) क्वालिफायर २ सामन्यात शुक्रवारी मुल्लानपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स हे संघ आमने-सामने उभे ठाकणार आहेत.

क्वालिफायर १ सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) कडून ९२ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव पत्करावा लागल्यामुळे गुजरात टायटन्सना थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळविता आला नाही. साखळी फेरीत नऊ विजयांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिल्यामुळे गुजरात संघाला आता अंतिम फेरीत पोहोचण्याची दुसरी संधी मिळाली आहे. त्यांच्या मार्गात आता राजस्थान रॉयल्स हा सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेला संघ उभा आहे. राजस्थान रॉयल्सने एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर ४७ धावांचा निर्विवाद विजय मिळवून या बाद फेरीच्या सामन्यात आपले स्थान निश्चित केले आहे.

आयपीएल २०२६ च्या हंगामातील साखळी फेरीत हे दोन्ही संघ दोनदा आमने-सामने आले होते आणि त्यातील प्रत्येकी एका सामन्यात त्यांनी विजय मिळविला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या अत्यंत रोमहर्षक सामन्यात राजस्थान रॉयल्सने ६ धावांनी बाजी मारली होती, तर जयपूरमध्ये झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने ७७ धावांच्या मोठ्या फरकाने दणदणीत विजय मिळवत जोरदार पुनरागमन केले होते.

या मैदानावर आतापर्यंत पाच सामने खेळले गेले असून, त्यातील बहुतांश सामने हे अत्यंत मोठ्या धावसंख्येचे ठरले आहेत. राजस्थान आणि गुजरात यांच्यातील एलिमिनेटर सामना याच मैदानावर खेळला गेला होता; त्यावेळी प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने २४३ धावांचा प्रचंड डोंगर उभारला होता. दोन्ही संघांमध्ये फटकेबाजी करणारे दिग्गज फलंदाज असल्यामुळे या सामन्यातही पुन्हा एकदा मोठ्या धावसंख्येची लढत पाहायला मिळेल अशी अपेक्षा आहे.

या क्वालिफायर २ सामन्यातील विजयी संघ रविवारी नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, अहमदाबाद येथे होणाऱ्या अंतिम सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळेल.

**क्वालिफायर२ सामना आज**

**गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स**

**स्थळ :** महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर

**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# सूर्यवंशी गोलंदाजाला मुळीच घाबरत नाही : जुरेल







**मुल्लानपूर, २८ मे**

एखाद्या किशोरवयीन खेळाडूने चेंडूचा विचार करण्याऐवजी केवळ गोलंदाजाचाच विचार करीत खेळणे (म्हणजेच गोलंदाजाच्या नावाला घाबरणे) हे तसे स्वाभाविक असते; परंतु वैभव सूर्यवंशीला आपण कोणाचा सामना करीत आहोत, याची अजिबात पर्वा नसते, असे त्याचे राजस्थान रॉयल्समधील सहकारी ध्रुव जुरेलने नमूद केले.

या १५ वर्षीय वैभ व सूर्यवंशीने संपूर्ण आयपीएल हंगामात गोलंदाजांच्या नावलौकिकाची (प्रतिष्ठेची) फारशी पर्वा केली नाही; मग तो जसप्रीत बुमराह असो किंवा अलीकडेच ज्याचा सामना केला तो पॅट कमिन्स. सूर्यवंशीच्या आक्रमक फटकेबाजीचा तडाखा बसलेल्या दिग्गज गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद सिराज, जोश हेझलवुड आणि कॅगिसो रबाडा यांचाही समावेश आहे.

बुधवारी, सूर्यवंशीने आपल्या षटकारांच्या वर्षावाने अनेकदा विश्वचषक जिंकणाऱ्या व क्रिकेट जगतातील सर्वात चतुरस्त्र गोलंदाजांपैकी एक असलेल्या कमिन्सला पूर्णपणे हतबल करून सोडले.

कमिन्सने लेग-स्टम्पवर पूर्ण लांबीचा चेंडू टाकून सूर्यवंशीच्या मुक्तहस्त फटकेबाजीला रोखण्याचा प्रयत्न केला; परंतु सूर्यवंशीने तत्काळ आपल्या खेळात बदल करत तो चेंडू त्या ऑस्ट्रेलियन गोलंदाजाच्या डोक्यावरून सीमापार पाठवला. त्यानंतर आलेला आखुड टप्प्याचा चेंडू त्याने थर्ड मॅनच्या दिशेने जोरदारपणे टोलवला, तर त्यापुढचा हळू गतीचा चेंडू त्याने सरळ बॅटने सीमापार धाडला. तिसऱ्याच षटकांत कमिन्सच्या सर्व युक्त्या संपल्या होत्या.

सूर्यवंशीने अखेरीस २९ चेंडूंत ९७ धावांची सामना-विजयी खेळी साकारली; ख्रिस गेलचा आयपीएलमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम मोडण्यापासून तो केवळ एका फटक्याच्या अंतरावर होता.

वैभव सूर्यवंशीला अगदी जवळून पाहणाऱ्या जुरेलने या चमत्कारिक खेळाडूबाबत आपले निरीक्षण नोंदवले.

## भविष्यात शतके नक्कीच करेन : वैभव सूर्यवंशी

आयपीएलमधील सर्वात जलद शतकाच्या विक्रमाबद्दल कल्पना नव्हती. सामना संपल्यानंतर मला विक्रमाबद्दल कळले., माझे संपूर्ण लक्ष षट्कार ठोकण्यावर व जास्तीत जास्त धावा गोळा करण्यावर केंद्रित होते, , मात्र भविष्यात मी नक्कीच शतक करेन, असे राजस्थान रॉयल्सचा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी म्हणाला.

बुधवारी येथे झालेल्या एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली. सूर्यवंशीचा जलद शतकाचा विक्रम अवघ्या तीन धावांनी हुकला. त्याने अवघ्या २९ चेंडूंत ९७ धावांची धडाकेबाज खेळी केली. यामध्ये १२ षट्कार व ५ चौकार ठोकले. त्याचा स्ट्राईक रेट ३३४.४८ इतका प्रचंड होता. त्याच्या या खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने हैदराबादचा ४७ धावांनी पराभव केलाव क्वालिफायर २ मध्ये गुजरात टायटन्सशी दोन हात करण्याची संधी मिळविली.

आयपीएलमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम त्याने अगदी थोडक्यात हुकवला असला, तरी एका हंगामात सर्वाधिक षट्कार मारण्याचा ख्रिस गेलचा विक्रम त्याने मोडीत काढला. आयपीएल २०२६ च्या या हंगामात त्याने एकूण ६५ षट्कार ठोकले आहेत.

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स याने आपल्या संघाच्या पराभवाचे खापर, चुकीच्या वेळी एकापाठोपाठ एक बळी गमावण्यावर फोडले.

## सूर्यवंशीचा बॅट स्विंग अप्रतिम : सचिन तेंडुलकर

### क्रिकेट विश्वाने केली मुक्तकंठाने प्रशंसा



आयपीएलच्या एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९७ धावांची धडाकेबाज खेळी करणाऱ्या किशोरवयीन वैभव सूर्यवंशीची क्रिकेट विश्वाने भरभरून प्रशंसा केली.

महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने १५ वर्षी डावखुरा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या 'अप्रतिम बॅट स्विंग'ची विशेष प्रशंसा केली. सूर्यवंशीने आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक षट्कार (५९) मारण्याचा ख्रिस गेलचा विक्रम मोडला. आता सूर्यवंशीच्या नावावर या हंगामात एकूण ६५ षट्कार जमा झाले आहेत. वैभव सूर्यवंशीचा बॅट स्विंग अत्यंत उत्कृष्ट राहिला आहे. पायांच्या दिशेने येणाऱ्या चेंडूंसाठी जागा निर्माण करण्याकरिता तो आपला पुढचा पाय सुंदरपणे बाजूला करतो. या मोकळेपणामुळेच त्याला आपल्या शैलीनुसार खेळणे शक्य होते. ती खेळी म्हणजे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नव्हती, असे सचिन तेंडुलकरने म्हटले.

'बॉस बेबीने युनिव्हर्सल बॉसचा विक्रम मोडला. सूर्यवंशीची खेळी अविश्वसनीय आहे, असे अनेक विश्वचषक विजेत्या युवराज सिंगने म्हटले. सूर्यवंशीसारखे क्रिकेटपटू हेच सिद्ध करतात की भारतीय क्रिकेट सुरक्षित हातात आहे, असे माजी अष्टपैलू खेळाडू सुरेश रैनाने म्हटले.

सूर्यवंशीच्या फटक्यांची गुणवत्ता 'दुर्मिळ' आहे, असे वेस्ट इंडीजचा माजी वेगवान गोलंदाज इयान बिशपने म्हटले. आपण एक चमत्कार पाहत आहोत, आपण एक भविष्यातील स्टार पाहत आहोत, असे भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफ म्हणाला. सूर्यवंशीच्या या अद्‌भूत कामगिरीने भारावून गेलो, असे इंग्लंडचा महान फलंदाज केविन पीटरसन म्हणाला. वैभव सूर्यवंशीचे हात अत्यंत चपळ आहेत आणि सध्या तो पूर्णपणे निर्भीड होऊन खेळत आहे. त्याच्या शरीरात भीतीचा लवलेशही नाही, असे दक्षिण आफ्रिकन खेळाडू कॅगिसो रबाडा म्हणाला.सूर्यवंशी जगातील सर्वोत्तम टी-२० सलामीवीर आहे. भारताने त्याची नक्कीच निवड केली पाहिजे, असे इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉन याने म्हटले.

# दिव्या देशमुखचा बिबिसारावर विजय

### नॉर्वे बुद्धिबळ ● प्रज्ञानंदचा मॅग्नस कार्लसेनला धक्का ● गुकेशचा आणखी एक पराभव

**ओस्लो, २८ मे**

आर. प्रज्ञानंदने येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत अव्वल विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसेनला एका रोमांचक लढतीत पराभूत करून, आपण त्याच्याशी बरोबरी करू शकतो हे सिद्ध केले व तीन पूर्ण गुण मिळविले.

याउलट, विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशची खडतर वाटचाल सुरूच राहिली. एका चुरशीच्या क्लासिकल सामन्यानंतर आर्मागेडॉन गेममध्ये अलीरेझा फिरौजाकडून पराभूत झाल्यामुळे त्याला आणखी एका धक्क्याला सामोरे जावे लागले.

महिला गटातील स्पर्धा अत्यंत चुरशीची राहिली असून गुणतालिकेवर खेळाडूंचे गुण एकमेकांच्या अगदी जवळ आहेत. अद्याप कोणताही स्पष्ट आघाडीचा खेळाडू समोर आलेला नाही.





बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध खेळताना नागपूरची दिव्या देशमुख

दिव्या देशमुखने टायब्रेक्समध्ये पुन्हा एकदा आपला कणखरपणा सिद्ध केला. स्पर्धेतील आपला तिसरा आर्मागेडन विजय तिने यावेळी स्पर्धेची आघाडीची खेळाडू असलेल्या बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध मिळविला आणि ४.५ गुणांची कमाई केली.

सध्या दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या तरुण भारतीय खेळाडूने, ५.५ गुणांसह स्पर्धेत आघाडीवर असलेल्या कझाकिस्तानच्या खेळाडूशी (बिबिसाराशी) असलेली गुणांची तफावत आणखी कमी केली आहे.

कोनेरू हम्पीची कठीण वाटचाल थांबण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाही व दोन वेळच्या विश्व जलद बुद्धिबळ विजेतीला गतविजेती ॲना मुझीचुककडून पराभव पत्करावा लागला.

हम्पी आता गुणतालिकेत तळाशी, म्हणजेच सहाव्या क्रमांकावर असून तिच्या खात्यात केवळ दोन गुण जमा आहेत.

बुखारेस्ट येथील सुपरबेट चेस क्लासिक रोमानियामध्ये प्रभावी कामगिरीच्या मालिकेनंतर नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या पूर्वसंध्येला ओस्लोमध्ये दाखल झालेल्या प्रज्ञानंदकडून हा विजय आणखी एक मोठे विधान होते.

या विजयामुळे या भारतीय खेळाडूचे ४.५ गुण झाले आणि तो नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या गुणतालिकेत एकमेव दुसऱ्या स्थानावर पोहोचला. तो आता केवळ फिरौजाच्या मागे आहे, जो ७.५ गुणांसह स्पर्धेत आघाडीवर आहे.

# भारतीय खेळाडूंची विजयी मालिका कायम

**सिंगापूर ओपन बॅडमिंटन**

**सिंगापूर, २८ मे**

भारताचे आघाडीचे खेळाडू पी.व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, पुरुष दुहेरीतील जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी, तसेच मिश्र दुहेरीतील जोडी ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी गुरुवारी सिंगापूर ओपन स्पर्धेत आपली विजयी घोडदौड कायम राखीत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

सिंधूने जपानच्या रिको गुंजीचा सलग दोन गेम्समध्ये सहज पराभव केला, तर सात्त्विक-चिराग जोडीने ली झे-हुई व यांग पो-ह्सुआन यांचा २१-१५, ११-२१, २१-१८ असा पराभव केला. ध्रुव व तनिषाने जपानच्या जोडीचे आव्हान परतवून लावत युता वातानाबे व माया तागुची यांचा ८-२१, २१-१७, २१-१६ अशा गुणांनी पराभव केला.

अनुभवी सिंधूने अवघ्या ३७ मिनिटांतच सलग दोन गेम्समध्ये सहज विजय नोंदवला. उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना आता अव्वल मानांकित खेळाडू दक्षिण कोरियाच्या आन से-यंग हिच्याशी होईल.









पुरुष एकेरीमध्ये लक्ष्य सेनने पुढील फेरीत प्रवेश केला, कारण त्याचा प्रतिस्पर्धी थायलंडचा कुनलावुत विटिडसर्न याने सामन्यात केवळ दोन गुण झाल्यानंतरच दुखापतीमुळे माघार घेतली. लक्ष्यचा पुढील सामना आता जपानच्या कोकी वातानाबे याच्याशी होईल. पुरुष एकेरीच्या अन्य एका सामन्यात एच.एस. प्रणॉयला सिंगापूरच्या लोह कीन यू याच्याकडून १८-२१, २१-१६, १५-२१ अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला.

पुरुष दुहेरीमध्ये चौथ्या मानांकित सात्त्विक व चिराग जोडीने पहिला गेम जिंकून दमदार सुरुवात केली; मात्र चिनी तैपेईच्या जोडीने दुसऱ्या गेममध्ये वर्चस्व गाजवल्यामुळे हा सामना निर्णायक तिसऱ्या गेमपर्यंत गेला. भारतीय जोडीने जोरदार मुसंडी मारत निर्णायक गेम २१-१८ अशा गुणांनी जिंकून सामना आपल्या नावी केला. त्यांचा पुढील सामना आता मलेशियाच्या कांग खाई झिंग आणि ॲरॉन ताई या जोडीशी होईल, याच जोडीकडून त्यांना या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या ऑल इंग्लंड ओपन स्पर्धेदरम्यान पराभव पत्करावा लागला होता.

### व्हीनस विल्यम्स, हेली बॅप्टिस्टची माघार

**पॅरिस :** व्हीनस विल्यम्स आता हेली बॅप्टिस्टसोबत फ्रेंच ओपनमध्ये महिला दुहेरी खेळणार नाही. त्यांनी गुरुवारी स्पर्धेतून माघार घेतली आणि आयोजकांकडून कोणतेही कारण देण्यात आले नाही, परंतु बुधवारी वांग शियूविरुद्धच्या दुसऱ्या फेरीतील एकेरीच्या सामन्यात पहिल्या सेटच्या अखेरीस डाव्या पायावर विचित्रपणे पडल्यामुळे बॅप्टिस्टला सामना सोडून द्यावा लागला होता. या अमेरिकन खेळाडूंच्या जागी युडिस चोंग आणि व्हेरोनिका रेजवेक यांना ड्रॉमध्ये स्थान देण्यात आले आहे.

# भारतीय संघांचे सकारात्मक सुरुवातीकडे लक्ष

### आशिया चषक १८ वर्षांखालील हॉकी

**काकामिगाहारा, २८ मे**

येथे शुक्रवारपासून आशिया चषक १८ वर्षांखालील मुले-मुलींच्या हॉकी स्पर्धेला प्रारभ होणार आहे. सरदार सिंग आणि राणी रामपाल यांसारख्या वरिष्ठ दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली, भारताचे १८ वर्षांखालील मुले आणि मुलींचे संघ आपल्या अलीकडील तीव्र सरावाचा पुरेपूर फायदा उठवण्याचे ध्येय बाळगून असतील.

मुलांच्या संघाला माजी पुरुष कर्णधार सरदार सिंग आणि रजनीश मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभत आहे, तर मुलींच्या संघाची धुरा माजी महिला कर्णधार राणी रामपाल हिच्या हाती आहे. आक्रमक खेळाडू केतन कुशवाह याच्या नेतृत्वाखालील भारताचा १८ वर्षांखालील मुलांचा संघ प्रशिक्षक सरदार सिंग आणि रजनीश मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या महिनाभराच्या राष्ट्रीय सराव शिबिरानंतर या स्पर्धेत सहभागी होत आहे. मुलांच्या स्पर्धेत भारताला गट अ मध्ये यजमान जपान, कोरिया, चायनीज तैपेई आणि कझाकस्तान या संघांसोबत स्थान देण्यात आले आहे. भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात २९ मे रोजी कझाकस्तानविरुद्ध करेल; त्यानंतर ते जपान (३१ मे), कोरिया (१ जून) आणि चीन तैपेई (३ जून) या संघांचा सामना करतील.

गट ब ( ) मध्ये मलेशिया, पाकिस्तान, बांगलादेश आणि चीन या संघांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ ५ जून रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील, तर अंतिम सामना ६ जून रोजी खेळला जाईल. मुलींच्या संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध चार सामन्यांची मालिकाही खेळली. गट अ मध्ये स्थान मिळालेला हा संघ ३० मे रोजी मलेशियाविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल; त्यानंतर ३१ मे रोजी कोरिया आणि २ जून रोजी सिंगापूरविरुद्ध त्यांचे सामने होतील. अंतिम सामना ६ जून रोजी खेळवला जाईल.

# मांडविया राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा आढावा घेणार

**नवी दिल्ली, २८ मे**

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया हे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या ईशान्येकडील मेघालय राज्याच्या तीन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. तसेच, शिलाँग येथे एका एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुलाचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

पुढील वर्षी मार्चमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठीचा यजमान राज्य करार मेघालय सरकारसोबत स्वाक्षरित केला जाईल. या प्रसंगी वरिष्ठ मान्यवर आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित असतील. मांडविया हे युवक व्यवहार आणि क्रीडा पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित विविध कार्यक्रमांमध्येही सहभागी होतील, तसेच राज्यातील केंद्रपुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतील. या दौऱ्यादरम्यान, मंत्री महोदय युवक व्यवहार विभागाने आयोजित केलेल्या चिंतन शिबिराला उपस्थित राहतील.



यावेळी मेघालयचे क्रीडा आणि युवक व्यवहार मंत्री शाकलियार वारजरी आणि इतर वरिष्ठ अधिकारीही उपस्थित असतील. शनिवारी, मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांच्या समवेत मांडविया हे शिलाँग येथील एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुलाचे उद्घाटन करतील. १३२.९ कोटी रुपयांच्या प्रकल्प खर्चातून उभारले जात असलेले हे एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुल हे एक आधुनिक आणि बहुकार्यक्षम क्रीडा सुविधा म्हणून विकसित करण्यात आले आहे.

# डोनाला नमवून ओसाका तिसऱ्या फेरीत

### फ्रेंच ओपन टेनिस

**पॅरिस, २८ मे**

जगातील माजी अव्वल क्रमांकाची खेळाडू नाओमी ओसाकाने गुरुवारी फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत पुन्हा एकदा दिमाखदार प्रवेश केला. मात्र, दुसऱ्या फेरीत क्रोएशियाच्या डोना वेकिचवर ७-६(१), ६-४ असा विजय मिळवून स्पर्धेबाहेर पडण्याचे संकट टाळण्यासाठी तिला खूप संघर्ष करावा लागला.

जपानच्या ओसाकाने डोनाविरुद्धच्या सामन्यासाठी पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान केला होता.

### सिनरचा दुसऱ्या फेरीत सेरुंडोलोकडून पराभव

जॅनिक सिनरचे पहिले फ्रेंच ओपन विजेतेपद आणि करिअर ग्रॅण्ड स्लॅम (चारही ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकण्याचे स्वप्न) मिळविण्याचे स्वप्न धुळीस मिळाले. गुरुवारीच्या कडक उन्हात, जुआन मॅन्युएल सेरुंडोलोविरुद्धच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यादरम्यान २४ वर्षीय इटालियन खेळाडू सिनरला शारीरिक व्याधींचा सामना करावा लागला आणि त्याला ३-६, २-६, ७-५, ६-१, ६-१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले.



मॉंटे कार्लो, माद्रिद आणि रोम येथील क्ले कोर्टवरील (मातीच्या कोर्टवरील) स्पर्धांची विजेतेपदे पटकावल्यामुळे सिनर या विजेतेपदाचा प्रबळ दावेदार म्हणून पॅरिसमध्ये दाखल झाला होता. त्यातच, त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी व गतविजेता कार्लोस अल्काराझ दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाला होता, तर नोवाक जोकोविच अजूनही आपला सर्वोत्तम फॉर्म शोधण्याच्या प्रयत्नात आहे.

### व्हॅलेजोला नमवून कौआमेने नदालचा २३ वर्षांचा विक्रम गाठला



पॅराग्वेच्या ॲडॉल्फो डॅनियल व्हॅलेजोविरुद्धच्या एका रोमहर्षक मॅच टाय-ब्रेक विजयासह, फ्रान्सचा मोईस कौआमे हा २००३ मधील राफेल नदालनंतर ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत पोहोचणारा सर्वात तरुण पुरुष खेळाडू ठरला आहे. कौआमे १७ वर्षांचा असताना, त्याने पहिल्याच फेरीत अमेरिकन ओपनचा माजी विजेता मारिन सिलिचचा पराभव केला; या विजयासह तो गेल्या १७ वर्षांतील ग्रॅण्ड स्लॅम सामन्यात विजय मिळवणारा सर्वात तरुण खेळाडू बनला. रोलँड गॅरोस येथील पॅरिसियन प्रेक्षकांच्या जोरदार पाठिंब्यासमोर कौआमेने व्हॅलेजोचा ६-३, ७-५, ६-३, ६-२, ६-६ (१०-८) असा पराभव केला.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### जिल्हा मजुर फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी देवीदास पाटील

**धुळे :** धुळे जिल्हा मजुर सह फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी साक्री तालुक्यातून निवडून आलेले संचालक देवीदास माधव पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांचे सूचक जितेंद्रसिंह राजपूत, अनुमोदक शिवाजीराव पवार होते. निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील, सहाय्यक अधिकारी नवनीत गोसावी यांनी काम पाहिले. या निवडणुकीच्या बैठकीस धुळे जिल्हा मजूर फेडरेशनच्या अध्यक्षा सुनीता माळी, माजी उपाध्यक्षा संगीता भदाणे, माजी अध्यक्ष शिवाजीराव पवार, संचालक अशोक पाटील, जितेंद्र राजपूत, धनंजय मंगळे, आलोक रघुवंशी, किशोर चव्हाण, सागर देसले आदी उपस्थित होते. माजी व्यवस्थापक विलास माळी, विद्यमान व्यवस्थापक राजाराम भामरे उपस्थित होते. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे, माजी मंत्री अमरीशभाई पटेल, धुळे जिल्हा परिषदेचे कृषी सभापती हर्षवर्धन दहिते यांनी प्रयत्न केले. देविदास पाटील यांच्या निवडीबद्दल माजी आमदार कदमबांडे, माजी जिल्हा परिषद माजी अध्यक्ष शिवाजी दहिते, जिल्हा परिषद सभापती हर्षवर्धन दहीते, साक्री तालुका शेतकरी सहकारी संघाचे अध्यक्ष शिरीष सोनवणे, उपाध्यक्ष प्रदीप नांद्रे, जिल्हा परिषद सदस्य मधुकर बागुल, विजू नाना ठाकरे यांनी समाधान व्यक्त केले.

### पीसीपीएनडीटी सल्लागार समिती सदस्यपदी सचीन शेवतकर

**धुळे :** धुळे महापालिका अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पीसीपीएनडीटी



(गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र लिंगनिवडीस प्रतिबंध) सल्लागार समिती सदस्य म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा आरंभ फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन जगन्नाथ शेवतकर यांची निवड करण्यात आली. गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्यांतर्गत कार्यरत असलेल्या सोनोग्राफी केंद्रांची नवीन नोंदणी, पुनर्नोंदणी, नोंदणीकरणासंबंधी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर सल्लागार समितीच्या सभेत चर्चा करून योग्य निर्णय घेणे, समितीचे कार्य आहे. महिला भ्रूणहत्या प्रतिबंधासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या समितीत शेवतकर यांची निवड त्यांच्या सामाजिक कार्याची पोचपावती मानली जात आहे. आरोग्य, सामाजिक व जनजागृती क्षेत्रात सातत्याने कार्य करीत विविध उपक्रम राबविले. त्यांच्या निवडीमुळे समितीच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### दसेरा मैदान भुयारी मार्गाच्या कॉंक्रिटीकरणाला वेग प्रविण अग्रवाल, विकी परदेशी यांचा पाठपुरावा

**धुळे :** गेल्या काही महिन्यापासून शहरातील दसेरा मैदान रेल्वे बोगद्याखालील भुयारी मार्ग नादुरूस्त खड्डेयुक्त होता. सामाजिक कार्यकर्ते प्रविण अग्रवाल, विकी परदेशी यांनी यासंदर्भात पाठपुरावा केल्यानंतर दसेरा मैदान रेल्वे बोगद्याखालील भुयारी मार्गासाठी कॉंक्रिटीकरणाला गती देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी बोगद्यातील कॉंक्रिट उखडल्याने रस्ते वाहतूकीला अडचणी येत होत्या. तसेच पावसाळा तोंडावर असल्याने, नागरिकांना व वाहनधारकांना सुरक्षित रस्ता उपलब्ध व्हावा, या उद्देशाने भुयारी मार्गाच्या कॉंक्रिटीकरणाला सुरुवात करण्याविषयी पाठपुरावा केला होता. त्यानुसार पावसाळ्यात होणारी चिखल आणि खड्ड्यांची गैरसोय टाळण्यासाठी हे पाऊल उचलले असून, कामाचा दर्जा उत्तम राखण्यावर भर दिला जात आहे. या भागातील रस्त्याची दुरवस्था दूर होऊन नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी स्वतः प्रवीण अग्रवाल, विक्की परदेशी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे या रखडलेल्या कामाला गती मिळाली. प्रत्यक्ष काम सुरू असल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव काम सुरु असल्याने पुढील दोन दिवस सर्व वाहतुक बंद राहील. नागरिकांनी प्रवास करताना पर्यायी रस्त्यांचा वापर करावा, विकासकामात अडथळा येणार नाही, प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, कामाच्या ठिकाणी वाहने नेणे टाळावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.



### नंदुरबार येथे संत भीमा भोई जयंती उत्साहात

नंदुरबार : शहरातील कोकणी हिल परिसरात कवी श्रेष्ठ भगवान श्री संत भिमा भोई यांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संत भीमा भोई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत भीमा भोई यांच्या कार्याचा, विचारांचा व समाज प्रबोधनातील योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. कार्यक्रमात इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात महिलांचा विशेष सहभाग दिसून आला. कार्यक्रमास परिसरातील नागरिक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### मुकेश आर. पटेल सीबीएसई स्कूलमध्ये 'विफा' राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा

**शिरपूर :** श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'विफा' इंटर डिस्ट्रिक्ट जुनिअर बॉयज फुटबॉल राज्यस्तरीय स्पर्धांना राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महाराष्ट्रातील तब्बल ३३ जिल्ह्यांच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या ६०० हून अधिक विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात ठाणे जिल्हा संघाने विजेतेपद तर मुंबई जिल्हा संघाने उपविजेतेपद मिळविले. पुणे जिल्हा संघाने तृतीय क्रमांक यश संपादन केले. विजेत्या संघांना ट्रॉफी, पदके आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या समारोप समारंभासाठी धुळे जिल्हा फुटबॉल असोसिएशन सचिव संजय चौधरी, प्राचार्या मंजु सिंह (मुकेश पटेल सीबीएसई स्कूल, तांडे), धनराज मोरे (एक्झिक्युटिव्ह मेंबर, विफा), राजेंद्र राऊत (मॅच कमिशनर, विफा), जावेद खान (सिलेक्टर, विफा) तसेच एस.व्ही.के.एम. स्पोर्ट्स डायरेक्टर डॉ. किरण आंचन आदी उपस्थित होते. क्रीडा क्षेत्रातील मेहनत, शिस्त आणि सातत्याचे महत्त्व सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी प्रतिभा असून योग्य संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही चमकू शकतात, असा विश्वास डॉ. किरण आंचन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केला.

स्पर्धा यशस्वीतेसाठी विजेत्या संघांचे व खेळाडूंचे एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, प्राचार्या मंजु सिंह, एस.व्ही.के.एम. स्पोर्ट्स डायरेक्टर डॉ. किरण आंचन यांनी अभिनंदन केले.

# चारा वर्गीय पीक उत्पादनावर अल निनोचा प्रभाव

## शेतकऱ्यांकडून पशुधनासाठी चारा साठवणूकीला वेग

**तभा वृत्तसेवा**
**मालपूर, दि.२८ मे**

शिंदखेडा तालुक्यात मालपूर हे धुळे जिल्ह्यात दुधाची नगरी म्हणून ओळखले जाते. लहान मोठ्या अकरा दुध डेअऱ्या व तीन दुध शितकेंद्रे येथे असुन येथील दुधाचा संपूर्ण महाराष्ट्रासह गुजरात व मध्य प्रदेश राज्यात पुरवठा आहे. यामुळे परिसरात पशुधन संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यंदा जागतिक हवामान बदलाचा मोठा फटका बसुन अल निनोच्या सक्रियतेमुळे पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवला गेला आहे. शिवाय अधिकचा महिना देखील असल्यामुळे दुष्काळात तेरावा महिना आला असल्याने पशुधनाचा चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनु नये यासाठी आतापासुन पशुपालक मिळेल तो चाऱ्याची कुट्टी करुन साठवणुकीवर भर दिला जात असल्याचे शेतशिवारात दिसुन येत आहे.



स्वस्त धान्य दुकानाचा दिलासा मिळाला तर माणसाचे पोट भरता येईल. मात्र पशुधनाचे काय करणार. पहीला पाऊस झाल्यावर रानावनातील कोरडा चारा, पालापाचोळ्याला किड लागुन खराब होतो. तसेच पावसाचा खंड पडल्यास चारा उपलब्धतेवर परिणाम होवू शकतो. अशावेळी पशुधनासाठी चारा साठवणूकीला पशुपालकाकडून तयारी करत आहे. मात्र पशुधनाची संख्या लक्षात घेता, येथे चाराची टंचाई निर्माण होणार असल्याची शक्यता व्यक्त करत आहेत.

हिरवा व कोरडा चाऱ्याचे योग्य संतुलन करुन दुधाळ पशुधनाला उपलब्ध होतो. परंतु चारा टंचाई निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम दुग्धोत्पादनावर होणार आहे. यामुळे परिसरात चाऱ्याचे भाव गगनाला भिडले आहेत. भुईमूगचा पाला, मका कुट्टी, हरभरा भुसा आदी चारा साठवणुकीवर भर दिला जात असुन भुईमूगच्या एका डब्यीसाठी ६० ते सत्तर रुपये तर मका कुट्टी ट्रक्टरसाठी पाच ते सहा हजार रुपये दराने चारा खरेदी केला जात आहे.



## एस. व्ही. के. एम. टेक्सटाईल महाविद्यालयात टेक्सटाईल्स अँड फॅशन वर्कशॉप उत्साहात

**शिरपूर :** येथील एस. व्ही. के. एम. टेक्सटाईल महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष तथा एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठाचे कुलपती माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी रिता पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेंटर फॉर टेक्सटाईल फंक्शन्स, शिरपूर येथे १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता दि. २५ व २६ मे २०२६ रोजी दोन दिवसीय टेक्सटाईल्स अँड फॅशन कार्यशाळा उत्साहात पार पडली.

वद्यार्थ्यांना टेक्सटाईल व फॅशन क्षेत्राची ओळख, सर्जनशीलता आणि कौशल्य विकास यांचा अनुभव देण्यासाठी ही कार्यशाळा पार पडली.

आजच्या आधुनिक युगात टेक्सटाईल व फॅशन उद्योगात मोठ्या प्रमाणावर करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सर्जनशीलता, कौशल्य विकास आणि प्रत्यक्ष अनुभव यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी सी.टी.एफ. चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय शिवणकर यांनी मार्गदर्शनात सांगितले.

प्रा. तुषार पाटील, डॉ. प्रफुल्ल कोलते यांनी ''फॅशन इंडस्ट्रीची ओळख' यात फॅशन डिझायनिंगची संकल्पना, करिअर संधी, प्रसिद्ध फॅशन डिझायनर्स 'फॅब्रिक नॉलेज अँड ऑर्नमेंटेशन टेक्निक्स आणि बेसिक गारमेंट कन्स्ट्रक्शन' पॅटर्न मेकिंग व ड्रेपिंग तंत्र, कापड, टेक्स्चर, प्रिंटिंग, डाईंग व एम्ब्रॉयडरी याबाबत माहिती दिली. तसेच दिसान टेक्सटाईल पार्क आणि द्वेता गारमेंट्स येथे इंडस्ट्री व्हिजिट पार पडली.

'प्रॅक्टिकल अँड स्किल डेव्हलपमेंट'' या थीम अंतर्गत स्टायलिंग चॅलेंज व मिनी डिझाईन प्रोजेक्ट यांसारख्या प्रत्यक्ष कृती उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. शिरपूर कॅम्पसच्या डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील व सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे समन्वयन प्रा. तुषार पाटील यांनी यशस्वीरीत्या केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी समिती सदस्य यांनी प्रयत्न केले.

## अवाजवी हुंडा मागणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासह 'डीजे' संस्कृतीवर कडक निर्बंधाची मागणी

**अनिष्ट प्रथांना मूठमाती देणार; समाज परिवर्तनाचा एल्गार**

### धडगाव येथे ८ जून रोजी आदिवासी भील समाजाची ऐतिहासिक महापंचायत!

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, दि.२८ मे,**

आदिवासी भील समाजाचा इतिहास अत्यंत गौरवशाली आणि समृद्ध संस्कृतीचा आहे. निसर्गाशी नाते असलेल्या समाजाने सांस्कृतिक मूल्ये जपली असली तरी बदलत्या काळासोबत समाजात काही अनिष्ट प्रथा आणि विकृतींनी शिरकाव केला आहे. या पार्श्वभूमीवर, समाजातील रुढी-परंपरा, सामाजिक एकता, हुंडा प्रथा, बालविवाह आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या गंभीर विषयांवर सखोल चर्चा करण्यासाठी नुकतीच सकल आदिवासी भील समाजाची बैठक पार पडली. यात अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन सामाजिक क्रांती घडवण्याचा ऐतिहासिक एल्गार पुकारण्यात आला आहे.

समाज परिवर्तनाचाच एक भाग म्हणून ७ जून रोजी मोलगी-धडगाव



परिसरातील प्रतिष्ठित व सुजाण नागरिकांची महत्त्वाची नियोजन बैठक तर ८ जून रोजी धडगाव येथे निर्णायक महापंचायत पार पडणार आहे. या महापंचायतीकडे आता संपूर्ण भील समाजाचे डोळे लागले आहेत.

अनेक ठिकाणी मुलीचे वडील मुलाच्या आई-वडिलांकडून अवाजवी आणि मोठी रक्कम हुंडा म्हणून मागत असल्यामुळे मुलाच्या कुटुंबाचे मोठे आर्थिक आणि मानसिक शोषण होते. यावर केवळ चर्चा न करता, धडगाव येथील महापंचायतीमध्ये सामाजिक नियम मोडून मनमानी करणाऱ्या आणि अवाजवी हुंडा मागणाऱ्या मुलीच्या वडिलांवर समाजातर्फे मोठा आर्थिक दंड ठोठावण्यात यावा, तसेच अशा प्रवृत्तींविरुद्ध थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्यासारखे कठोर आणि ऐतिहासिक निर्णय घेतले जावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

महापंचायतीसमोर दुसरा एक अत्यंत चिंतेचा आणि संवेदनशील विषय मांडण्यात आला आहे, तो म्हणजे पारंपरिक लग्न सोहळ्यांचे बदलत चाललेले स्वरूप. आज आदिवासी भील समाजाच्या संस्कृतीवर पाश्चात्त्य संस्कृतीचे मोठे अतिक्रमण होताना दिसत आहे.

महापंचायतीने गावातील सरपंच, पोलीस पाटील, कारभारी, डाये, पुजारा, प्रतिष्ठित नागरिक आणि तरुण मंडळांनी कोणताही वैयक्तिक स्वार्थ किंवा राजकीय हेतू मनामध्ये न ठेवता, केवळ आणि केवळ 'भील समाजहित' नजरेसमोर ठेवून विचारमंथन करावे आणि समाजाच्या हिताचे क्रांतिकारी निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

धडगाव येथे ८ जून रोजी होणाऱ्या या ऐतिहासिक महापंचायतीत आदिवासी भील समाजातील नागरिकांनी, तरुणांनी आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले विचार मांडावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

## व्यापाऱ्याच्या तोंडावर स्प्रे मारून सवा लाखांची लूट

### सोनगीर पोलिसांकडून सहा दिवसात गुन्ह्याची उकल, दोघांना अटक

**धुळे :** व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरचीचा स्प्रे मारून मारहाण करीत त्याच्याकडील तब्बल सवा लाखांची रोकड लांबवल्याची घटना रामी शिवारात घटना घडली होती. या गुन्ह्याचा तपास सोनगीर पोलिसांनी अवघ्या सहा दिवसात लावून आंतरजिल्हा टोळीतील दोन भामट्यांना शिताफिने अटक केली.

धुळे तालुक्यातील कापडणे येथील सुकामेवा विक्रेते वासुदेव माळी २१ मे रोजी माल घेऊन जात होते. दरम्यान रामी शिवारात रस्त्यावर वर्दळ नसल्याच्या ठिकाणी दोन मोटारसायकलींवर आलेल्या चार जणांनी अचानक समोर येवून वासुदेव माळी यांना अडविले. बोलण्याच्या बहाणा करीत जवळ आल्यानंतर माळी यांच्या डोळ्यात मिरची स्प्रे फवारून लोखंडी रॉडने मारहाण केली. या झटापटीत वासुदेव माळी यांच्याकडील १ लाख २० हजारांची रोकड लुटून संशयीत आरोपींनी पोबारा केला होता. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

जिल्हा पोलिस विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक तुषार देवरे यांनी दाखल गुन्ह्याची माहिती घेत गोपनीय तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाला वेग दिला. यात मिळालेल्या माहितीनुसार बोरीस येथील राहुल पुंडलीक पाटील, कट रचणारा कापडणे येथील निलेश सुनिल पाटील या दोघांना ताब्यात घेत अटक केली. यात चौकशी केली असता विठ्ठल भोळे, साई उर्फ भटू माळी, मनोज पाटील, जॅकी तनवाणी इतर चार संशयित असुन त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. हि कारवाई सहाय्यक निरीक्षक तुषार देवरे, उपनिरीक्षक प्रशांत ताकटे, हवालदार जगदीश अहिरे, विजयसिंग पाटील, रोहन वाघ यांनी कारवाई केली.



### स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे अभिवादन

**धुळे, :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी तहसिलदार प्रवीण चव्हाणके, महसूल सहाय्यक योगेश जिरे, कैलास जंगाळे, रोहित कुलकर्णी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मालपूर ग्रामपंचायतीत आज विशेष ग्रामसभा

### प्रशासकाची दांडी मारल्यास बहिष्काराचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**मालपूर, दि.२८ मे,**

शिंदखेडा तालुक्यातील मालपूर येथे शुक्रवार २९ मे रोजी सकाळी दहा वाजता ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ग्राम समिती बरखास्त असून ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त आहेत. त्यामुळे या ग्रामसभेला प्रशासकांनी दांडी मारल्यास ग्रामस्थांकडून ग्रामसभेवरच बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

तालुक्यातील मालपूर ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायतीमध्ये २०२४ पासून प्रशासक नियुक्त करण्यात आहे. गावातील विकासकामे तसेच नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यात प्रशासकांना अपयश आलेले आहे. ग्रामस्थांना ते वेळेवर उपलब्धच होत नसून शासनाने जाहीर केलेल्या वर्षातील ग्रामसभा देखील वेळेवर घेतल्या गेलेल्या नाहीत. यामुळे ग्रामस्थांनी आपली गाऱ्हाणी मांडायची कुणाकडे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

त्यानुसार येथील रमेश शिवाजी धनगर यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमेश नेतनवार यांना निवेदन देत तातडीने ग्रामसभा घेण्याची मागणी केली होती. ग्रामसभा नियमित येणे कायद्याने बंधनकारक असून ग्रामस्थांना आपल्या समस्या, सूचना आणि विकासकामांबाबत मत मांडण्याचा अधिकार आहे. ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या कामकाजातील पारदर्शकता आणि लोकसहभाग सुनिश्चित करणारी महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. तसेच, २६ जानेवारी आणि १ मे रोजी होणाऱ्या अनिवार्य ग्रामसभा मालपूरात का घेण्यात येत नाहीत.

तालुका प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ग्रामसभेची तारीख जाहीर करावी तसेच दवंडी देऊन सर्व नागरिकांना माहिती द्यावी, अशी मागणी निवेदनातुन केली असून ग्रामसभा न झाल्यास आंदोलनाचा



इशाराही देण्यात आला आहे.. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी या निवेदनाची दखल घेत २९ मे रोजी सकाळी दहा वाजता येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात ग्रामसभा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

सध्या प्रशासक डी. बी. पाटील कृषी विभाग यांची नियुक्ती १७ एप्रिलला झाली असून, येत्या २९ मेस ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे. असे ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र वाघ यांनी सांगितले.

## मेथी परिसरात खरीप हंगामपूर्व मशागतीला वेग!

**कृषी वार्तापत्र**
**उत्तम नेरकर, मेथी**

शिंदखेडा तालुक्यातील मेथी, वरझडी, खर्दे, अंजनविहिरे, मांडळ, सोनशेलू, विखरण, कामपूर, भडणे, देवी, रेवाडी, सतारे परिसरात सध्या खरीप हंगामपूर्व कामांना वेग आला असून, 'मे हिट'चा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसल्यानंतरही खरीप हंगामासाठी शेती तयार करण्यासाठी शेतकरी बांधावर दिसून येत आहे.

शिंदखेडा तालुका कायमस्वरूपी अवर्षणग्रस्त प्रवर्गात येतो. त्यातच मेथी परिसरात सिंचन प्रकल्पाची किंवा पाणी साठवणुकीची मोठी सुविधा नसल्यामुळे पावसाच्या पाण्यावर मेथी परिसरातील शेती अवलंबून आहे. त्यामुळे यावर्षी मेघराजा कसा बरसतो यावर शेतकऱ्यांची नजर राहणार आहे.

विविध संकटांतून शेतकरी जात असताना परिसरात मोठ्या प्रमाणात कापूस, मका पिकाची खरिपात लागवड केली जाते; त्याचबरोबर थोड्याफार प्रमाणात कडधान्य पिकांची पेरणीही केली जाते. मेथी परिसरातील काही गावांमध्ये केळी व पपई पिकांचीही लागवड केली जाते. मात्र, अवकाळी फळबाग पिकांचे नुकसान करून परिसरातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले, तरीही खरीप हंगामासाठी तिथे जमिनी तयार करण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.

**ट्रॅक्टरद्वारे शेती तयार करण्यास प्राधान्य**

शेतकरी आधुनिक व यंत्रांच्या सहाय्याने शेती करण्याकडे कल दिसून येत असल्यामुळे खरीपपूर्व हंगामासाठी शेतीच्या केल्या जाणाऱ्या मशागतीसाठी ट्रॅक्टरद्वारे नागरणी, रोटावेटर, सरी पाडणे, पाइपलाइन टाकने, शेणखताची वाहतूक, चारा वाहतूक यासंबंधी सर्व कामांसाठी ट्रॅक्टरचा वापर केला जातो. त्यातच मागील काळात इंधन टंचाईचा बसलेला फटका आणि इंधनात झालेली दरवाढ यामुळे शेती तयार करण्यासाठी ट्रॅक्टरचे दर वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. मात्र, यंत्राद्वारे शेती पूर्णतः तयार झालेली दिसून येत आहे.

**शेतीकामांसाठी मजूर मिळेना**

शेतीकामे करण्यासाठी मजूर मिळत नसल्याचे चित्र आहे. मजूर दरात झालेली भरमसाट वाढ, उक्ते पद्धतीने घेण्याची पद्धत मजुरांनी वापरल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये थोडी नाराजी आहे. मात्र, मजूर मिळत नसल्यामुळे या पद्धतीचा वापर करून घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे.

**सालदार परंपरा संपुष्टात येण्याच्या मार्गावर**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्याचा शेतकऱ्यांचा कल असून, त्यामुळे वर्षभरात शेतीकामे बैलांकडून करून घेण्यासाठी सालगड्याची गरज शेतकऱ्याला असायची. मात्र, यंत्रसामग्रीचा वापर करून शेतीकामे केली जात असल्यामुळे त्याचबरोबर सालदार गडीही मिळणे दुरापास्त झाल्यामुळे सालदार परंपरा संपुष्टात काही वर्षांत येण्याची शक्यता आहे.

**ठिबक नळी पसरवण्याचे काम अंतिम टप्प्यात**

मेथी परिसरात मोठ्या प्रमाणात खरिपात कापूस पिकाची लागवड केली जात असल्यामुळे त्याचबरोबर परिसरात ठिबक सिंचनाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे सरी पाडून ठिबक नळी पसरवण्याचे काम अंतिम टप्प्यात असून हे काम करण्यासाठी शेतकरी कुटुंबातील सर्वच जण शेताच्या बांधावर राबतांना दिसून येत आहेत. काही शेतकऱ्यांकडे तुटपुंजी पाण्याची व्यवस्था आहे; परंतु मे हिटचा बसलेला फटका कृषी विभागाने कापूस लागवडीसाठी जून महिन्याचा मुहूर्त घेण्याचे बजावण्यात आल्यामुळे शेतकरी सावध रीतीने काम करताना दिसून येत आहेत.

**पेरणीचे क्षेत्र कमी होण्याची शक्यता**

परिसरात मोठ्या प्रमाणात कडधान्य व बाजरी पीक घेण्यात येत होते; परंतु नगदी पिकांकडे शेतकरी वळल्यामुळे तसेच कडधान्य व बाजरी काढण्यासाठी मजूर मिळत नसल्यामुळे आपल्या कुटुंबाद्वारे काढणीयोग्य पिके घेण्याकडे शेतकरी वर्गाचा कल आहे. त्यामुळे परिसरात पेरणी क्षेत्र कमी होण्याची शक्यता आहे.

**चारा साठवणूक सुरू**

मेथी परिसरात मोठ्या प्रमाणात शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय केला जात असल्यामुळे पावसाळ्यात लागणारा चारा साठवणुकीचे काम अंतिम टप्प्यात आहे. कारण, रोहिणी नक्षत्राची सुरुवात झाली असून, शेतकरी आपली कामे उरकण्यासाठी धावपळ करत आहेत.

**बियाणे व खतांच्या किमतीत भरमसाट वाढ**

दिवसेंदिवस वाढणारी महागाई





खरिपासाठी लागणारे बियाणे व खतांच्या किमती झालेली भरमसाठ वाढ शासनाच्या विविध अटी या दुहेरी संकटातून कसाबसा शेतकरी मार्ग काढत आहे शासनाने योग्य प्रमाणीत बियाणे रासायनिक खते मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत, अशी अपेक्षा शेतकरी ठेवतो. यावर्षी शासनाने शेतीमालाच्या दरांसाठी सुधारणा करावी, अशी अपेक्षा युवक शेतकरी करतात.

अशा विविध समस्यांतून शेतकरी खरिपाची तयारी करीत आहेत. मागील दोन वर्षांपासून पडलेला सततचा दुष्काळ व अवकाळीचा बसलेला फटका यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले. तो यावर्षी मेघराजा धो धो बरसो आणि परिसरातील छोटे-मोठे जलसाठे ओसंडून व्हावेत, पिकांना योग्य प्रकारचा दर मिळो, अशी अपेक्षा शेतकरी वरुणराजाकडे करीत आहे.

## महत्त्वाचे

### मान्सूनपूर्व पाऊस २९ मे ते ५ जून दरम्यान येणार?

**नवी दिल्ली :** भारताच्या ८० ते ९० टक्के भागात २९ मे ते ५ जून दरम्यान मान्सूनपूर्व पाऊस पडू शकतो. हा मान्सून अजून केरळमध्ये पोहोचलेला नाही. हवामान विभागाने २६ मे रोजीचा अंदाज वर्तविला होता. मान्सून येण्यासाठी केरळमधील १४ निश्चित स्थानकांवर सलग दोन दिवस २.५ मिमी पाऊस पडणे आवश्यक आहे. दक्षिण-मध्य अरबी समुद्रातील चक्रीवादळामुळे ढग कमकुवत झाले आहेत. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून पुढे सरकू शकतो. उपग्रह, सागरी आणि वातावरणीय माहितीच्या आधारे हवामानाचा नकाशा तयार करते. त्याच्या चित्रामध्ये पुढील आठ दिवसांत दक्षिण भारत, पूर्व भारत, ईशान्य आणि बंगालच्या उपसागराला लागून असलेल्या भागांमध्ये जास्त पावसाचे संकेत दिसत आहेत. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सूर्याची किरणे भारताच्या मोठ्या भागावर जवळजवळ सरळ पडतात. यामुळे जमीन वेगाने गरम होते आणि तापमान वाढते. नवतपाच्या तीव्र उष्णतेपासून आणि उष्माघातापासून वाचण्यासाठी बाहेर पडताना आवश्यक वस्तू सोबत ठेवा; जेणेकरून शरीर हायड्रेटेड राहील.

# नक्षल्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्‌ध्वस्त

## गडचिरोली पोलिसांची मोठी कारवाई

◆ **गडचिरोली, २८ मे**

गडचिरोली पोलिस आणि नारायणपूर पोलिसांच्या संयुक्त आंतरराज्यीय अभियानात माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्‌ध्वस्त करण्यात आला असून, मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.


जप्त करण्यात आलेले शस्त्रनिर्मिती साहित्य

ऑपरेशन 'अंतिम प्रहार' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत १ इन्सास रायफल, २ सिंगल शॉट रायफल, २ बारा बोअर रायफल आणि १८ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तसेच २५ किलो आयईडी स्फोटक, २ क्लेमोर, ११० डेटोनेटर, कॉर्टेक्स वायर, ५०० पेक्षा अधिक बीजीएल सेल, ७ बीजीएल लॉन्चर, ३ ट्यूब लॉन्चर आणि शस्त्रनिर्मितीसाठी वापरली जाणारी लेथ मशीन, मोटार, ग्राईंडर मशीन, इन्व्हर्टर, बॅटरी, सोलर प्लेट आदी साहित्यही हस्तगत करण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळ जवळपास संपुष्टात आली असली तरी सीमावर्ती दुर्गम जंगल परिसराचा वापर करून माओवादी शस्त्र व स्फोटक साहित्य लपवून ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सुरक्षा दलांवर घातपात करण्याच्या उद्देशाने हे साहित्य वापरले जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनात २६ मे रोजी विशेष अभियान पथक प्राणहिता, डीआरजी नारायणपूर आणि बीडीडीएस प्राणहिता यांच्या संयुक्त पथकाने महाराष्ट्र-छत्तीसगड सीमावर्ती जंगल परिसरात शोधमोहीम राबविली. २७ मे रोजी ही कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., अपर पोलिस अधीक्षक अहेरी हर्षवर्धन बी. जे., पोलिस उपअधीक्षक विशाल नागरगोजे आणि नारायणपूरचे पोलिस उपअधीक्षक मनोज मंडावी यांच्या मार्गदर्शनात पार पडली.



# मुख्यमंत्री फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस कालपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या समवेत काल ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच सिंचन प्रकल्प,जलजीवन मिशन आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या होत्या.

### राज्याचे विषय सोडवण्यासाठी दिल्लीत आलो: एकनाथ शिंदे



महाराष्ट्राचे विषय केंद्रात प्रलंबित होते, त्यामुळे ते सोडवण्यासाठी आम्ही दिल्लीत आलो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. उध्दव ठाकरे यांच्या सरकारला केंद्र सरकारशी बोलणे अडचणीचे वाटत होते, आम्ही मात्र सर्व प्रश्नावर केंद्र सरकारशी बोलतो आणि राज्याचे प्रश्न सोडवून घेतो. राज्यासाठी जे आवश्यक आहे, ते मागण्यात गैर काय आहे? तो आमचा अधिकार आहे, असे ते म्हणाले. विधानपरिषदेच्या निवडणुकीतील जागावाटप सन्मानाने होईल, या मुद्यावरुन महायुतीत कोणतेच मतभेद नाहीत, असे स्पष्ट करत शिंदे म्हणाले की, महायुतीत काय चालले, ते तुम्हाला उद्या कळेल. जागावाटपाचे सूत्र मुख्यंत्र्यांनी बुधवारीच सांगितले आहे. महाविकास आघाडी १७ जागा लढत असली तरी एकही जागा त्यांना मिळणार नाही, असे ते म्हणाले.

# भाजपाने चार प्रदेश अध्यक्ष बदलले

## केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा दिल्ली भाजपाचे अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

भारतीय जनता पार्टीने संघटनात्मक बदल करताना दिल्ली, पंजाब, हरयाणा आणि त्रिपुरा या चार राज्यांत नवे अध्यक्ष नियुक्त केले आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या अनुमतीने भाजपाचे राष्ट्रीय महासचिव अरुणसिंह यांनी गुरुवारी या नियुक्त्यांची घोषणा केली.


हर्ष मल्होत्रा


केवलसिंग ढिल्लो


अभिषेक देबरॉय


अर्चना गुप्ता

केंद्रीय रस्ते वाहतूक राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांना दिल्ली भाजपाचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. वीरेंद्र सचदेवा आतापर्यंत दिल्ली प्रदेश भाजपाचे अध्यक्ष होते. हर्ष मल्होत्रा पूर्व दिल्लीचे खासदार आहेत. २०१२ मध्ये नगरसेवक म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला, २०१५ मध्ये पूर्व दिल्ली महानगरपालिकेचे ते महापौर झाले. २०२४ मध्ये पहिल्यांदा ते लोकसभेवर निवडून आले आणि त्यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाला.

माजी आमदार केवलसिंह ढिल्लो यांना पंजाब प्रदेश भाजपाचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. आतापर्यंत ढिल्लो पंजाब भाजपाचे उपाध्यक्ष होते. सुनील जाखड सध्या पंजाब भाजपाचे अध्यक्ष आहेत. जाखड यांचा अध्यक्षपदाचा तीन वर्षांचा कार्यकाळ जुलै महिन्यात संपत आहे. ढिल्लो पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग यांचे निकटवर्ती आहेत. २०२२ मध्ये त्यांनी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. पंजाब विधानसभेची निवडणूक २०२७ मध्ये होणार आहे. त्यामुळे ढिल्लो यांच्या नियुक्तीला महत्व आले.

### अर्चना गुप्ता दुसऱ्या महिला अध्यक्ष

**हरयाणा प्रदेश भाजपाची जबाबदारी डॉ. अर्चना गुप्ता यांच्याकडे सोपवण्यात आली. मोहनलाल बडोली यांच्या जागेवर डॉ. गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली. गुप्ता प्रदेश भाजपाच्या आतापर्यंत महासचिव होत्या. अर्चना गुप्ता या हरयाणा भाजपाच्या दुसऱ्या महिला अध्यक्ष आहेत. याआधी डॉ. कमला वर्मा १९८० ते १९८३ या काळात हरयाणा भाजपाच्या अध्यक्ष होत्या. अभिषेक देबरॉय त्रिपुरा भाजपाचे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत.**

### सुरतच्या शेतकऱ्याने केले केळीचे विक्रमी उत्पादन

**सुरत :** सुरतमधील एका तरुण शेतकऱ्याचे वडील, अनेक वर्षे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर केल्यामुळे कर्करोगाला बळी पडले. या घटनेचा त्याच्यावर खोलवर परिणाम झाला आणि त्याने नैसर्गिक शेती करण्याचा निर्णय घेतला. कल्पेश पटेलने केवळ रासायनिक खतांवर होणारा खर्चच वाचवला, तसेच केळीच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली. मागील वर्षी, त्याच्या शेतातील केळीच्या एका घडचे वजन ७३ किलो भरले, तर या तुलनेत सरासरी वजन २० किलो असते. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कल्पेशशी संवाद साधून त्याच्या यशाची गाथा समाज माध्यमावर सामायिक केल्यानंतर, त्याच्या नैसर्गिक केळी शेतीला राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली.

# २१ प्रादेशिक पक्षांचा उत्पन्नापेक्षा जास्त खर्च

## २०२४-२५ मध्ये ५१ टक्क्यांनी घसरले उत्पन्न

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ३६ प्रादेशिक राजकीय पक्षांचे एकत्रित उत्पन्न ५१ टक्क्यांपेक्षा जास्त घटले. यापैकी २१ पक्षांनी त्यांच्या घोषित उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला, असे असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्सने (एडीआर) एका अहवालात म्हटले आहे.

हा अहवाल २७ मे रोजी जारी करण्यात आला. यात ५७ मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांपैकी अशा ३६ पक्षांच्या लेखापरीक्षित खात्यांचे विश्लेषण करण्यात आले, ज्यांचे आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उलब्ध होते.

लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची ३१ ऑक्टोबर २०२५ ही मुदत उलटल्यावर २०७ दिवस झाल्यावरही ६७ पैकी ३६ प्रादेशिक पक्षांनी हे लेखापरीक्षण सादर केलेले नाही, असे या अहवालात म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रादेशिक पक्षांचे एकूण उत्पन्न १,१९२.९४ कोटी रुपये इतके राहिले. हे उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील २,४६३.१७ कोटी रुपयांच्या तुलनेत १,२७०.२३ कोटी रुपयांनी म्हणजेच ५१.५७ टक्क्यांनी कमी झाले.

तथापि, या पक्षांनी जाहीर केलेला एकूण खर्च १,४३३.०७ कोटी रुपयांवर पोहोचला. हा त्यांच्या एकत्रित उत्पन्नापेक्षा २४०.१२ कोटी रुपयांनी म्हणजे सुमारे २० टक्क्यांनी जास्त होता, असे एडीआरने अहवालात म्हटले आहे.

विश्लेषण करण्यात आलेल्या पक्षांपैकी, पहिल्या पाच पक्षांचा एकूण उत्पन्नापेक्षा जवळपास ६९ टक्के आणि एकूण खर्चामध्ये ७७ टक्क्यांपेक्षा जास्त वाटा होता. या प्रादेशिक पक्षांमध्ये तेलुगू देसम पार्टीने सर्वाधिक २२८.३१ कोटी रुपयांचे उत्पन्न जाहीर केले. हे उत्पन्न त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या १९.१४ टक्के इतके आहे. यानंतर अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस २१९.३५ कोटी रुपयांसह आणि वायएसआर काँग्रेस १४०.३९ कोटी रुपयांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

खर्चाच्या आघाडीवर वायएसआर काँग्रेसने सर्वाधिक ३४०.२० कोटी रुपये खर्च केले, त्यानंतर बिजू जनता दलाने २८८.४४ कोटी रुपये आणि एआयटीसीने २२७.५९ कोटी रुपये खर्च केले. ३६ पैकी २१ पक्षांनी वर्षादरम्यान जमा केलेल्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला. वायएसआर काँग्रेसने सर्वाधिक अतिरिक्त खर्चाची नोंद केली असून, त्यांनी आपल्या उत्पन्नापेक्षा ११९.८२ कोटी रुपये अधिक खर्च केले. ही रक्कम त्यांच्या कमाईच्या १४२.३३ टक्के इतकी आहे. एआयटीसी, बीआरएस, जदयू आणि समाजवादी पक्षांनीही आपल्या उत्पन्नापेक्षान जास्त खर्च झाल्याचे नमूद केले आहे.



# स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

◆ **मुंबई, २८ मे**

प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. येथील लोकभवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्यपालांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या अभिवादनपर कार्यक्रमाला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती आणि परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मंत्रालयात त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. या कृतज्ञता सोहळ्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी निलेश हरड यांच्यासह मंत्रालयातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून आदरांजली

नवी दिल्लीः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यानंतर कोपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल आदी उपस्थित होते.

# हवालाचे १.२२ कोटी घेऊन जाणाऱ्याला अटक

◆ **हैदराबाद, २८ मे**

मुंबईहून हैदराबादला हवालाचे पैसे घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीच्या ताब्यातून १.२२ कोटी रुपये रोख जप्त करण्यात आली असून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती सरकारी रेल्वे पोलिसांनी बुधवारी दिली.

मंगळवारी सरकारी रेल्वे पोलीस सिकंदराबादने आरपीएफ कर्मचाऱ्यांसोबत केलेल्या संयुक्त तपासणीदरम्यान, देवगिरी एक्सप्रेसने हवालाचे पैसे घेऊन जाणाऱ्याला अटक करण्यात आली, असे एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. बोलाराम आणि मलकाजगिरी रेल्वे स्थानकांदरम्यान एक बॅग घेऊन फिरणाऱ्या या व्यक्तीबद्दल अधिकाऱ्यांना संशय आला. चौकशीत हा व्यक्ती महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील असल्याचे उघड झाले.

२५ मे रोजी त्याला मुंबईतील एका दागिन्यांच्या दुकानदाराकडून एक कोटी २२ लाख ७० हजार रुपये मिळाले होते. सराफाच्या सूचनेनुसार, तो देवगिरी एक्सप्रेसने सिकंदराबादला रोख रक्कम घेऊन जात होता. ती सिकंदराबादच्या मोंडा मार्केटमध्ये कथितपणे दागिन्यांचे दुकान चालवणाऱ्या एका व्यक्तीला सुपूर्द करायची होती. रोख रक्कम वाहून नेण्यासाठी त्याला पाच हजार रुपयांचे आमिष दाखवण्यात आले होते.

# उष्माघाताने जीव गेल्यास सरकार जबाबदार : जरांगे

## ३० मेपासून करणार बेमुदत उपोषण

◆ **आंतरवाली, २८ मे**

आंतरवालीमध्ये ३० मे रोजी रखरखत्या उन्हात बाजेवर बसत आमरण उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार, ना काही. जे होईल ते होईल. आता उष्माघाताने माझा बळी गेला तर त्याला सरकार जबाबदार असेल, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

आता होणारे उपोषण खूप कडक होणार आहे. सरकारला पाहिजे त्यापेक्षा जास्त वेळ दिला आहे. २९ मे रोजी १० महिने पूर्ण होत आहेत. गोरगरीब मराठ्यांच्याच लेकरांवर अन्याय केला जातो. मला काही प्रसाद लाड यांना दोष द्यायचा नाही. मी मराठा आहे. मी उगाच कोणाला बोलत नाही. त्यांनी



आमच्या माता-भगिणींना मारले म्हणून आम्ही त्यांना बोलतो, असे जरांगे म्हणाले.

अनेकांचे फोन आले पण मी फोनवर चर्चा करणार नाही. माझ्या समाजासाठी मी काम करत आहे. इतके क्रुर सरकार कधी आले नसेल. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज सधन आहे म्हणून त्यांना आरक्षण देता येणार नाही, असे सरकार सांगते.

# गाडीला आग लागल्याने चार जण जिवंत जळाले

◆ **राजस्थान, २८ मे**

राजस्थानमधील अजमेर जिल्ह्यातील बोराडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्रीरामपुरा गावात गुरुवारी सकाळी अपघात घडला. गाडीला अचानक आग लागल्याने चार जण जिवंत जळले. हा अपघात घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

माजी सरपंच, त्यांची पत्नी आणि त्यांची भाची यांच्यासह तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात गंभीररित्या भाजलेल्या एका जिल्हा परिषद सदस्याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. श्रीरामपुरा गावचे रहिवासी असलेले माजी सरपंच राम सिंह चौधरी हे छातीत दुखत असल्याची तक्रार करणाऱ्या त्यांच्या आई आणि जिल्हा परिषद सदस्य पूसी देवी यांना रुग्णालयात घेऊन जात होते. ते पहाटे ५:३० च्या सुमारास त्यांच्या गाडीतून निघाले. राम सिंह चौधरी यांच्यासोबत त्यांची पत्नी (माजी सरपंच) सुरग्यन देवी आणि त्यांची भाची महिमा यादेखील गाडीत होत्या. गावापासून थोड्याच अंतरावर असलेल्या श्रीरामपुरा जवळ एका धावत्या गाडीला अचानक आग लागली. गाडीचे दरवाजे उघडत नसल्याने राम सिंग चौधरी, त्यांची पत्नी सुरग्यन देवी आणि भाची महिमा हे तिघेही गाडीत अडकले. तिघांचाही जागीच जळून मृत्यू झाला.



राम सिंग यांची आई, पूसी देवी, ज्या गाडीत प्रवासी म्हणून होत्या, त्यांना कसेबसे बाहेर काढण्यात आले, पण तोपर्यंत त्या ६० टक्क्यांहून अधिक भाजल्या होत्या आणि उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.

# शायर बशीर बद्र यांचे निधन

◆ **भोपाळ, २८ मे**

प्रख्यात शायर डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भोपाळ येथे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बद्र हे बऱ्याच काळापासून डिमेंशिया (स्मृतिभ्रंश) या आजाराने ग्रस्त होते. त्यांची स्मरणशक्ती पूर्णपणे लयाला गेली होती आणि त्यांना लोकांना ओळखणेही अशक्य झाले होते. मागील काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. जेव्हा कधी त्यांना एखाद्या मुशायऱ्याची आठवण करून दिली जाई, तेव्हा ते ''इर्शाद! इर्शाद!'', असे म्हणायचे. बद्र यांनी उर्दू गझलला एक नवा सूर दिला. क्लिष्ट शब्दरचनेऐवजी साध्या आणि सोप्या शब्दांचा वापर करून त्यांनी आपली शायरी केली. त्यांच्या अंत्यसंस्काराची वेळ अद्याप निश्चित झालेली नाही. तथापि, कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी संध्याकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाण्याची शक्यता आहे. बशीर बद्र यांच्या शायरीमध्ये प्रेम, वेदना आणि जीवनातील अनुभवांची झलक मिळते.




१९६९ मध्ये बशीर बद्र यांनी एएमयू मधून पदव्युत्तर पदवी देखील घेतली होती. शायर बशीर बद्र यांनी १२ ऑगस्ट १९७४ रोजी मेरठ कॉलेजच्या उर्दू विभागात व्याख्याता म्हणून रुजू झाले होते. ते येथे १९९० पर्यंत राहिले. १९७४-१९९० चा काळ बशीर बद्र यांच्यासाठी खूप महत्त्वाचा ठरला. तेव्हा ते शायरीच्या शिखरावर पोहोचले होते.

# फार्मासिस्टना पाच लाखांचे अपघाती विमा कवच

## 'एमआरपीए'च्या लढ्याला मोठे यश

◆ **मुंबई, २८ मे**

राज्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी आहे. महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलने फार्मासिस्टसाठी पाच लाख रुपयांची अपघाती विमा योजना अधिकृतपणे लागू केली आहे. महाराष्ट्र रजिस्टर्ड फार्मासिस्ट असोसिएशनच्या (एमआरपीए) सततच्या पाठपुराव्यामुळे आणि आग्रही मागणीमुळे कौन्सिलने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून फार्मासिस्टच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर होता. या अनुषंगाने एमआरपीएचे अध्यक्ष कैलास तांदळे यांनी अपघाती विम्याची मागणी लावून धरली होती. त्यांच्या या लढ्याला अखेर यश आले असून, कौन्सिलने या मागणीची दखल घेत विमा योजना जाहीर केली आहे.

फार्मासिस्टच्या हितासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे,अशी प्रतिक्रिया कैलास तांदळे यांनी या निर्णयानंतर व्यक्त केली. या योजनेमुळे राज्यातील ५ लाखांपेक्षा अधिक नोंदणीकृत फार्मासिस्टना मोठे सुरक्षा कवच प्राप्त झाले आहे.

अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व: दुर्दैवाने कोणताही मोठा अपघात होऊन मृत्यू ओढवल्यास किंवा अपंगत्व आल्यास, संबंधित फार्मासिस्टला किंवा त्यांच्या कुटुंबाला विम्याची रक्कम दिली जाईल.

आर्थिक आधार: नोकरी किंवा व्यवसाय करत असताना अचानक येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी हा विमा फार्मासिस्टच्या कुटुंबासाठी एक मोठा आर्थिक आधार ठरणार आहे.

### योजनेला महादेवलाल श्रॉफ यांचे नाव देण्याची मागणी

दरम्यान, या महत्त्वपूर्ण योजनेला कोणत्याही जिवंत व्यक्तीचे नाव देऊ नये, अशी भूमिका राज्यातील फार्मासिस्टनी घेतली आहे. त्याऐवजी, भारतीय फार्मसीचे जनक महादेवलाल श्रॉफ यांच्या स्मरणार्थ या योजनेला 'महादेवलाल श्रॉफ फार्मासिस्ट सुरक्षा कवच विमा योजना 'असे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी राज्यभरातील फार्मासिस्टकडून जोर धरत आहे. यामुळे खऱ्या अर्थाने या क्षेत्रातील योगदानाचा सन्मान होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

जळगाव
# तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com

१ जळगाव, शुक्रवार, २९ मे २०२६



## आपलं महानगर




जळगाव : जळगाव जिल्ह्याची तहान भागविणाऱ्या गिरणेतून वाळूची सर्रासपणे लूट होत आहे. जिल्ह्यात वाळू ठेक्यांचा लिलाव झालेला नसतांनाही भर दिवसा वाळू तस्करांकडून उपसा आणि अवैध वाहतूक केली जात आहे. काही दिवसांपूर्वी नदी पात्रासह बांभोरी गावातून वाळूची वाहतूक करणारी वाहने प्रशासनाने जप्त केली होती. मग पुन्हा ही वाहने आली कुठून? प्रशासनाच्या नाकावर टिच्चून होणारा अवैध वाळू उपसा थांबणार तरी कधी? प्रशासनाचे प्रमुख कारवाईत सातत्य ठेवण्याची हिंमत दाखवतील काय? असे प्रश्न उपस्थित होत आहे.

## महत्त्वाचे



**पुणे शहरातील अँटीकरप्शन विभागातले एस.पी शिरीष देशपांडे यांनी पो.मि. अनिल वर्मा यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार केला.**

### अत्यवस्थ रुग्णाचा मृत्यू

**जळगाव** : स्टेशन परिसरातील दुध डेअरीजवळ रस्त्याच्या कडेला ६० ते ६५ वर्षीय गृहस्थ बेशुध्दावस्थेत आढळुन आले होते. त्यांना तत्काळ रुग्णवाहिकेतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पोलिसांनी हलविले होते. उपचारादरम्यान प्रकृती अधिक खालावून गृहस्थाचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासातून या मयताचे नाव अशोक पांडुरंग कासारे असे समजले. मात्र ते कोणत्या गावाचे आहेत,हे अद्याप समजु शकले नाही. या प्रकरणी खबरीनुसार शहर पोलीस ठाण्यात बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मयताचा मृतदेह शवविच्छेदन कक्षात ठेवण्यात आला आहे. ओळख पटवून नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. हवालदार प्रवीण वाघ हे तपास करीत आहेत.

### गृहस्थाचा उपचारात मृत्यू

**जळगाव** : बेशुध्द अवस्थेत दाखल केलेल्या गृहस्थाचा उपचारादरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मृत्यू झाला. अनिल मुलचंद खोडे (वय ४५,रा. रामेश्वर कॉलनी) असे मयताचे नाव आहे. त्यांची प्रकृती अचानक अत्यवस्थ झाल्याने नातेवाईकांनी त्यांना बुधवारी (२० मे) रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरु असताना त्यांची प्रकृती खालावून त्यांचा बुधवारी (२७ मे) दुपारी मृत्यू झाला. या प्रकरणी खबरीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. हवालदार मनोज घुले हे तपास करीत आहेत.

### बेपत्ता तिघे मिळाले

**जळगाव** : वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेले तिघे मिसिंग तपासात मिळुन आले. १९ वर्षीय तरुणी २७ मे रोजी वरणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली होती. याप्रकरणी पोलिसात मिसिंग दाखल करण्यात आली. ६२ वर्षीय गृहस्थ मुक्ताईनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २५ मे रोजी तसेच १८ वर्षीय तरुणी एरंडोल पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २५ मे रोजी बेपत्ता झाली. हे तिघे जण बुधवारी (२७ मे) मिसिंग तपासात पोलिसांना मिळुन आले.

**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# जिल्ह्याच्या नजरा दिल्लीतील बैठकीकडे

## विधानपरिषदेसाठी भाजपा-सेनेत रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

विधानपरिषदेच्या निवडणुकीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. जळगाव जिल्हा विधानपरिषदेची जागा भाजपाची असली तरी शिवसेनेने देखील दबावतंत्राचा वापर करून त्यावर दावा केला आहे. दरम्यान राज्यातील १७ जागांबाबत दिल्लीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ह्यांच्या उपस्थितीत दिल्लीत बैठक झाली. मात्र अद्याप निर्णय झालेला नसल्याने जिल्ह्यावासियांच्या नजरा दिल्लीतील बैठकीकडे लागल्या आहेत.

जळगाव स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपा आणि शिवसेनेत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. निवडणूक जाहीर झाल्यापासूनच शिवसेनेने जळगावची जागा घेण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील हे त्यांचे सुपुत्र प्रतापराव पाटील यांच्यासाठी संपूर्ण ताकद लावत आहे. कुठल्याही परीस्थितीत जळगावची जागा मुलासाठी शिवसेनेकडे घेण्याकरीता त्यांच्या मुंबई वाऱ्या सुरू आहेत.



### जागा कुणाची आज फैसला होणार?

विधानपरिषदेच्या जागा वाटपासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे दोन दिवसांपासून दिल्लीत तळ ठोकून आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे बैठका सुरू असून जागा वाटप मुंबईतच करण्याच्या सूचना नेतृत्वाने दिल्या आहेत. त्यामुळे शुक्रवारी मुंबईत परतल्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये बैठक होऊन जागा वाटपाचा अंतीम फैसला होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुंबईंच्या बैठकीनंतरच जळगावची जागा कुणाची? याचा निर्णय होणार आहे.

तर दुसरीकडे जळगावची जागा २० वर्षापासून भाजपाचीच असल्याने भाजपाने ईच्छुक उमेदवारांना अर्ज घेऊन ते भरण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**जागा अदलाबदलीच्या चर्चा**

विधानपरिषदेच्या १७ पैकी नाशिक आणि संभाजीनगर या जागेवर भाजपाने दावा केला आहे. तर दुसरीकडे शिवसेना जळगावच्या जागेसाठी आग्रही आहे. नाशिक किंवा संभाजीनगरची जागा भाजपाच्या पारड्यात पडल्यास त्याबदल्यात जळगावची जागा शिवसेनेला मिळावी अशी भूमिका आमदारांनी घेतली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र भाजपा जळगाव न सोडता नाशिक किंवा संभाजीनगरची जागा अधिकची लढण्याची तयारी करीत आहे.

**शिवसेनेच्या हालचालींवर भाजपाचे लक्ष**

जिल्ह्यात महायुतीने आत्तापर्यंतच्या निवडणुका ह्या एकसंघपणे लढल्या आहेत. विधानपरिषदेच्या निवडणुकीत मात्र महायुतीतील भाजपा आणि शिवसेना हे दोन्ही प्रमुख घटक पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीकडून शिवसेनेच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेऊन त्याचे रिपोर्टींग घेतले जात आहे.

# मुलींच्या सुधारगृहात आरोग्य जनजागृती

## रोटरी क्लब अभियानास उस्फुर्त प्रतिसाद

**जळगाव** : हायजेनिक डे निमित्त रोटरी क्लब अंतर्गत आरसीसी ऑफ राईपतर्फे मुलींच्या सुधारगृहात ''शारीरिक व मानसिक स्वास्थ्य'' या विषयावर आरोग्य जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात तज्ज्ञांनी मुलींशी संवाद साधत आरोग्य, स्वच्छता, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रमुख वक्त्या डॉ. हर्षदा पाटील यांनी मुलींना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी किशोरवयीन मुलींनी आरोग्याबाबत जागरूक राहणे, संतुलित आहार घेणे आणि नियमित स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले.

''स्वच्छता ही केवळ सवय नसून उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे,'' असे त्या म्हणाल्या. तसेच शारीरिक आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात विविध समस्या उद्भवू शकतात, त्यामुळे वेळोवेळी वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.



मानसिक स्वास्थ्य विषयावर मार्गदर्शन करताना स्वाती ढाके यांनी सकारात्मक विचारसरणी आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व अधोरेखित केले. जीवनातील अडचणींना खंबीरपणे सामोरे जाताना मानसिक संतुलन टिकविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ''मन निरोगी असेल तर जीवन अधिक सुंदर आणि सक्षम बनते,'' असे त्या म्हणाल्या. त्यांनी तणावमुक्त जीवनासाठी संवाद, वाचन, छंद जोपासणे आणि सकारात्मक वातावरणात राहण्याचा सल्ला दिला.

यावेळी मुलींनी मनमोकळेपणाने विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांशी संवाद साधला. यशस्वी आयोजनासाठी आरसीसी ऑफ राईपच्या अध्यक्षा पल्लवी शिंपी व मानद सचिव योगिता पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विनया जोशी यांनी तर आभार प्रदर्शन योगिता पाटील यांनी केले.

कार्यक्रमाला नाशिक येथील धनदीप बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा यमूताई अवकाळे, कल्पना शिंपी, विनिता भट तसेच सुधारगृहातील सर्व मुली व महिला उपस्थित होत्या.



# घागरीतून ठिबक पध्दतीने झाडांना पाणी देण्याचा शहरात बेस्ट उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**जळगाव, २८ मे** : कडाकाच्या उन्ह्याच्या तापमानात झाडांचा बचाव करण्यासाठी मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेला पडलेल्या घागरी गोळा केल्या. त्यामध्ये पाणी भरले. हे पाणी झाडांना ठिबक पध्दतीने देण्याचा निसर्गपूरक उपक्रम शहरात राबविला जात आहे. वेस्टपासून बेस्ट तयार करण्याची ही संकल्पना जगदीश बैरागी तसेच त्यांचे मातृभूमी रक्षक अभ्यासिका वरच्या वर्गाचे विद्यार्थी यांनी राबविली.

झाडाला सिंचनाप्रमाणे थेंब थेंब पाणी मिळाल्याने झाडाची चांगली वाढ होते. त्यानुसार बैरागी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी फेकलेल्या घागरी जमविल्या.त्या झाडाजवळ ठेवल्या. त्यात भरलेले पाणी ठिबकसारखे झाडाला देऊ लागले. शहरातील प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या त्यांच्या परिसरात अथवा त्यांच्या घराजवळील झाडाला पाण्याची पूर्तता फेकलेल्या माठ, घागरीव्दारे करावा. यामुळे शहरातील तापमान कमी होईल झाडे वाचतील. एका झाडाला चार लिटर पाणी जर याप्रमाणे घागर ठेवले त्याच्यात पाणी टाकलं तर झाडाला पुरेसा पाणीपुरवठा होतो आणि झाड चांगले हिरवागार होते. या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे,असे आवाहनही बैरागी यांनी केले आहे.

# शहरातून तीन दुचाकी घेत चोरटे फरार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

शहरात दुचाकी चोरीच्या घटना घडतच आहेत. शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन तसेच रामानंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक अशा शहरातून तीन दुचाकी चोरट्यांनी चोरुन नेल्या.

हितेश संतोष शिंदे (वय २६,रा. चौघुले प्लॉट, शनिपेठ) हे हातमजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ते सुमारे ८० हजार रुपये किमतीची दुचाकी (एमएच १९ डीके २२२०) ने कामानिमित्त मंगळवारी (१९ मे) रात्री ११ ते काव्यरत्नावली चौकात आले. जानता राजा जिमजवळ लावल्यानंतर ते कामाला निघुन गेले. बुधवारी (२० मे) सकाळी आठ वाजेच्या सुमारास ते आले असता त्यांचा दुचाकी दिसली नाही. परिसरात त्यांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी तक्रारीनुसार बुधवारी (२७ मे) रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार अजित पाटील हे तपास करीत आहेत.

हेमंत रमेश चौधरी (वय ३२,रा. मु.पो. अंबडगाव,हमु एसएमआयटी कॉलेज मुक्ताईनगर) हे नोकरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.सोमवारी (२५ मे) ते मंगळवारी (२६ मे) दुपारी चार वाजे दरम्यान ते त्यांच्या मालकीची सुमारे ३० हजार रुपये किमतीची दुचाकी टीव्हीएस (एमएच १९ ईएफ १९५३) ने शहरातील रेल्वे विभागाचा एसएनटी कार्यालयाजवळ गेले. याठिकाणी त्यांनी दुचाकी लावली. व कामानिमित्त निघुन गेले. दुसऱ्या दिवशी ते आले असता त्यांना दुचाकी दिसली नाही. शोध घेतला असता तपास लागला नाही.

तक्रारीनुसार याप्रकरणी बुधवारी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार नंदलाल पाटील हे तपास करीत आहेत.

सोनल राधेश्याम (वय ५१,रा. प्लाट नं.२ खान्देश मिल कॉलनी रिंगरोड) याठिकाणी वास्तव्यास आहेत. त्या व्यावसायिक आहेत. शनिवारी (२३ मे) रात्री दहा वाजेच्या सुमारास त्या त्यांच्या मालकीची सुमारे २० हजार रुपये किमतीची हिरो एचएफ डिलक्स ( एमएच १९ सीई १८८८) ने शहरातील नवीपेठेत प्लाट नं. १२४ परिसरात आल्या. चुलत भावाच्या घरासमोर दुचाकी त्यांनी लावली. त्यानंतर त्या कामानिमित्त निघुन गेल्या. सोमवारी (२५ मे) सकाळी चार वाजता त्या आल्या असता दुचाकी त्यांना दिसली नाही. तक्रारीनुसार याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार उमेश भांडारकर हे तपास करीत आहेत.

# भोकर येथे रेस्टॉरंटमधून अन्न नमुने जप्त

**जळगाव** : अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन, जळगाव कार्यालयाच्या पथकाने बुधवारी (२७ मे) भोकर, ता जळगाव येथील ''श्री चक्रधर रेस्टॉरंट ॲण्ड कोल्ड्रींक्स'' या आस्थापनाची अचानक तपासणी केली. दोन अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले, पुढील कारवाई अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत करण्यात येईल असे सहायक आयुक्त स. कृ. कांबळे यांनी सांगितले. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे तसेच सह आयुक्त (नाशिक विभाग) श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.अन्नपदार्थांच्या गुणवत्ता व दर्जाबाबत नागरिकांनी सतर्क राहून तक्रारी असल्यास १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले.

# भाजपा नगरसेवकांनी संघटन मजबुतीचे गिरवले धडे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

जामनेर तालुक्यातील गारखेडा येथी बॅक वूड रिसॉर्ट येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण कार्यशाळा भाजपाच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी संघटन मजबुतीचे धडे गिरविले.

भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा महानगराचे दोन दिवसीय पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण शिबिर बॅक वूड रिसॉर्ट गारखेडा ता जामनेर येथे पार पडले. या शिबिराचे उद्घाटन २७ रोजी सकाळी १० वाजता आमदार श्रीकांत भारती, प्रदिप पेशकार, आमदार सुरेश भोळे, प्रदेश सरचिटणीस भैरवी वाघ, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, लक्ष्मण सावजी, महापौर दीपमाला काळे, स्थायी सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, चंद्रकात बाविस्कर, रवीजी अनासपुरे,व पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थित झाले. शिबिरामध्ये एकुण ११ सत्रे होती २७ मे रोजी



श्रीकांत भारती, लक्ष्मणराव सावजी, प्रदीप पेशकार, लक्ष्मण सावजी, रवी अनासपुरे, चंद्रकांत बाविस्कर हे वक्ते होते. २८ मे रोजी सर्वप्रथम सकाळी १०:३० स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन आमदार सुरेश भोळे वक्ते प्रविण आलई, महानगर जिल्हाध्यक्ष दिपक सूर्यवंशी, महापौर दीपमाला काळे, स्थायी समिती सभापती डॉ चंद्रशेखर पाटील, गटनेते प्रकाश बालाणी, माजी अध्यक्षा उज्वला बेडाळे, माजी महापौर सिमाताई भोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर वर्गाच्या सत्राला प्रविण आलई, संजय केनेकर, आमदार संजय कुटे यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमात खा मेधा कुलकर्णी यांनी भाजप पक्ष वाढीसाठी पडत्या काळामध्ये ज्यांनी पक्षासाठी करण्याची आहुती दिली व पक्षासाठी मेहनत केली अशा कार्यकर्त्यांमुळेच चांगले दिवस आहे. केंद्रांत व राज्यात सरकार आहे ते फक्त कार्यकर्त्यांमुळेच असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला १२ वर्षे पूर्ण झाले आहे. सबका साथ सबका विकास सबका प्रयास या माध्यमातूनच काम करीत असून भाजपा हा विचार धारेवर चालणारा पक्ष असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन दिवसीय निवासी शिबिराला भाजप जिल्हा महानगर पदाधिकारी, जिल्हा आघाडी अध्यक्ष, व नगरसेवक असे एकुण १५५ कार्यकर्ते अपेक्षित होते. प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख दिपक परदेशी या महाप्रशिक्षण शिबिरासाठी भाजपचे जिल्हा सरचिटणीस विशाल त्रिपाठी, राहुल वाघ, नितीन इंगळे, जयेश भावसार, मिलिंद चौधरी, प्रकाश पंडित उदय भालेराव मयूर भदाणे संजय नारखेडे अजित राणे, विनोद मराठे अतुल बारी, जितेंद्र चव्हाण, आनंद सपकाळे, अमित देशपांडे, रोहित सोनवणे, चेतन तिवारी, हर्षल सेतवाल यांनी अथक परिश्रम घेतले

# कारागृहात जुना वाद उफाळला

## बॅरेकमध्ये मारहाणीत बंदीवान जखमी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

जुन्या भांडणाच्या कारणावरुन ठोश्याबुक्यांनी मारहाण करत संशयिताने भिंतीवर लोटुन दिले. त्यात बंदीवान जखमी झाला. ही खळबळजनक घटना मंगळवारी (२६ मे) संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास जिल्हा कारागृहात बॅरेक क्रमांक आठ मध्ये घडली. राजु नाना काळे (वय २९,रा. वाल्मीकनगर) असे जखमी बंदीचे नाव आहे. याप्रकणी श्याम तुकाराम सुर्यवंशी (रा.जैनाबाद) या बंदीवानविरोधात जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

नितीन नाना काळे याच्या पोटात चाकूने वार करुन खून केला होता. २२ मार्च रोजी या घटनेप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्हयात श्याम सुर्यवंशी हा अटकेत असुन कारागृहात वास्तव्यास आहे. दरम्यान भावाचा खुन केल्याच्या रागातून राजू नाना काळे तसेच त्याचा साथीदार सचिन कोळी यांनी सोमवारी (२५ मे) श्याम सुर्यवंशी याच्या दिनकर नगरातील बंद घराचे कुलुपबंद घरात जाळपोळ केली होती. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. या गुन्ह्यात मयत नितीन काळे याचा भाऊ राजू नाना काळे तसेच त्याचा साथीदार सचिन कोळी या दोघांना पोलिसांनी अटक केली होती. न्यायालयीन कोठडी अंतर्गत दोघांची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

राजु काळे हा उपजिल्हा कारागृहात बॅरेक क्रमांक आठ मध्ये होता. संशयित श्याम सुर्यवंशी याने जुन्या भांडणाचा राग मनात धरत राजु काळे या बंदीला ठोश्या बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. शिवीगाळ करुन भिंतीवर लोटुन दिल्याने राजु काळे या बंदीला दुखापत झाली. याप्रकरणी तक्रारीनुसार जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बुधवारी श्याम सुर्यवंशी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक फौजदार संजय सोनवणे तपास करीत आहेत.

मैत्रिणींनो, आकांक्षासाठी आपले नावीन्यपूर्ण लिखाण आम्हाला tarunbharatakanksha@gmail.com वर मेल करा.

## उन्हाळा आला, त्वचा सांभाळा...

उन्हाच्या वाढत्या तडाख्यामुळे एकीकडे सनबर्नची चिंता सतावतेय तर दुसरीकडे घाम आणि उन्हामुळे त्वचा चिकट होवून मुरुम, ऍक्ने आणि पुरळ अशा समस्या उद्भवतात. उन्हाळ्यात मॉइश्चरायझर वापरणे खूप महत्वाचे आहे. उन्हाळ्यातही त्वचेला ओलावा आवश्यक असतो. तुमची त्वचा हायड्रेट राहण्यासाठी आणि तेलकट वाटू नये म्हणून हलके, तेलमुक्त आणि पाणी-आधारित मॉइश्चरायझर्स वापरा. सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांमुळे त्वचेचे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे डाग, काळे डाग आणि वृद्धत्वाची चिन्हे दिसतात. चेहरा धुतल्यानंतर, चेहऱ्यावर एसपीएफ सनस्क्रीन योग्यरित्या लावावे. फेस वॉश केल्यानंतर सीरम देखील वापरता येते. ते त्वचेत खोलवर जाते आणि खोल ओलावा आणि पोषण प्रदान करते.

# तणाव व्यवस्थापनाचा नवा दृष्टिकोन

रविबाला काकतकर
९८८१७४३०६१

कामाचा दबाव, चिंता, हुरहूर, काळजी, अस्वस्थता,अनिश्चितता, अडचणी, भीती, ही सर्व ताणाची भावंडे होत. यातील प्रत्येक शब्दाचा केवळ उच्चार केला तरी प्रत्येक व्यक्तीवर होणारे भावनिक, कायिक, मानसिक परिणाम वेगवेगळे होतात. न्यूरो लिंग्विस्टिक प्रोग्रमिंग या वर्तनशास्त्राने हे सिद्ध केले आहे की, कोणताही शब्द उच्चारला की ऐकणाऱ्याच्या डोळ्यासमोर तशी प्रतिमा निर्माण होते. तसेच, कोणतेही शब्द ऐकणाऱ्याच्या कानावर पडले तसेच ते आपण 'स्वसंवादा'साठी देखील उच्चारले तरी, प्रतिमेप्रमाणेच त्या शब्दांशी निगडीत अनुभव देखील आपल्या शरीर आणि मनात जागृत होण्यास प्रारंभ होतो.

ताणाची एक समर्पक व्याख्या अशी,'बाह्य मागण्या आणि अंतर्गत क्षमता यामध्ये असंतुलन निर्माण झाले की, शरीर आणि मनावर होणारा परिणाम म्हणजे ताण होय.

बाह्य घटना, इतरांचे वर्तन, वक्तव्य यावर आपले कोणतेच नियंत्रण नसते. त्याचमुळे अश्या प्रत्येक घटनेचा आपल्यावर काय आणि किती परिणाम होऊ द्यायचा, हे केवळ आपल्या हातात असते, हे वैश्विक सत्य प्रथम जाणून घेऊ या. हृदयाची धडधड वाढण्यापासून ते हॉर्ट अटॅक पर्यंत, शरीरावरील त्वचेवर एक्झिमा सारख्या कायिक-मानसिक आजारापर्यंत अनेकविध असे खोलवर परिणाम होतात. वस्तुत: आपण ते आपल्यावर होऊन देतो, असे म्हणू या.

आज अमेरिका-इराण हे युद्धाचे प्रदेश आपल्यापासून शेकडो मैल दूर आहेत. पण, भारतात राहून काही व्यक्तींची प्रचंड चिंता आणि काळजीने झोप उडते. भविष्यात काय काय होऊ शकते या विचारांमुळे त्यांनी ही अस्वस्थता मनात निर्माण होण्यास स्वत:ला परवानगी दिलेली असते. कधी भूतकाळातील युद्धाबाबतच्या वैयक्तिक स्मृती हे देखील त्याचे कारण असू शकते. मागे घडले म्हणजे आताही तसेच घडले असे वाटू लागते. या विचारांना मनात तीव्रतेने, वारंवार आणि बऱ्याच कालावधीपर्यंत थारा दिल्यामुळे आपल्याही नकळत अनेक व्याधींना जन्म मिळतो. या सर्व मन:स्थितींना समर्थपणे हाताळण्यासाठी पुढील काही उपाय उपयुक्त ठरावेत, अशी आशा आहे.

सर्वप्रथम वर उल्लेखलेल्या ताणांच्या व्याख्येच्या संदर्भातील काही उदाहरणे बघू या- बाह्य मागण्या म्हणजे ऑफिसमध्ये टार्गेट पूर्ण करणे गरजेचे आहे. हातात असलेल्या वेळेपेक्षा कामाचा व्याप अधिक असेल तर अंर्तगत क्षमतांचा कस लागतो आणि मनावर ताण निर्माण होतो. तीच बाब विद्यार्थ्यांबाबत अभ्यासाची! परीक्षा जवळ आली की,'मी केलेला अभ्यास मला नेमकेपणाने आठवेल का ?'अशी साशंकता अंतर्गत क्षमातांबाबत निर्माण होते तेव्हा तणाव निर्माण होतो.

यासाठी सर्वप्रथम,'मला आत्ता अस्वस्थ वाटते आहे, मनावर ताण येत आहे,' या स्थितीला ओळखू या. एनएलपीमध्ये आपण जे शब्द स्वत:साठी किंवा इतरांशी संवाद करण्यासाठी वापरतो, त्यामुळे डोळ्यापुढे तशी प्रतिमा आणि अनुभव निर्माण होण्यास प्रारंभ होतो हे पहिलेच! म्हणूनच स्वसंवादासाठी जी प्रतिमा



आपल्या वा ऐकणाऱ्याच्या डोळ्यांसमोर उभी राहणे अपेक्षित आहे त्याच नेमक्या शब्दांची निवड करणे अत्यावश्यक मानावे. जी मानसिक स्थिती मला नको आहे, ते शब्द जाणीवपूर्वक टाळणे गरजेचे होय. यासाठी थोडा 'आतला प्रवास' करू या.

'ताण' या शब्दामुळे अस्वस्थता येत असेल तर त्याऐवजी नवीन काही शब्द मी वापरू शकतो का ते पाहू या. नोकरी चांगली आहे परंतु कामाचा भार अधिक आहे आणि वरिष्ठांना विनंती करूनही कमी होऊ शकत नसेल तर अंतर्गत क्षमता वाढविण्यासाठी पुढील उपायांपैकी कोणता पर्याय मी नव्याने स्वीकारू शकेन, हे पाहावे.

**१. संधी** - प्रत्येक नवे काम किंवा जबाबदारी, ही नवीन संधी मानणे. ऑफिसमधील एकापेक्षा अधिक व्यक्तींचे काम जर आपण अवगत करून घेऊ शकलो तर आपल्या अष्टपैलूत्वात भर पडेल. एखाद्या गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्याचे काम करण्याची जबाबदारी दिल्यास त्याचा ताण वाटून घेण्यापेक्षा, त्या कामामुळे भविष्यात होणाऱ्या अनेकविध फायद्यांचे आपण स्वागत करू शकू. या नव्या कामाचा परिचय झाल्यामुळे त्या व्यक्तीविषयी किंवा त्याला येणाऱ्या अडचणींविषयी आता आपण सहअनुभूतीची भावना जोपासू शकू. त्यामुळे संघभावना जागृत होईल. या आधारे आपण देखील आपले काम किंवा कार्यपद्धतीमध्ये काही बदल करू शकू. दोघांमध्ये पूर्वी संघर्ष असतील आता तर ते कमी होतील. केवळ आपल्याच नजरेतून आपण आता आपले काम बघणार नाही. त्या व्यक्तीच्या वा व्यक्तींच्या दृष्किोनातून आपल्या कामाचे मूल्यमापन करू शकू. नव्या जबाबदारीला आपण संधी म्हणून स्वीकारू.

**२. 'मी माझ्या क्षमता जास्तीत जास्त ताणून पाहात आहे'**- कामाचा भार अचानक वाढला तर ती स्थिती हाताळण्यासाठी आपला नवा स्वसंवाद असा असू शकेल. नव्याने माझ्यातील पात्रता, गुण मला समजतील, मी तावून सुलाखून निघेन ज्यामुळे खंबीर आणि आत्मविश्वासी बनेन. नव्या किंवा अधिक कामाचे मी स्वागत करेन.

**३.आव्हान** - प्रत्येक ताणाला जर आपण 'आव्हान' या शब्दाने संबोधले, तर आपल्या 'आत' काय घडामोड होते? नवी ऊर्जा जागृत होते का? आनंद, तजेला, उत्सुकता, 'करून तर पाहतो' अशी भावना निर्माण होते आहे का हे जाणवते बघू या. जर असेल तर आता प्रत्येक ताणाला आपण 'आव्हान' म्हणण्यास प्रारंभ करू या. मी माझ्या आयुष्यातील 'आव्हानांचे स्वागत करतो'!

**४. माझे यश मला अभिमान वाटवेल! -** कमी वेळात उच्च दर्जाचे आणि अधिक काम जर मी आज करू शकलो तर मागे वळून पाहताना तो प्रोजेक्ट किंवा जबाबदारी आपल्या शिरपेचातील तुरा बनू शकते. कोविडच्या संकटावेळी अगदी अल्प काळात तोंडाचे मास्क किंवा डॉक्टरांना वा विमान प्रवाश्यांना लागणारे संपूर्ण पांढरे संरक्षण किट बनविणाऱ्या कंपन्यांमधील कार्मचाऱ्यांनी रात्रंदिवस काम करून देशातील अनेक नागरिकांना जीव वाचविण्याचे कवच दिले. आजही अनेक डॉक्टर्स त्यांचे ऋण मानतात. त्यांचे अविरत कष्ट आणि यशाचा त्या कर्मचाऱ्याना प्रचंड अभिमान वाटतो. भविष्यात कोणतेही संकट वा आणीबाणी आली तरी मी सज्ज असेन, ही नवी भावना आपणास ताणांऐवजी नवी उमेद देईल.

**५.** भविष्यात स्वतःचा व्यवसाय करण्याची वेळ आल्यास 'मी भूतकाळातील त्या तणावग्रस्त परिस्थितीच्या अनुभवामुळे नक्की प्रारंभ करू शकेन,' ही भावना आता असेल. तो ताण देखील आता वरदान ठरेल. प्रत्येक ताण हा आपल्यातील ऊर्जेला जागृत करणारा स्त्रोत असतो. त्यामुळे मी ताणांचे स्वागत करतो.

**७.** मी तणावग्रस्त नसून कामात व्यग्र आहे. अनेकांच्या हातात काम नसते. त्याचमुळे ताणापेक्षा मी कामात व्यग्र आहे ही भावना आपणास कृतज्ञ करते.

**८.** आता ताणाचा एक वेगळा प्रकार बघू या - कधी अशी परिस्थिती येते की, सद्य नोकरीला आवश्यक असणाऱ्या क्षमतांपेक्षा माझ्याकडे अधिक पात्रता, कामाचा उरक, जाण, ज्ञान आणि अनुभव आहे. पण, त्यांचा पुरेसा वापर आत्ता होत नाही. यामुळे मनावर ताण निर्माण होऊ शकतो. कामातील तोच तोपणा, बुद्धीला गंज येतो आहे असे वाटणे, या साचलेपणामुळे अंतर्गत असंतुलनास प्रारंभ होतो. बाह्य मागण्यांपेक्षा स्वत:त असलेल्या अधिक क्षमतांमुळे ताण निर्माण होतो. अश्यावेळी वैयक्तिक परिस्थितीचा आढावा काही वेगळ्या प्रकारे घेणे, आवश्यक ठरते. याच नोकरीत राहणे गरजेचे आहे की नोकरीत बदल करावा? घरापासून ऑफिसपर्यंतचा प्रवासाचा वेळ, मिळणारा पगार, इथल्या सोयी-सवलती, यांचे गणित मांडावे लागेल. नोकरी बदलणे सोयीचे नसेल तर, उर्वरित वेळेत माझी बुद्धी, प्रतिभा, सर्जनशीलता, वेळ, ऊर्जा वापरली जाईल असा एखादा छंद, सामाजिक कार्य किंवा अधिकची नोकरी करू शकतो का? याचा विचार गरजेचा ठरेल. जेणेकरून माझ्या ह्या क्षमतांचा मी योग्य विनियोग, वापर किंवा कधी तर निचरा देखील मी करेन. न पेक्षा हे ताण असह्य करू शकतात. त्यापेक्षा पोटापुरते पैसे सध्या मिळत आहेत, मग उर्वरित वेळ मी आनंदासाठी घालविणार आहे, हा विचार संयुक्तिक ठरेल. कारण कोणतेही असो, ताण निर्माण करणाऱ्या प्रत्येक मानसिक स्थितीला हाताळण्याचे हे समान उपाय तुम्हास उपयुक्त ठरावेत, अशी अशा आहे.

# नियोजनातून तणावमुक्ती

प्रीती वडनेरकर
९८२३९९४७९२

सुश्रुतच्या खोडकरपणानं, दंगामस्तीनं वर्षा हतबल झाली होती. त्याला घेऊन अभ्यासाला बसावं तर याचं लक्ष ग्राऊंडवर! 'संध्याकाळची वेळ अभ्यासाची नसतेच' असा युक्तीवाद. बरं, ग्राऊंडवर एखाद्या खेळात पूर्ण लक्ष द्यावं म्हटलं, तर तेही नाही. नुस्तं हुंदडणं आणि हुंदडणं. वर्षा वैतागली होती. या सगळ्याच्या परिणामी परीक्षेत जेमतेम पन्नास टक्के परसेंटेज होतं त्याचं! 'बाबा, माझ्या प्रगतीपुस्तकावर सही करा,' सुश्रुतनं, प्रगतीपुस्तक राजेशच्या पुढे केलं. 'काय दिवे लावले आहेस बघू? हे काय इतके कमी मार्क्स? सगळ्या विषयात जेमतेम पास झाला आहेस. लक्ष कुठे असतं तुझं?' राजेश चिडून म्हणाला. सुश्रुत खाली मान घालून उभा होता. 'वर्षाऽऽ वर्षाऽऽ इकडे ये...हे काय आहे?



काय याचा रिझल्ट? इतके कमी मार्क्स? तू घरीच असतेस नं दिवसभर? नुस्ती होम मेकर? मुलाचा अभ्यास घेता येत नाही?' राजेश ताड ताड बोलत होता.'त्याचं लक्षच नसतं अभ्यासात! सगळं लक्ष इतरत्र! मी काय करतेय, टी.व्हीवर काय चाललंय? घरात कोण आलंय? घराबाहेर याचं मित्रमंडळ काय करतंय? याचीच चिंता असते त्याला! काय करू आणि कसं करू, कळतच नाहीये मला. मी अक्षरशः हात टेकले याच्यापुढे,' वर्षानं स्पष्टीकरण दिलं.

'ते काही मला माहीत नाही पण, पुढच्या परीक्षेला रिझल्ट उत्तम आला पाहिजे. मग त्याच्यासाठी तू काय करतेस मला माहीत नाही?' प्रगतीपुस्तकावर सही करून राजेश निघून गेला.

'आई, काय करू या सुश्रुतचं, कळतच नाहीये मला. अगं, सगळे प्रयत्न झाले. आता फक्त डोकं फोडायचं राहिलंय. वैताग आलाय नुसता, तूच सांग आता, तूच सुचव एखादा मार्ग!' वर्षानं आईला बोलावून घेऊन, मनातली सारी खदखद मोकळी केली तिच्यासमोर! 'प्रथम तुझ्या मनातली सारी अढी काढून टाक. मन एकदम शांत ठेव आणि तू जो बाऊ करत आहेस, इश्यू करते आहेस, तेवढी अवघड गोष्ट नाहीये ही, खचून जाण्यासारखी तर मुळीच नाहीये. मी जे उपाय सुचवेन ते मात्र तुला कोणत्याही परिस्थितीत पाळावे लागतील. त्यात चालढकल नको.'

'हो बाई... कबूल एकदम कबूल! राजेशनं चॅलेंज दिलंय आणि मी ते ॲक्सेप्ट केलंय, त्यामुळे मान्य आहे मला, सांग तू' आईपुढे दोन्ही हात कोपरापासून जोडून वर्षा म्हणाली. आईनं सांगितल्याप्रमाणे, वर्षानं सुश्रुतवर रागावणं, चिडचिड करणं सोडून दिलं. त्याच्या संपूर्ण वेळापत्रकात बदल मात्र केला.'फक्त थोडे दिवस बाळा, मी सांगते ते ऐकायचं. मी सांगते तसंच वागायचं. मग तुला तुझ्या आवडीचा क्रिकेट सेट घेऊन देईन, चालेल?' सुश्रुत खुश झाला.'प्रॉमिस आई?' त्यानं विचारलं.'प्रॉमिस, खरंच!' वर्षानं त्याचा हात हातात घेऊन म्हटलं.

शाळेतून आल्यावर वर्षा स्वतः त्याला ग्राऊंडवर खेळायला घेऊन जाऊ लागली. क्रिकेट, हॉकी, बास्केटबॉल या खेळांची त्याची प्रॅक्टीस होऊ लागली. परिणामी भरपूर थकणं आणि सणकून भूक लागणं होऊ लागलं. खाण्याचे नखरे संपले. जंक फूड बंद झालं. वरण-भात, पोळी-भाजी, जोडीला गुळांबा असा व्यवस्थित आहार सुरू झाला. टी.व्ही. पाहतापाहताच झोपेच्या आधीन होऊ लागला तो! पहाटे पाचला उठल्यावर, झोप पूर्ण झाल्यानं फ्रेश वाटू लागलं त्याला! आंघोळ करून अभ्यासाला बसल्यावर डोळ्यांतली पेंग जाऊ लागली. बाहेर नीरव शांतता असल्याने कुठलेही अडथळे येण्याचा चान्स संपला. अभ्यासात पूर्ण एकाग्रता होऊ लागली.

इतिहासाचा अभ्यास, हसत खेळत गोष्टीरूपानं आणि भूगोल, पृथ्वीचा गोल घेऊन शिकल्यानं सुश्रुतला त्यात खूपच रस वाटू लागला. इतर विषयांचे धडे, नीट समजवल्याने, प्रशनांची उत्तरं अचूक येऊ लागली. प्रत्येक विषयाच्या प्रश्नपत्रिका काढून, लगेच उत्तरं लिहायला सांगितल्यानं, विषय पक्का होऊ लागला. त्याचवेळी वर्षा आपला एम. ए. चा अभ्यासही करू लागली.

सुश्रुतची तब्येतही सुधारली. खोडकरपणा, दंगामस्ती कमी झाली. विचारांमध्ये, वागण्याबोलण्यात परिपक्वता आली. घरातलं वातावरण हलकं फुलकं झालं. ऑफिसच्या कामानिमित्त दौऱ्यावर गेलेला राजेश परत आल्यावर त्याला सुश्रुतमध्ये कमालीचा बदल जाणवला.

या वेळच्या परीक्षेत सुश्रुत चक्क पहिला आला. वर्षानं एम. ए. ची परीक्षा दिली.

वर्षानं आईचा सल्ला मानला. तुम्हीसुद्धा वर्षाच्या आईचा हा सल्ला ऐकणार नं?

# दही की योगर्ट, काय फरक आहे?

आ. अंजली देशमुख
८६६९६६४६३३

जेवणात घरी बनवलेलं ताजं दही असेल तर जेवणाची लज्जत वाढते. आता आपल्या आहारात घरी लावलेल्या दह्याच्या जोडीला बाजारात पाकिटात मिळणारे योगर्ट देखील समाविष्ट झाले आहेत. कोमट दुधात थोडं जुनं दही विरजण म्हणून टाकल्यास नैसर्गिकरित्या जो पदार्थ तयार होतो त्याला दही म्हणतात. जसं इडलीचं पीठ आंबतं तशीच ही प्रक्रिया आहे. दह्यामध्ये असणाऱ्या बॅक्टेरियांपैकी लॅक्टोबॅसिलसमुळे दह्याला आंबटपणा येतो आणि लॅक्टोकोकस लॅक्टिस दुधाला घट्ट करण्याचे काम करते.

दही हे नैसर्गिकरीत्या आंबवून तयार होते. घरी दही बनवल्यामुळे त्यात अनेक प्रकारचे चांगले सूक्ष्मजीव एकत्र असतात. हेच त्याचं खास वैशिष्ट्य आहे. म्हणूनच प्रत्येक घरच्या दह्याची चव वेगवेगळी लागते. यावर तिथलं हवामान आणि तुम्ही विरजणासाठी कोणतं दही वापरता या गोष्टींचा परिणाम होत असतो.

योगर्ट हे देखील दह्याप्रमाणेच आंबवलेले दुग्धजन्य उत्पादन आहे. योगर्टमध्ये प्रामुख्याने २ प्रकारचे बॅक्टेरिया असणे गरजेचे आहे. ते म्हणजे स्ट्रॅप्टोकोकस थर्मोफिलस आणि लॅक्टोबॅसिलस बल्गेरिकस! हे दोन्ही बॅक्टेरिया मिळून दुधाला आंबवण्याचे काम करतात. हे बॅक्टेरिया एका विशिष्ट आणि नियंत्रित तापमानात काम करतात.

यामध्ये स्ट्रॅप्टोकोकस थर्मोफिलस बॅक्टेरिया सुरुवातीला वेगाने काम करून दूध आंबण्यासाठी आणि घट्ट होण्यासाठी पोषक वातावरण तयार करतो. नंतर दुसरा बॅक्टेरिया लॅक्टोबॅसिलस बल्गेरिकस अधिक प्रमाणात आम्ल तयार करून दुधाला पूर्णपणे आंबवतो. या दोघांच्या एकत्रित कार्यामुळेच योगर्टला एकसारखी



चव मिळते. योगर्ट बनवण्यासाठी घरच्या विरजणाची गरज नसते तर विशिष्ट बॅक्टेरिया वापरून दुधाला आंबवून योगर्ट तयार केले जाते.

थंड हवामान असलेल्या देशांमध्ये किंवा बर्फाळ प्रदेशात दह्याचे विरजण लावले तर बॅक्टेरियांची वाढ होत नाही. म्हणूनच तिथे विशिष्ट बॅक्टेरियांच्या मदतीने विरजण लावले जाते. दूध आंबवण्याची प्रक्रिया म्हणजे योगर्ट तर विरजण लावण्याची प्रक्रिया म्हणजे दही! या दोन्हीमधील हाच मुख्य फरक आहे. योगर्ट दुधात टाकले तर त्याचे विरजण लागत नाही.

योगर्ट हे एक ठराविक प्रक्रिया केलेले उत्पादन आहे. जगभरात यासाठी एकच प्रकारचे बॅक्टेरिया आणि एकच प्रक्रिया वापरली जाते. म्हणूनच योगर्टची चव आणि घट्टपणा नेहमी सर्वत्र एकसारखाच असतो.

दही थोडं आंबट असतं आणि त्यात पाण्याचा अंश जास्त दिसतो. प्रत्येक वेळी त्याची चव बदलू शकते. याउलट योगर्ट मऊ आणि गुळगुळीत असते. आरोग्याच्या दृष्टीने हे दोन्ही पदार्थ फायदेशीर आहेत. आपण आपल्या गरजेनुसार ते निवडू शकतो.

दह्याचा वापर आपण इतर जेवणातही करू शकतो आणि कडक उन्हाळ्यात दही शरीराला थंड ठेवण्यास मदत करते. ज्यांना पचनाच्या समस्या आहेत त्यांच्यासाठी योगर्ट उत्तम आहे.

# अक्षय्य पुण्य

स्मिता भोयटे
८२७५०५६६३२

अधिक मासी योगेश्वराला नमन करू चला । दान पुण्य काही करू, गंगेमध्ये स्नान करू॥ जीवनातील यज्ञकर्म चरणी वाहू या । अधिक मास पुरूषोत्तम हा प्राप्त जाहला हरी हा ॥

भजनाची शेवटची ओळ शांताबाईंनी अवरुद्ध कंठाने कशीबशी पूर्ण केली. पहाटे स्नान करून ब्रम्हमुहूर्तावर देवपूजा, ध्यान, नामस्मरण हा त्यांचा नित्यनेम! त्याच्या प्रशस्त स्वच्छ देवघरात योगेश्वर कृष्णाचा सुंदर फोटो होता. उदबत्तीचा सुगंध दरवळत होता. घरातील वातावरण चैतन्यमय, भक्तीपूर्ण झाले होते. शांताबाई सात्त्विक व समाधानी स्वभावाच्या होत्या. आज मात्र त्यांच्या चेहऱ्यावर चिंता दाटून आली होती. अपार श्रद्धेने लाडक्या दैवताकडे, श्रीकृष्णाकडे अंत:करण मोकळे करू लागल्या.

'देवा, तू मला आत्तापर्यंत काही कमी पडू दिले नाहीस. संसारात कितीही अभाव असला तरी मी काटकसरीने संसार केला. जसा द्रौपदी करता धावलास, एका तुलसी दलाने तृप्त होतोस मग आज हाती दिडकी नाही माझ्या, मदतीला धाव रे! काय करू काही तरी मार्ग काढ रे बाबा,' अशी विनवणी करतांना त्यांच्या गालावर अश्रू ओघळले.

या वर्षीचा अधिक मास त्यांच्या दृष्टीने विशेष होता. लाडक्या जावयाचा पहिला सण साजरा करायचा आहे. आपल्या ऐपतीप्रमाणे भेट द्यायची होती. दान, पुण्य, गंगास्नानाची पर्वणी या निमित्ताने आली आहे. पण, भेट द्यायला पैसे नसल्याने त्या दु:खी होत्या.

कालच लाडक्या लेकीचा फोन आला,'आई मी खूप बोअर झाले. अधिक मासाच्या निमित्ताने आम्ही येतो गं!' आनंदून शांताबाई म्हणाल्या,'हो...हो ये बाळ!'

तिकडे लेक मनोमन सुखावून मैत्रीणी सोबत मज्जा करायचे बेत आखू लागली.

शांताबाईचे यजमान अण्णा थट्टा करीत म्हणाले,'काय मग लाडका जावई येणार आहे.



अनारसे करायला तांदूळ टाका. आता सासूबाईंना सवड नाही बॉ...'

लटक्या रूसव्याने त्या बोलल्या,'काय हो जावई का माझा एकटीचा आहे का?'

अण्णा म्हणाले,'सुस्वभावी आहे. हिऱ्यासारखा आपला जावई मग लाडका असणारच.'

'अहो, अजून लग्नाचे कर्ज फिटायचे आहे. दोन मुलांची शिक्षणं, लहान मुलीचे लग्न करायचे आहे. तुमची मिलमधली नोकरी, तुटपुंज्या पगारात कसे होणार सगळे.'

'अगं, तू काळजी करू नकोस. कर्ज ही फिटेल हळूहळू, मुलगी सुस्थळी पडली ना बस्स झाले!'

'हे बघा, संपूर्ण घर भाड्याने देवून आपण दोन खोल्यात राहातोय. पण, आपली काटकसर आपल्याजवळ पण मुलाचे सणवार रीतीप्रमाणे केले नाही तर तिच्या सासरचे नाराज होतील,' काळजीने त्या बोलत होत्या.

दुसऱ्या दिवशी लेक आल्याने सारे घर आनंदले. लेक-जावयाचे हवेनको बघण्यात दोघे गढून गेले. निवांत वेळी लेक म्हणाली,'आई, आम्ही दोन दिवसात जाऊ गं! यांना सुट्टी नाही बरं.'

'अगं इतक्या लवकर खरेदी, फराळाचे कसे होईल बाई?'

मुलगी रागावून म्हणाली,'कसली खरेदी! काही करू नको, अनिष्ट प्रथांच्या चक्रातून बाहेर पड. अगं, मला शिक्षण, संस्कार दिले, चांगले स्थळ बघून दिले. अजून मला काही नको. आता आणखी अडचणीत तुम्ही येवू नका. ऋण काढून सण साजरा करू नको आई!'

आई लेकीची समजूत काढू लागल्या,

'अगं तुझी सासरची मंडळी विचारतील नं काय वाण दिलं आईने म्हणून...'

'आई तू त्याची काळजी करू नको मी घेईन सार सांभाळून'

'अगं, यावर्षी दुर्मिळ सुयोग आला आहे. तुम्हाला अपेक्षा नाही गं पण, मला दानाचे पुण्य मिळू दे बाई!'

'आई, तू ऐकणार नाहीस का? असे कर काल जुन्या साड्या देऊन तू स्टीलचा डबा घेतलास नं त्यात अनारसे भरून दे. अहेराचे जे कपडे लग्नात आलेले आहे तेच आम्हाला दे.'

जावई बुवा मायलेकीचा संवाद ऐकत होते. 'अहो, आई तुम्ही मला तुमची लेक दिली हेच मोठे दान दिले. मला काही नको.' लेक-जावयाचा समजूतदारपणा बघून शांताबाईंच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. संस्कार विचारातून व्यक्त झालेले बघून आपल्यावरील प्रेमाचा त्यांना साक्षात्कार झाला. त्यांनी दोघांनाही औक्षवण केले. अधिकाचे वाण देऊन थोडे तरी पुण्य पदरात पडले याचे समाधान चेहऱ्यावर दिसत होते. अण्णा म्हणाले,'शांता, बघ योगेश्वराने आपल्याला हेच अक्षय्य पुण्य फळ दिले बरं अधिक मासात!' शांताबाई समाधानाने हसल्या.

# मधुमेह आणि व्यायाम

**(भाग २)**

डॉ. सीमा पांडे
९९२२९१९७२०

मागच्या भागात आपण मधुमेह म्हणजे काय, कर्बोदकांचा आपल्या शरीराला काय उपयोग होतो, आपल्या शरीरात इन्सुलिन कशा प्रकारे काम करतं हे बघितलं. आता यापुढील माहिती जाणून घेऊ या.

**रक्तातील साखर अचानक कशी काय वाढते?**

आत्तापर्यंत मी अगदी ठणठणीत होते आणि आता जरा सुखाचे दिवस आले की, अचानक साखर वाढली. असं का झालं असेल? साखर अशी अचानक कशी काय वाढली? संशोधनानुसार, जर तुम्ही अशा परिस्थितीत वाढला असाल जिथे तुमचं जीवन अत्यंत कमी साधनांमध्ये गेलं आणि नंतर अचानक तुमचं जगणं बदललं. जसं की, आधुनिक फास्ट फूड, निष्क्रिय जीवनशैली तर शरीर त्याला सहन करू शकत नाही. त्यामुळे मधुमेह लवकर होतो आणि अधिक तीव्र स्वरूपात होतो.

**मधुमेह प्रकार २ आणि व्यायाम**

मधुमेही व्यक्तींसाठी व्यायाम तसेच सक्रीय जीवनशैली आवश्यक आहे. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा, शरीरातील अनेक अवयवांमध्ये बदल होतात. स्नायूंमध्ये होणारे बदल हे व्यायामाच्या प्रकारावर, कालावधीवर आणि त्याच्या तीव्रतेवर अवलंबून असतात. मधुमेहामध्ये साखर पेशींमध्ये जाण्याची प्रक्रिया बिघडलेली असते पण, व्यायाम करताना ही प्रक्रिया सुरळीतपणे होते. म्हणूनच, व्यायाम हा एक प्रकारचे औषध आहे. जे मधुमेहात असणाऱ्या दोषांवर मात करू शकतो. व्यायाम हा आपल्याला आयुष्यभर करावा लागतो. तो एक जीवनशैलीतील बदल आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या शिफारशीनुसार, शिफारस केलेली शारीरिक क्रिया

प्रौढांसाठी आठवड्याला किमान १५० मिनिटे मध्यम तीव्रतेचा व्यायाम किंवा किमान ७५ मिनिटे तीव्र व्यायाम



किंवा या दोन्हींचे मिश्रण

**व्यायाम :**

- आठवड्यातून किमान २ दिवस स्नायू बळकट करणारे व्यायाम करावेत
- शारीरिक क्रियांची उदाहरणे याप्रमाणे आहेत. चालणे, सायकल चालवणे, नृत्य, पोहणे, ट्रेकिंग/गिर्यारोहण, घरकाम, खेळ

**मुले आणि किशोरवयीन**

- दररोज किमान ६० मिनिटे मध्यम ते तीव्र शारीरिक क्रिया
- आठवड्यातून किमान ३ वेळा स्नायू आणि हाडे मजबूत करणारे व्यायाम

**वृद्ध व्यक्ती**

- प्रौढांप्रमाणेच व्यायाम
- पडणे टाळण्यासाठी संतुलन सुधारक व्यायाम

मधुमेही व्यक्तींना सकाळी केले व्यायाम फायदेशीर असतो. सकाळी रक्तातील साखरेची पातळी खूप जास्त असते. त्यामुळे सकाळी व्यायाम केल्यास साखर नियंत्रित होऊ शकते.

अनेक लोक वजन कमी करण्यासाठी व्यायाम सुरू करतात. परंतु, अपेक्षेइतके वजन कमी न झाल्यामुळे काही जण निराश होऊन व्यायाम सोडून देतात. शारीरिक व्यायामाचे फायदे केवळ वजन कमी करण्यापुरते मर्यादित नसून, वजन कमी नाही झाले तरीही व्यायामाचे आरोग्यावर अत्यंत मौल्यवान परिणाम होतात. व्यायामामुळे शरीराचे वजन कमी झाले नाही तरी शरीराची रचना बदलू शकते. स्नायूंच्या आकुंचनामुळे स्नायूंची वाढ होते व स्नायूंचे प्रमाण वाढते. तसेच, व्यायामासाठी लागणारी काही ऊर्जा चरबीच्या ऊतींमधून मिळत असल्यामुळे शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होऊ शकते. याशिवाय, शरीरातील चरबीचे वितरणही बदलते. व्यायाम करताना पोटावरील चरबी मांडीवरील चरबीपेक्षा अधिक प्रमाणात वापरली जाते.

**व्यायाम केल्याने काय फायदा होतो ?**

व्यायाम केल्याने चरबी जळते, इन्सुलिनचे कार्य सुधारते. त्यामुळे व्यायामाचा फायदा होतो. पण, हा व्यायाम रोज करणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम आणि संतुलित आहार यांचा एकत्रित परिणाम शरीराला खूपच फायद्याचा असतो.

**सर्वच लठ्ठ लोकांना मधुमेह होतो का ?**

लठ्ठपणा हा मधुमेहासाठी जोखमीचा घटक मानला जातो. म्हणजेच लठ्ठ व्यक्तींना मधुमेह होण्याची शक्यता असते. परंतु असे असले तरी सर्वच लठ्ठ लोकांना मधुमेह होत नाही.

**काही लठ्ठ लोकांना मधुमेह का होत नाही ?**

काही लोकांमध्ये चरबी साठवण्याची क्षमता जास्त असते म्हणून बीएमआय खूप जास्त असला तरी चरबी सुरक्षितपणे साठते. त्यामुळे त्यांना मधुमेह होत नाही.

**शरीरात कुठे साठलेली चरबी धोकादायक असते ?**

पोटाभोवतीची चरबी, अंतर्गत अवयवांभोवतीची चरबी, यकृतात साठलेली चरबी, स्नायूंमध्ये साठलेली चरबी ही धोकादायक मानली जाते.

**आपल्या शरीरात चरबी साठवण्याची सुरक्षित जागा कोणती आहे ?**

आपल्या शरीरात चरबी मुख्यत: नितंब आणि मांड्यामध्ये सुरक्षितपणे साठवली जाते. पण, जेव्हा या पेशी पूर्ण भरतात तेव्हा नवीन चरबी साठवायला जागा राहत नाही तेव्हा अतिरिक्त म्हणजेच जास्तीची चरबी ही पोटात, यकृतात, स्नायूंमध्ये साठू लागते. ही चरबी शरीराला बेढब बनवते आणि रोगांचा धोका वाढवते.

**वजन कमी केल्याने काय फायदा होतो ?**

वजन कमी केल्याने चरबीचा ताण कमी होतो, सूज कमी होते, इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारते. यानंतरच्या भागात आपण मधुमेहामध्ये आहाराचे महत्व याविषयी बघणार आहोत.

**क्रमशः**



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : २९/५/२०२६ **वार** : शुक्रवार **शके** : १९४८
**अयन** : उत्तरायण **ऋतू** : ग्रीष्म **मास** : अधिक ज्येष्ठ **पक्ष** : शुक्ल **महिना** : मे
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-४० **तिथी** : त्रयोदशी **नक्षत्र** : स्वाती
**योग** : परिध **करण** : तैतिल **सूर्योदय** : ६.०३ **सूर्यास्त** : १९-०७
**चंद्रराशी प्रवेश** : तुला **शुभाशुभ** : शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : यात्रा व देव दर्शनासाठी आपण प्रवास कराल.
**वृषभ** : उद्योग आरंभ करू शकतात.
**मिथून** : मुलांचे अडचणी सोडवावे लागतील.
**कर्क** : आईजवळ आजचा दिवस घालवावा.
**सिंह** : कुणची नाराजीही कार्यावर परिणाम करेल.
**कन्या** : आर्थिक प्रगती आज होणार.
**तुला** : कर्ज प्रकरणे आज पूर्ण होतील.
**वृश्चिक** : नको ते विचार मनात आणू नका.
**धनू** : उपकार ज्यांचे तेच इश्वर आपले.
**मकर** : आजी-नातवांचे नाते ईश्वर आणि भक्तासारखे असते.
**कुंभ** : भाग्य समोर पण आशीर्वादाचे नाके पार पाडावे लागतील.
**मीन** : आजारपणाकडे दुर्लक्ष करू नका.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### विरोदा येथे शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन

**पाल, ता.यावल** : येथील कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने २८ रोजी विरोदा (ता.यावल) येथे खरीप हंगाम पूर्व शेतकरी प्रशिक्षणचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शास्त्रज्ञ प्रा.अतुल पाटील यांनी हवामानातील बदलामुळे एल निनो समस्या या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहायक कृषी अधिकारी महेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### सिल्लोड येथे बकरी ईद उत्साहात साजरी

**सोयगाव** : सिल्लोड शहरात बकरी ईद उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी शहरातील ईदगाह येथे सामुहिक नमाज अदा केली. त्यानंतर आ.अब्दुल सत्तार, नगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा परिषद सदस्य अब्दुल आमेर यांनी उपस्थित मुस्लिम व हिंदू बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. ईदगाह येथे शुभेच्छा देण्यासाठी परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार अंकिता ताकभाते, पोलीस उपअधिक्षक आरती पवार, पोलीस निरीक्षक शेषराव उदार, मंडळ अधिकारी रुख्मिण माने, काशिनाथ ताठे, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीराम महाजन, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, गटनेते सुधाकर पाटील, नगरसेवक नंदकिशोर सहारे, कृउबाचे संचालक सतीश ताठे, नगरसेवक रऊफ बागवान, सिद्धेश्वर आहेर, विशाल जाधव, शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, प्रशांत क्षीरसागर, राजू गौर, संजय डमाळे, गणेश पाटील, डॉ. विठ्ठल जाधव, गणेश डोईफोडे, कुणाल सहारे, विनोद काटकर, गजानन चाथे, सुनील दुधे उपस्थित होते.



### श्रीराम मंदिरात विष्णुसहस्रनामाचे हवन, विष्णुयाग

**शेंदुर्णी** : येथे अधिक महिन्याच्या पर्व काळात गीता ग्रंथाचा शतकोत्तर रौप्यमहोत्सवी पारायण सोहळा अर्थात १२५ गीता पारायण पुर्ण झाल्याबद्दल विष्णुसहस्रनामाचे हवन व विष्णुयागचे आयोजन श्रीराम मंदिराच्या आवारात करण्यात आले होते. हभप.भागवत महाराज हिवाळे यांनी काही भाविकांना सोबत घेऊन दर एकादशीला गीता पारायण व विष्णु सहस्त्रनाम पाठ सुरू केले होते. अधिक मासातील कमला एकादशीला १२५ गीता पारायण पूर्ण झाल्याबद्दल विष्णुसहस्रनामाचे हवन व विष्णुयाग भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कमला एकादशीला भगवान श्री त्रिविक्रम महाराज यांच्या मंदिरात हभप.रामेश्वर महाराज कोळी यांचे कीर्तन पार पडले. यावेळी व्यापारी भगवान अहिरराव यांच्यावतीने भाविकांना फराळ वाटप करण्यात आले.

### निवडणूक मॅपिंग कार्यात उत्कृष्ट कामगिरी; बीएलओ चौधरी, पिंजारी यांचा सत्कार

**शेंदुर्णी** : नगरपंचायतीच्या निवडणूक मॅपिंगच्या कामात उल्लेखनीय



कामगिरी केल्याबद्दल बी.एल.ओ. पंकज चौधरी व पिंजारी यांचा मुख्याधिकारी विवेक दांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दोघांनी मॅपिंगचे तब्बल ९५ टक्क्यांहून अधिक काम यशस्वीरीत्या पूर्ण केले. यावेळी मुख्याधिकारी विवेक दांडे यांनी दोन्ही कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करुन कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळेच प्रशासनाची कामे यशस्वी होतात. पंकज चौधरी व पिंजारी यांनी दाखवलेली कार्यतत्परता इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही दोघांचे अभिनंदन करुन पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

# सावखेडा वाळू गट अवैध वाळू उपसाप्रकरणी पावणेदोन कोटींचा दंड

## १० पोकलँड, १२ यांत्रीक बोटीं, ६ डंपरसह तब्बल १५०० लिटर डिझेलसाठा जप्त, प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ मे**

जिल्ह्यात अनेक वाळू गटांमधून अवैध वाळू उपसा सुरू असून अमळनेर तालुक्यात सावखेडा शिवारातील वाळू गटातून यांत्रीक बोटींसह पोकलँड, जेसीबी व्दारे वाळू उपसा करून डंपरव्दारे मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक केली जात असल्याची तक्रार जिल्हा प्रशासनाकडे मिळाली होती. त्यानुसार गुरूवार २८ मे रोजी पोलिस आणि महसूल विभागाच्या संयुक्त पथकाकडून अवैध वाळू करणारे ६ डंपर, १२ यांत्रीक बोटींसह १० पोकलँड आदी साहित्यासह तब्बल १५२० लिटर डिझेलसाठा देखील जप्तीची कारवाई करण्यात आली.

जळगाव जिल्ह्यात ऑक्टोबर नोव्हेंबर दरम्यान १४ वाळू गटांचा ई ऑक्शन लिलाव करण्यात आला आहे. त्यापैकी सात वाळू गटातून ठेकेदारांना वाळू उचल करण्याची ई ऑक्शन लिलाव प्रक्रियेतून परवानगी असून अन्य सात वाळू गट शासकिय कामांसाठी उपयोगात आहेत. लिलाव झालेल्या वाळू गटांपैकी अमळनेर तालुक्यात तापी नदीपात्रात सावखेडा गटात शिवाय दापोरी, गंगापूरीसह नालखेडा आदी ठिकाणचा वाळू गटाचा लिलाव झाला आहे. असे असताना सावखेडा





तापी नदी पात्रातून गेल्या दोन तीन दिवसापासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे आल्या होत्या.

यात सावखेडा गटात तापी नदीपात्रात रात्रंदिवस वाळू वाहतूक करणारे डंपर, यांत्रीक बोटी, जेसीबी, पोकलँड एक्सवेटर आदी यांत्रीक ताफा यामाध्यमातून मोठया प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक करण्यात येत असल्याच्या तक्रारीनुसार पोलीस आणि महसूल प्रशासनाला आढळून आले.

स्थानिक तसेव अन्य नागरिकांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार उपविभागीय दंडाधिकारी, अमळनेर पोलीस प्रशासन व महसूल विभाग यांनी संयुक्त पणे धडक मोहिम राबवत यंत्रसामग्री जप्तीची कारवाई केली. तसेच यावेळी अवैध वाळू उत्खननाचा साठा आणि वाळू उपसा करत असलेले, पोकलंड मशीन, डंपरसह डिझेलच्या भरलेल्या टाक्याचा साठा देखील जप्त करण्यात आला. यामुळे वाळू माफीयांची तारांबळ उडाली असल्याचे दिसून आले आहे.

अमळनेर शहरात गेल्या काही दिवसांपूवी रस्ते दुभाजकाला धडकून वाळूने भरलेल्या डंपरला अपघात झाला होता, तसेच त्यापुढच्या मार्गावर देखील वाळूच्या वाहनाला अपघात घडला असून जिल्हा भरात अनेक ठिकाणी अवैध वाळू वाहतूक मोठया प्रमाणात होत आहे. भडगाव येथे गत सप्ताहात अवैध वाळू वाहतूक प्रकरणी महसूल प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली असून गुरूवार २८ रोजी जळगाव शहरात देखील बांभोरी पुलाजवळ तब्बल १४ ते १५ ट्रक्टर गिरणा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन करत असल्याचे दिसून आले आहे.

### अवैध वाळूसह डिझेल साठा केल्या प्रकरणी कारवाई

सावखेडा परिसरात वाळू गटाचा लिलाव गेल्या ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात झालेला आहे. परंतु सद्यस्थितीत लिलावाव्यतिरिक्त अन्य वाळू गटातून अवैध वाळू उपसा सुरू आहे किंवा नाही याची तपासणी केली जात आहे. तसेच विहीत साठयाव्यतिरिक्त अधिक उचल झाली आहे किंवा काय याची देखील चौकशी केली जाईल. कोणत्याही गटातून वाळू उचल करण्यासाठी यांत्रिकीकरणाची परवानगी नसून सद्यस्थितीत त्या ठिकाणी आढळून आलेल्या यांत्रीक बोटी, उपसा करत असलेले पोकलंड, एक्सवेटर मशीन, डंपरसह डिझेलच्या भरलेल्या टाक्या तसेच वाळू साठा जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. अवैध वाळू वाहतूकीसह अवैध डिझेल साठा केल्या प्रकरणात कारवाई केली जाईल.

**- रोहन घुगे, जिल्हाधिकारी**

### दिड कोटींहून अधिकचा दंड

अमळनेर सावखेडा शिवारातील वाळू गटातून अवैध वाळू उत्खनन प्रकरणी ६ डंपर, १० पोकलँड मशीन, १२ यांत्रीक बोटी असे यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली. तसेच त्या ठिकाणी डंपरसाठी तब्बल १५२० लिटर डिझेल साठा देखील टाक्यांमध्ये करण्यात आला असल्याचे आढळून आल्याने डिझेलसाठा देखील जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उत्खनन प्रकरणी संबंधीतांवर तब्बल १ कोटी ६० लाख रूपये दंडात्मक कारवाई करण्यात आली असून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

**मयुर भंगाळे, उपविभागीय दंडाधिकारी अमळनेर**

## अवैध डिझेल साठा प्रकरणी सुमारे १.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त !

**अमळनेर** : तालुक्यातील सावखेडा गावाजवळ तापी नदी पात्र परिसरात अवैधरित्या साठवून ठेवण्यात आलेल्या डिझेलच्या साठ्यावर महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत मोठ्या प्रमाणावर डिझेल साठा जप्तीची कारवाई केली आहे.

यात २०० लिटर क्षमतेच्या ७ प्लास्टिक ड्रममध्ये एकूण १,४०० लिटर डिझेल किंमत सुमारे १,४२,८०० रूपये. २०० लिटर क्षमतेच्या २ ड्रममध्ये प्रत्येकी ५० लिटर, एकूण १०० लिटर डिझेल १०,२०० रूपये, तसेच २०० लिटरच्या १ ड्रममध्ये २० लिटर डिझेल २,०४० रूपये, असा एकूण तबल एक लाख ५५ हजार रूपयांचे डिझेलसाठा जप्तीची कारवाई महसूल आणि पोलीस प्रशासनाने केली.

**डिझेलसाठा अमळनेर पोलीस ठाण्यात जमा**

दरम्यान, पथकाने चौकशी केली असता अमळनेर येथील गिरीश तुलशीदास बेलदार यांचा डिझेल साठा असल्याचे काम करणाऱ्या व्यक्तींनी सांगीतले. त्यानुसार कारवाई करीत जप्त डिझेल साठा अमळनेर पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आला असून संबंधित संययीत आरोपीविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीर डिझेल साठवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**यांनी केली कारवाई**

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार अमळनेर उपविभागीय दंडाधिकारी मयूर शिंगळे, तहसीलदार सुराणा, उपविभागीय पोलिस अधिकारी चोपडा विभाग, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, मंडळ अधिकारी कल्याणी पाटील तसेच ग्राम महसूल अधिकारी पवन शिंगारे यांच्या पथकाने केली.

## यावल तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतीचे वार्डनिहाय आरक्षण काढण्याकरीता कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**यावल, २८ मे**

तालुक्यातील ४७ ग्राम पंचायतीच्या निवडणुकीसंदर्भात प्रशासनाकडून हालचालींना वेग आला असून सर्व ४७ ग्राम पंचायतीच्या वार्डनिहाय आरक्षण काढण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १२ जून रोजी त्या-त्या ग्रामपंचायतीत विशेष सभा बोलावून प्रारूप आरक्षण काढण्यात येणार असून त्यावर २५ जूनपर्यंत हरकती आणि सुचनेकरीता मुदत दिली जाणार आहे. त्यानंतर अंतिम वार्ड निहाय आरक्षण १० जुलै रोजी प्रसिध्द केले जाणार आहे. त्यानंतर निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे.

यावल तालुक्यातील मुदत संपत संपलेल्या ४७ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. या सर्व ४७ ग्राम पंचायतीच्या वार्ड रचनेची कार्यवाही प्रशासनाने पूर्ण केली असून आता त्या-त्या ग्रामपंचायीतचे वार्डनिहाय सदस्यांचे आरक्षण काढण्यात येणार आहे. या आरक्षण काढण्याचा कार्यक्रम प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला असून तहसिलदार मोहनमाला नाझीरकर, निवासी नायब तहसिलदार बी.एम.पवार, नायब तहसिलदार अतुल गांगुर्डे, सुयोग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या ग्रामपंचायतीत वार्डनिहाय आरक्षण काढण्याकरीता अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत.

१२ जून रोजी त्या-त्या ग्राम पंचायतीत विशेष सभा बोलावण्यात येवून त्या-त्या वार्डातील विविध प्रवर्गातील लोकसंख्या लक्षात घेवून आरक्षण काढले जाणार आहे. या प्रारूप वार्डनिहाय आरक्षणास १९ जून रोजी प्रसिध्द केले जाणार आहे. या प्रारूप आरक्षणावर २५ जूनपर्यंत हरकती व सुचना दाखल करता येणार आहेत. प्राप्त हरकतींचा निपटारा करून अंतिम आरक्षण १० जुलै रोजी प्रसिध्द केले जाणार असून त्यानंतर सार्वत्रीक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होणार आहे.

### या ग्रामपंचायतीत निघणार आरक्षण व तेथील आरक्षीत सरपंच पद

**अनुसूचित जमाती राखीव** :- वड्री खुर्द, कोसगाव, सांगवी खुर्द, पिळोदे खुर्द, हंबर्डी, राजोरे. **अनुसूचित जमाती महिला राखीव** :- कोरपावली, कासवे, शिरसाड, मनवेल, मारूळ, बामणोद, विरोदे, बोरावल खुर्द. **अनुसूचित जाती राखीव** :- किनगाव बुद्रुक, मोहराळे, डांभुर्णी, निमगाव. **अनुसुचित जाती महिला राखीव** :- वनोली, दुसखेडे, अंजाळे. **नामाप्र** :- भालशिव, हिंगोणे, आमोदे, सातोद, विरावली, नायगाव. **नामाप्र महिला राखीव** :- दहीगाव, भालोद, पिंप्री, उंटावद, वढोदे प्र.सावदा, कोळवद, महेलखेडी. **सर्वसाधारण** :- चिंचोली, बोरखेडा बुद्रुक, सावखेडेसिम, पिंपरूड, टाकरखेडे. **सर्वसाधारण महिला राखीव** :- अट्रावल, डोंगरकठोरा, सांगवी बुद्रुक, डोणगाव, नावरे, वढोदे प्र.यावल, बोरावल बुद्रुक, आडगाव.

## सफाई कर्मचाऱ्यांना जबरदस्तीने उतरवले जातेय गटारीत

### शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार संघाचा आरोप; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, २८ मे**

नगरपरिषदेअंतर्गत ठेकेदारी पद्धतीत काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना सरकारी पगारपेक्षा कमी पगार दिला जातो, रविवारच्या सुट्टीच्या दिवसाचा रोज कापला जातो, सफाई कर्मचाऱ्यांना खोल गटरीमध्ये जबरदस्ती उतरले जाते, असा आरोप करत त्यांना काही झाले तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार संघातर्फे निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.

निवेदनात, नगरपरिषदेअंतर्गत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना शासकीय सुट्टी असली तरी जबरदस्तीने काम करुन घेण्यात येत आहे. त्यांना शासकीय सुट्टी मिळावी, सफाई कर्मचाऱ्यांना वेळेवर आरोग्य तपासणी केली जावी, सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा ड्रेस मिळावा, ठेकेदारी पद्धतमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना सरकारी पगारपेक्षा पगार कमी दिला जातो, रविवारी सुट्टीच्या दिवसाचा रोज कापला जातो, सफाई कर्मचाऱ्यांना खोल गटरीमध्ये जबरदस्ती उतरले जाते, त्यांना काही झाले तर याला जबाबदार नगरपरिषद किंवा मुख्याधिकारी राहील, असे नमुद करण्यात आले आहे.

फैजपूर शहराच्या लोकसंख्येप्रमाणे किती कर्मचारी लावले गेले आहेत आणि किती कर्मचारी काम करत आहेत. कर्मचारी काम कमी करत असून बिल जास्त निघत आहे. या गोष्टीवर मुख्याधिकारी यांचे लक्ष गेले नाही का? असा प्रश्नही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. साफसफाईचा ठेका कोणत्या अटी-शर्तींवर दिला आहे, कचऱ्यापासून खत निर्मित होतो का, ओला कचरा, सुका कचऱ्याचे वर्गीकरण होतो का, वारंवार मुदतवाढ देण्यामागचे गौडबंगाल काय, त्यांच्याकडे कचरा गाड्या नाहीत ते नगरपरिषदेच्या गाड्या उपभोगत आहेत, त्याचा हिशोब काय, असे प्रश्न उपस्थित करुन याबाबत खुलासा मिळावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली असून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



## प्रशासनाने शेतकऱ्यांना सहकार्य न केल्यास शेतकरी रस्त्यावर उतरतील

### शेतकरी कृती समितीचा इशारा; शेतकऱ्यांना डिझेलचा झटका तर पिकांना विजेचा शॉक

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, २८ मे**

सध्या केळी बागा उन्हाच्या तीव्रतने जळत आहेत. त्यात अवकाळीचा मारा, त्यासोबत खरिपाची पेरणी अश्या काळात वीज व डिझेल दोघेही नाकारणे म्हणजे शेतकऱ्यांना वेठीस धरणे आहे. त्याचा उद्रेक केव्हाही होऊन शेतकरी रस्त्यावर उतरतील, अशी अप्रिय वेळ टाळावी व शेतकऱ्यांना सहकार्य करावे, अशा आशयाचे निवेदन शेतकरी कृती समितीतर्फे तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांना देण्यात आले.

निवेदन देतेवेळी, शेतकरी कृती समितीचे एस.बी. पाटील, भागवत महाजन, प्रशांत पाटील, अजित पाटील, नारायण पाटील, धनंजय पाटील, मनिष महाजन, अॅड.धर्मेंद्र सोनार, संदीप महाजन, गोपाल महाजन, ऋषिकेश धनगर यांच्यासह पदधिकारी उपस्थित होते.



निवेदनात, आधीच उष्णतेने केळी व इतर पिके करपत आहेत, पुढील वर्ष अल निनोच्या सावटाखाली असल्याने, असलेल्या पाण्याच्या उपलब्धतेनुसार शेतकरी कापूस लागवड या आठवड्यात सुरू करत आहे, अशा काळात वीज वितरण विभागाचे अधिकारी हे वीजपुरवठा आठ तास ऐवजी सहा तास देणार असे सांगत आहेत. खर म्हणजे सकाळी चार ते दुपारी बारा ते एक वाजेपर्यंत राज्यात विजेची मागणी आता कमी झाली आहे किंवा त्या काळात रहिवाशी किंवा औद्योगिक भागात लोड शेडिंग करता येऊ शकते. परंतु, त्या ऐवजी सोपा बळी शेतकऱ्यांचा देणे हे धोरण चुकीचं आहे. असा निर्णय घेतल्यास शेतकरी उध्वस्त होईल, त्यासाठी नियोजन करून वीज पूर्ववत आठ तास द्यावी, असे नमुद करण्यात आले आहे.

**प्रशासनाने शेतकऱ्यांचे हाल थांबवावेत...**

ट्रॅक्टर आणले तरच डिझेल देऊ, हा तुघलकी निर्णय आहे. त्याने इंधनाचा जास्त अपव्यय होईल. गावातून तालुक्यातील पेट्रोल पंपावर डिझेल शोधणे व एका ठिकाणी नसल्यास किंवा संपल्यावर प्रत्येक पंपावर ट्रॅक्टर नेणे म्हणजे लाखो लिटर डिझेलची नासाडी आहे. त्यातही ज्यांच्याकडे फक्त पॉवर ट्रिलर आहे त्यांना तर कसरतच आहे. त्याऐवजी ट्रॅक्टर धारकाना किंवा पॉवर ट्रीलर धारकांना तलाठ्याने एका कागदावर रेशनकार्ड बनवून देऊन त्यावर ट्रॅक्टर नंबर, मालकाचे नाव असे दिले व दिवसाला किमान किती डिझेल द्यावे, असा नियम प्रशासनाने करून दिला तर पेट्रोल पंपावरून डिझेल घेतल्यावर पंपवाल्याने दिलेले डिझेल किती व तारीख टाकल्यास व एक शिक्का मारून दिला तर दुसरा पंपवाला त्याला त्या दिवशी डिझेल देणार नाही. यामुळे कुठेही साठा होणार नाही व पुरवठा सुरळीत होईल, त्यासाठी अजून चर्चा करून मार्ग निघू शकतो, त्यासाठी प्रशासनाने मार्ग काढून शेतकऱ्यांचे हाल थांबवावेत, अशी मागणीही यात करण्यात आली आहे.

## यावल-सातोद रोड, चुंचाळे शिवारातून ४.६३ लाखांचे विद्युत तार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**यावल, २८ मे**

तालुक्यातील सातोद गावापासून यावलकडे येणाऱ्या रस्त्यावर तसेच चुंचाळे शिवारातून सावखेडासिम शिवारात विद्युत वितरण कंपनीच्या ठेकेदारांच्या माध्यमातून काम सुरू असून या ठिकाणी खांबावर टाकलेले ४ लाख ६३ हजार रुपये किमतीचे तार चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे.

सातोद गावापासून यावलकडे येणाऱ्या रस्त्यावर विद्युत वितरण कंपनीचे ठेकेदार अनिल उर्फ शेखर आत्माराम चौधरी (रा.साकळी) यांच्यावतीने खांब टाकण्याचे काम सुरू आहे. त्यांनी यावल शिवारातील चेतन खेडकर यांच्या शेत गट क्रमांक २६८ पासून ते सातोद शिवारातील रमेश वामन तळेले यांचे शेत गट क्रमांक १०४ पर्यंत २८ ठिकाणी खांब उभे करून २७ गाल्यांमध्ये ३३ केव्हीचे ४ हजार ५० मिटर लांबीचे विद्युत तार टाकले होते. दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने हे २ लाख ८३ हजार रुपये किमतीचे तार चोरुन नेले. याप्रकरणी अनिल चौधरी यांनी यावल पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. यापूर्वी देखील चुंचाळे शिवारातून नायगाव रोडवरील व गायरान भागातून विद्युत तार चोरी गेले आहेत. याचे गुन्हे यावल पोलिसात दाखल आहे. तेव्हा तार चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याची भीती व्यक्त केली जात असून मोठ्या प्रमाणावर दोन ठेकेदारांचे तार चोरी झाल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

**चुंचाळे शिवारात देखील चोरी**

चुंचाळे शेतशिवारात आर.जी. नाना पाटील यांच्या खडी-डांबरच्या गोडाऊनपासून ते सावखेडासिम शिवारातील वाटर फिल्टरपर्यंत राहुल दिनकर चौधरी (रा.साकळी) यांनी १८ खांब उभे करून त्यावर १७ गाल्यात एक लाख ८० हजार रुपये किमतीचे थ्री फेजचे २ हजार २५० मीटर लांबीचे लघुददाबाचे तार टाकले होते. ते अज्ञात चोरट्याने चोरी केले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर यावल पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार देण्यात आली आहे.



# हरित महाराष्ट्र आयोग
## जिल्ह्यांतर्गत किमान १० लाख रोप लावगडीचे उद्दीष्ट

कृष्णराज पाटील,
जळगाव दि.२८ मे

गेल्या महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यात आगामी २०४७ पर्यंत सुमारे तीनशे कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट निर्धारित करण्यात आले आहे. वृक्ष लागवड आणि संवर्धन उद्दीष्ट गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली असून हरित महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या आयोगावर सोपविण्यात आली आहे. या आयोगाचे अध्यक्ष मुख्यमंत्री, तर उपाध्यक्ष उपमुख्यमंत्री, सहउपाध्यक्ष वन मंत्री, पर्यावरण मंत्री, कृषी मंत्री आणि रोजगार हमी योजना मंत्री आदी आहेत. त्यानुसार राज्यात वृक्षारोपण मोहीम. नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी हरित महाराष्ट्र आयोग काम करणार असून जळगाव जिल्ह्यांतर्गत किमान सुमारे १० लाख रोपे लावगडीचे उद्दीष्ट असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

## रस्ते विकासात जिल्हा अग्रेसर, रोप संवर्धन नगण्य



पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ आताचा एनएच ५३, सार्व.बांधकाम विभागाचा पूर्वीचा राज्यमार्ग क्रमांक १८४ जळगाव-पाचोरा एनएचजे ७५३ नुसार जळगाव ते मनमाड तसेच पूर्वीचा राज्य महामार्ग क्रमांक ८ जळगाव औरंगाबाद १४७ कि.मी आता आता जळगाव, छत्रपती संभाजीनगर अहिल्यानगर पूणे दिघी असा एनएच ७५३ एफ आदी महामार्गांचे विस्तारीकरण काँक्रिटीकरण राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण अर्थात न्हाई अंतर्गत करण्यात आले आहे. महामार्गावर असलेले ७० ते १०० वर्षापूर्वीचे मोठमोठे वृक्ष हटविण्यात येवून महामार्गाचे विस्तारीकरण झाले आहे. विस्तारीकरणादरम्यान सुमारे ७० ते १०० वर्षापूर्वीचे चिंच, निंब, पिंपळ, वड तसेच अन्य डेरेदार वृक्ष हटविण्यात आले आहेत.

### उद्दीष्ट कागदावरच :

सर्वच प्रशासनाकडून लाखो-कोटी वृक्ष लागवडीचे भव्य उद्दिष्ट ठेवले जाते, परंतु प्रत्यक्षात लागवड कुठे आणि किती झाली, याचे योग्य सर्वेक्षण केले जात नाही. लागवड केलेल्या रोपांना पावसाळयानंतरच्या कालावधीत व्र उन्हाळ्यात पाणी देण्याची सुविधा उपलब्ध असली तरी वेळेवर नसणे. भटक्या पशुधनापासून रोपांचे संरक्षण न केल्यामुळे बहुतांश रोपे जगण्याआधीच नष्ट होतात. यात सामाजिक वनीकरण, वन विभागाच्या दरवर्षीच्या वृक्षारोपण मोहिमेत अनेकदा फोलपणा आहे. रोप लागवडीचे नियोजन नसणे, रोपांची योग्य निगा न राखणे आणि गैरप्रकार आदीमुळे कोट्यवधी रोपे लावूनही अपेक्षित हरित पट्टा निर्माण करण्यात अपयश आले आहे. तसेच अनेक ठिकाणी कागदोपत्री रोप लागवड झाल्याचे समोर आले आहे.



## जिल्ह्याच्या वनक्षेत्रात ५.९१ टक्क्यांनी वाढ झाल्याचा दावा



जळगाव प्रादेशिक वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभागामार्फत दरवर्षी जिल्ह्यात लाखो रोपांची लागवड व संगोपन केले जाते. जिल्ह्यात रस्ते दुतर्फा, नदी-कालव्यांचे काठ, शाळा, शासकीय जमिनी आणि शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. राबवण्यात आलेल्या विविध वृक्षारोपण मोहिमांमुळे जळगाव जिल्ह्याच्या वनक्षेत्रात लक्षणीय वाढ झाली असून वनसर्वेक्षणाच्या अहवालानुसार जळगाव जिल्ह्याचे वनक्षेत्र ५.९१ टक्क्यांनी वाढले असल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.



दरम्यान, जळगाव जिल्ह्यात महामार्गांचे रस्ते मार्ग विस्तारीकरण काँक्रिटीकरण कामे संबधीत अशोका बिल्डकॉन, एमबीएल इन्फ्रास्ट्रक्चरर्स लि. तर छत्रपती संभाजीनगर ते जळगाव चे काम ऋत्विक लँड प्रो. नंतर जीआर इन्फ्रा तर्फे मेगा इंजिनिअर्स आदी कंपन्यांकडून करण्यात आले आहेत. संबधीत कंपन्याकडून झाडे काढण्यात आल्यानंतर रस्ते विस्तारीकरणानंतर रस्ते देखभाल दुरूस्ती तसेच नव्याने रोप लागवड आणि संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली आहे. परंतु संबंधीत कंपन्यांकडून रस्यांच्या दुतर्फा रोप लागवड आणि संवर्धन अत्यंत दुर्लभ असल्याचेच दिसून येत आहे.



### विकासकांकडून दूर्लक्ष

या कंपन्यांकडून सद्यस्थितीत कोणत्याही महामार्गाच्या दूतर्फा वृक्ष लागवड व संवर्धन करण्याचे काम पूर्णपणे करण्यात आलेले नाहीत. जी रोपे लावली आहेत. ती कोणत्याच काळात सुसंगत न रहाता योग्य संरक्षण जाळी वा काटेरी कुंपण ट्री गार्ड तसेच वेळेवर पाण्याअभावी जळून वा सुकल्याने नष्ट झाली आहेत.

### अभियंते अधिकाऱ्यांनी झटकली जबाबदारी

रस्ते मार्ग विस्तारीकरण काँक्रिटीकरणांतर्गत रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे काढण्यात आली असली तरी त्या जागी नव्याने तीन ते चार वर्षाची वाढ झालेली रोपे स्थापीत करून त्यांचे संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी संबधीत विस्तारक एजन्सीवर आहेत. रस्ते विकासादरम्यान रोप लागवड व संवर्धनावर भर असताना या कामांकडे दूर्लक्षच झाले असून संबधीत काम पाहणारे अभियंते देखील या कामासंदर्भात माहिती देण्यास असमर्थ आहेत. यासंदर्भात कोणतीही जबाबदारी नसल्याचेच दर्शवित आहेत.

## लागवड आणि त्यानंतर रोप संवर्धनाचा अभाव

म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून रोपे तयार करून निधी खर्च केला जातो, पण प्रत्यक्षात लागवड न केल्याने रोपवाटिकांमध्ये तसेच लागवड केलेल्या ठिकाणी संगोपनाअभावी कोमेजून जाऊन नष्ट होतात. प्रशासकीय आकडेवारी आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यात पारदर्शकतेचा अभाव असून मोठी तफावत असते. तसेच स्थानिकांना विश्वासात न घेतल्याने लागवड केलेल्या रोपांचा संवर्धनाचा अभाव मोठया प्रमाणावर आहे.





### जैन इरिगेशन - खासगी आस्थापनेकडून ३८०० रोपांची लागवड

जळगाव ते पाचोरा मार्गावर जळगाव मनपा जुना जकात नाक ते शिरसोली दरम्यान रस्त्यांच्या दुतर्फा सावली देणाऱ्या विविध प्रजातींच्या तब्बल ३८०० रोपांची लागवड आणि संवर्धन जैन इरिगेशन कंपनीमार्फत करण्यात आली आहे. दररोज त्यांच्या खासगी टँकरव्दारे रोपांना पाणी देत संवर्धन केले आहे. त्या व्यतिरिक्त कोणत्याही ठिकाणी सावली वा पर्यावरण संवर्धनास हातभार लावणारी रोपे नसल्याचेच दिसून येत आहे. यात स्थानिक शेतकरी देखील शेतांच्या बांधावर क्वचितच रोप संवर्धन करीत असल्याचेच चित्र आहे.

### वनवणव्यातून वनसंपदा व जैवसृष्टी नष्ट

**रस्यांच्या दुतर्फा शहरी तसेच ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी हंगाम संपल्यानंतर शेतकऱ्यांकडून शेतातील तसेच बांधावरील कचरा जाळून नष्ट केला जातो तर दुसरीकडे तालुक्यातील विविध वनपरिक्षेत्रांतर्गत उन्हाळ्याच्या दिवसात वनवणवा लागून वनसंपदेचे नुकसान होवू नये यासाठी वनकर्मचाऱ्यांना अग्नीशमन साहित्य दिले जाते. तसेच परिसरात शिबार मेळावे यामाध्यमातून वनसंपदा जतन करण्याविषयी जनजागृती केली जाते. असे असूनही बऱ्याच ठिकाणी वनवणवे लागल्याच्या घटना दृष्टोत्पत्तीस पडतात. २७ एप्रिल २०२६ दरम्यान श्री क्षेत्र पद्मालय परिसरातील एरंडोल वनपरिक्षेत्रांतर्गत वनवणवा लागून मोठी दुर्घटना घडली. या परिसरात वनवणवा लागला कि लावला गेला हे अज्ञात असून या आगीत टेकडीवरील आणि आजूबाजूच्या जंगलातील अनेक जुनी झाडे आणि औषधी वनस्पती जळून खाक झाल्या आहेत.**



भडगाव तालुक्यात वडजी ग्रामपंचायती अंतर्गत १९७० च्या दशकात तत्कालीन सरपंच रावण पूंजू पाटील यांनी वडजी शिवार हद्दीत हजारो रोपांची लागवड केली होती. यात राज्य मार्ग क्रमांक २५ येवला एरंडोल रस्त्यावर, पांढरद शिव पर्यत, वडजी गाव ते पारोळा रस्ता फाटा आदी ठिकाणी आंब्यांच्या रोपांची लागवड केली होती. यापासून रस्त्याच्या दुतर्फा आंबराईची गर्द सावली तसेच ग्रामपंचायतीला कैरीच्या लिलावातून उत्पन्न मिळत होते. सद्यस्थितीत बरीच झाडे नष्ट झाली असली तरी मोजकीच झाडे शिल्लक आहेत.



### घनकचरा टाकून वृक्षसंपदेला नख लावण्याचे उद्योग

जळगाव शहर महानगरपालिका हद्दीत अनेक ठिकाणी श्रीकृष्ण लॉन्स ते जुना जकात नाका परिसरात रस्त्याच्या दुतर्फा रोप लागवड आणि संवर्धनातून परिसर हरित, सुंदर पर्यावरण पोषक होऊ शकेल, यासाठी स्थानिक एनजीओ प्रयत्न करीत आहेत. परंतु बऱ्याच ठिकाणी जुन्या इमारतीचा राडारोडा, वीटा, दगड, माती, निरूपयोगी बांधकाम घनकचरा साहित्य आदि रस्त्याच्या बाजूलाच टाकण्यात येत आहे. यातून लागवडीतून संवर्धन झालेली रोपांसह अन्य झाडे देखील मृतप्राय होत वृक्षसंपदेला नखच लावले जात आहे. शहर महानगरपालिकेने याठिकाणी पडलेले सिमेंट वेस्ट मटेरियल आणि कचरा उचलून आगामी काळात रोप लागवड संवर्धनासाठी त्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा कचरा टाकणार नाही, यासंदर्भात कठोर कारवाई करणे अपेक्षीत आहे.

**- मदन लाठी, समाजसेवक.**

